अधिसूचना

जसलंपदा विभाग,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,

दिनांक: ८-६-२००६

महाराष्ट्र सिंचन पध्दतींचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियम, २००५ ची नियमावली.

क्रमांक : मसिंप १००६/(२७५/०६)/सिंव्य(धोरण)

महाराष्ट्र सिंचन पध्दतींचे शेतक-यांकडून व्यवस्थापन अधिनियम, २००५ (२००५ चा महाराष्ट्र २३) यांच्या कलम ७६ च्या पोटकलम (१) आणि पोट कलम (२) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा, आणि त्या बाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासन याद्वारे पुढील नियम करीत आहे :-

प्रकरण-१

प्रारंभिक

१. *संक्षिप्त नाव व प्रारंभ :* (१) या नियमांना महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन नियम, २००६ असे म्हणावे.

(२) ते राजपत्रात प्रसिध्द झालेल्या दिनांकास अंमलात येतील

२. *व्याख्या :* या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर :-

(क) " अधिनियम " याचा अर्थ महाराष्ट्र सिंचन पध्दतींचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियम, २००५ (२००५ चा महाराष्ट्र २३) असा आहे ;

(ख) " जोडपत्र " याचा अर्थ या नियमांना जोडलेले जोडपत्र असा आहे ;

(ग) " निवडणूक अधिकारी " याचा अर्थ, पाणी वापर संस्थेंच्या संचालकाची निवडणूक घेण्यासाठी समुचित प्राधिकरणाने नियुक्त केलेला अधिकारी, असा आहे ;

(घ) “ नमुना ” याचा अर्थ, या नियमांना जोडलेले नमुने, असा आहे ;

(ङ) “ जमीनधारक आणि जमिनीचे भोगवटदार ” ह्या शब्दप्रयोगांना महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महा. ४१) यामध्ये अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले असतील, तेच अर्थ असतील ;

(च) “ कलम ” याचा अर्थ, त्या अधिनियमाचे कलम असा आहे ;

(छ) ह्या नियमामध्ये वापरण्यात आलेले परंतु त्यात व्याख्या न केलेले शब्द व शब्द-प्रयोग यांना, अधिनियमात अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच अर्थ असतील.

प्रकरण-२

कार्यक्षेत्राचे निश्चितीकरण व पाणी वापर संस्था

३. *कार्यक्षेत्राचे रेखांकन :* लघु वितरिका स्तरावरील पाणी वापर संस्था, वितरिकास्तरावरील पाणी वापर संस्था, कालवास्तरावरील पाणी वापर संस्था, प्रकल्पस्तरावरील पाणी वापर संस्था आणि उपसा सिंचन पाणी वापर संस्था यांच्या कार्यक्षेत्राचे निश्चितीकरण करण्यासाठी कालवा अधिकारी **जोडपत्र-१** मध्ये विनिर्दिष्ट केलेली मार्गदर्शक तत्वे अनुसरील.

४. *पाणी वापर संस्थेच्या कार्यक्षेत्रामध्ये फेरफार करणे :* (१) सर्व स्तरावरील पाणी वापर संस्थांच्या एकत्रीकरण करणारी त्यांचे विभाजन करणारी किंवा त्यांच्या सीमांमध्ये कोणत्याही प्रकारे फेरबदल करणारी कलम ५ खालील अधिसूचना, त्याद्वारे बाधा पोहोचण्याची शक्यता असलेल्या पाणीवापर संस्था आणि जमीनधारक किंवा जमिनीचे भोगवटदार यांच्याकडून असे एकत्रीकरण, विभाजन किंवा फेर बदल यासंबंधातील हरकती व सूचना मागविणारी पंधरा दिवसांची नोटीस संबंधित कालवा अधिकाऱ्याच्या कार्यालयाच्या सूचना फलकावर आणि तसेच, संबंधित पाणी वापर संस्थेच्या कार्यक्षेत्रातील ठळक सार्वजनिक ठिकाणी लावण्यात आल्याशिवाय, आणि अशा रीतीने आलेल्या हरकती व सूचनांवर समुचित प्राधिकरणाकडून यथोचित विचार करण्यात आल्याशिवाय, समुचित

प्राधिकरणाकडून काढण्यात येणार नाही.

५. *लघु वितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थांची नोंदणी करणे :* (१) कलम ६ अन्वये लघु वितरिका स्तरावरील पाणी संस्थांच्या कार्यक्षेत्राचे निश्चितीकरण करण्यात आल्यानंतर, अशा प्रकारे निश्चितीकरण केलेल्या जमिनींचे धारक आणि भोगवटादार एक पाणी वापर संस्था स्थापन करतील. संस्था स्थापन झाल्यानंतर लगेच, संबंधित कालवा अधिकारी, पाणी वापर संस्थांच्या सदस्यांची सदस्यत्वाची पडताळणी केल्यावर व ओळख पटविल्यानंतर पाणी वापर संस्थांच्या कार्यक्षेत्रातील मोक्याच्या, ठळक सार्वजनिक ठिकाणी उक्त नोटीस लावून व त्या बैठकीसंबंधात योग्य ती पूर्व प्रसिध्दी करुन अशा ओळख पटविलेल्या सर्व सदस्यांची पहिली सर्वसाधारण बैठक लावेल.

(२) पोट-नियम (१) खालील बैठकीची नोटीस, बैठकीच्या प्रत्यक्ष तारखेच्या किमान ७ दिवस आधी प्रसिध्द करण्यात येईल.

(३) अशा बैठकीचे अध्यक्षस्थान कालवा अधिकारी भूषवील, आणि तो कालवा अधिकारी, त्या बैठकीला उपस्थित असलेल्या सर्व सदस्यांना पाणी वापर संस्थेच्या नोंदणीबाबत माहिती देईल. बैठकीला उपस्थित असलेले सदस्य, बहुमताने ठराव संमत करुन उक्त पाणी वापर संस्थेसाठी योग्य ते नांव ठरवतील. नंतर, कालवा अधिकारी त्याच्या कार्यालयात ठेवावयाच्या नोंदवहीमध्ये **जोडपत्र-१** च्या नमुना एक मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रपत्रात पाणी वापर संस्थेच्या उक्त नांवाची नोंद करील.

(४) कालवा अधिकारी त्या पाणी वापर संस्थेच्या कार्यक्षेत्रातील ठळक /मोक्याच्या जागी, त्या पाणी वापर संस्थेचे नांव, तिचा नोंदणी क्रमांक, नोंदणी केल्याचा दिनांक आणि कार्यक्षेत्र प्रदर्शित करील.

(५) संबंधित कालवा अधिकारी प्रकल्प पातळीवर तसेच याबाबतीत पदनिर्देशित केलेला अधिकारी नदी खोरे अभिकरण पातळीवर जोडपत्र-१ च्या नमुना-१ मध्ये पाणी वापर संस्थांची नोंदवही ठेवील. शासनाचे महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण व जलसंपदा विभाग यथोचितरित्या घटित करण्यात आलेल्या पाणी वापर संस्थेची सूची सुध्दा ठेवतील.

(६) लघु वितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थेच्या कोणत्याही कार्यक्षेत्रात अशी

कोणतीही पाणी वापर संस्था घटित करण्यात आली नसल्यास, समुचित प्राधिकारी, जोवर अशी संस्था घटित करण्यात येत नाही व ती कार्यरत होत नाही, तोवर राजपत्रातील आदेशाद्वार कोणतेही शासकीय अभिकरण किंवा सहकारी संस्था किंवा अन्य कोणतीही पाणी वापर संस्था यांच्याकडे अशा पाणी वापर संस्थेची कार्ये सोपवील. तथापि, कोणत्याही बाबतीत, अशी कार्ये १ वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी सोपविण्यात येणार नाहीत :

परंतु, समुचित प्राधिकारी, अशी कार्ये सोपविण्याबाबतचा असा कोणताही आदेश काढण्यापूर्वी, अशा अभिकरणाची किंवा सहकारी संस्थेची किंवा यथास्थिती पाणी वापर संस्थेची तयारी असल्याविषयी खात्री करुन घेईल.

(७) पोटनियम (१), (२), (३), (४) व (५) च्या तरतुदी योग्य त्या फेरफारांसह वितरिकास्तरीय पाणी वापर संस्था, कालवास्तरीय पाणी वापर संस्था, प्रकल्पस्तरीय पाणी वापर संस्था आणि उपसा सिंचन पाणी वापर संस्था यांच्या नोंदणीस लागू होतील.

६. लघु*वितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थेची व्यवस्थापन समिती :* (१) लघु वितरिकास्तरावरील पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीमध्ये :-

(क) ५०० हेक्टरपेक्षा कमी लागवडीलायक लाभक्षेत्राइतके कार्यक्षेत्र असलेल्या उक्त पाणी वापर संस्थेच्या सदस्यांनी निवडून दिलेले नऊ संचालक ;

(ख) ५०० हेक्टर पेक्षा अधिक लागवडीलायक लाभक्षेत्राइतके कार्यक्षेत्र असलेल्या उक्त पाणी वापर संस्थेच्या सदस्यांनी निवडून दिलेले १२ संचालक :

परंतु, प्रत्येकी खंड (क) व (ख) मधील निवडून देण्यात आलेल्या संचालकांमध्ये, संबंधित पाणी वापर संस्थेच्या प्रादेशिक मतदार संघाच्या सुरुवातीच्या, मधल्या व शेवटच्या भागातून प्रत्येकी किमान एक महिला संचालक असेल :

परंतु आणखी असे की, खंड (क) मधील उर्वरित संचालकामध्ये, प्रादेशिक मतदार संघाच्या सुरुवातीच्या, मधल्या व शेवटच्या भागातून प्रत्येकी २ संचालक असतील आणि खंड (ख) मधील संचालकामध्ये, प्रादेशिक मतदार संघाच्या सुरुवातीच्या, मधल्या व शेवटच्या भागातून प्रत्येकी ३ संचालक असतील, तथापि, संबंधित पाणी वापर संस्थेचा

कोणताही सदस्य, मग तो कोणत्याही जातीचा असो किंवा तो स्त्री असो किंवा पुरुष असो अन्य आवश्यक अर्हतांची पूर्तता करण्यास अधीन राहून, संचालकाच्या निवडणुकीस पात्र असेल.

(ग) पाणी वापर संस्थेचे कार्यक्षेत्र ज्याच्या अधिकारीतेत येत असेल तो संबंधित शाखा अभियंता किंवा कनिष्ठ अभियंता किंवा यथास्थिती, सहायक अभियंता (श्रेणी-२), हा, त्या पाणी वापर संस्था व्यवस्थापन समितीचा पदसिध्द संचालक असेल मात्र त्याला मत देण्याचा अधिकार असणार नाही.

(घ) नियम ९ मध्ये विहित करण्यात आलेली अर्हता असणारा सचिव.

(२) पोटनियम (१) च्या तरतुदी, योग्य त्या फेरफारांसह वितरिकास्तरीय पाणी वापर संस्था, कालवास्तरीय पाणी वापर संस्था, प्रकल्पस्तरीय पाणी वापर संस्था व उपसा सिंचन पाणी वापर संस्था यांच्या रचनेस लागू होतील.

७. *लघुवितरिकास्तरावरील पाणी वापर संस्थांच्या व्यवस्थापन समितीच्या संचालकांची निवडणूक :*

(१) कालवा अधिकारी, लघुवितरिकास्तरावरील संबंधित पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या संचालकांची निवडणूक घेण्याची तसेच आवश्यक असेल त्यावेळी निरनिराळया शासकीय अभिकरणाचे सहाय्य मिळविण्याची व्यवस्था करील. निवडणूका घेण्यासाठीची पध्दती जोडपत्र-२ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असेल.

(२) व्यवस्थापन समितीच्या निवडणुका घेण्यासाठी पाणी वापर संस्थेच्या कार्यक्षेत्राची त्या क्षेत्राच्या सुरुवातीचा, मधला व शेवटचा भाग अशा ३ विशेष क्षेत्रात पोट विभागणी करण्यात येईल. निवडणुकीच्या प्रयोजनासाठी स्वतंत्रपणे प्रादेशिक मतदारसंघ असतील. निवडणुकीच्या प्रयोजनार्थ, या तीन भागामधील सदस्य मिळून सुरुवातीचा, मधला व शेवटचा प्रादेशिक मतदार संघ घटित करतील. ज्या सदस्याने वयाची १८ वर्षे पूर्ण केली असतील त्याला मत देण्याचा हक्क असेल आणि ज्या सदस्यांने वयाची १८ वर्षे पूर्ण केलेली नसतील, त्याचा पालक अज्ञान सदस्याच्या वतीने, एका व्यक्तीला केवळ एक मत देता येईल या

तरतुदीच्या अधीनतेने, निवडणुकीच्या प्रक्रियेत सहभागी होण्यास पात्र असेल.

(३) व्यवस्थापन समितीच्या निवडून आलेल्या संचालकांमध्ये अनुसूचीत जाती किंवा अनुसूचीत जमातींचे प्रतिनिधीत्व करत नसल्यास निवडून आलेले संचालक, पाणी वापर संस्थेच्या कार्यक्षेत्रामध्ये रहात असलेल्या अनुसूचीत जाती किंवा अनुसूचीत जमातीच्या पात्र सदस्यांकडून संचालकाची २ अतिरिक्त पदे भरण्यासाठी अर्ज मागवितील.

परंतु पाणी वापर संस्थेच्या संपूर्ण कार्यक्षेत्रामध्ये अनुसूचीत जातीचा किंवा अनुसूचीत जमातीचा कोणताही सदस्य उपलब्ध नसेल तर संचालकाच्या पदासाठी कोणाचेही नामनिर्देशन करण्यात येणार नाही आणि अनुसूचीत जातीचा किंवा अनुसूचीत जमातीचा सदस्य उपलब्ध होईपर्यन्त हे पद रिक्त राहील.

(४) महिला सदस्यासाठी राखीव असलेल्या संचालकांच्या कोणत्याही पदावर महिला सदस्यांचे प्रतिनिधीत्व नसेल अशा प्रसंगी व्यवस्थापन समितीचे निवडून आलेले संचालक, संचालकाचे असे पद भरण्यासाठी, ज्या प्रादेशिक मतदार संघातून महिलांना प्रतिनिधीत्व द्यावयाचे त्या प्रादेशिक मतदार संघामध्ये राहणाऱ्या पात्र महिला सदस्यांकडून अर्ज मागवतील.

परंतु संबंधित प्रादेशिक मतदार संघामधील कोणत्याही महिला सदस्यांकडून कोणताही अर्ज न मिळाल्यास, महिलांसाठी राखीव असणारे संचालकाचे उक्त पद, उक्त पाणी वापर संस्थेच्या इतर प्रादेशिक मतदार संघामध्ये राहणाऱ्या महिला सदस्यांकडून अर्ज मागवून भरण्यात येईलः

परंतु आणखी असे की, पहिल्या परंतुकात तरतुद केल्याप्रमाणे कोणत्याही महिला सदस्यांकडून कोणताही अर्ज न आल्यास, महिलांसाठी राखीव असलेले पद, नियम २१ मधील रिक्त पदे भरण्यासाठी निर्धारित केलेली कार्यपध्दती लागू करुन कोणत्याही सदस्याच्या नामानिर्देशनाने भरण्यात येईल.

(५) पोटनियम ३ आणि ४ खालील अर्ज, उक्त पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षाच्या निवडणुकीच्या दिनांकापासून ७ दिवसाच्या कालावधीत मागविण्यात येतील. असे अर्ज मिळाल्यानंतर व्यवस्थापन समिती, अर्ज स्वीकारण्यासाठी अंतिम

केलेल्या दिनांकापासून ३ दिवसाच्या आत एक बैठक बोलाविल. अशा बैठकीत व्यवस्थापन समितीचे निवडून आलेले संचालक अर्जदारामधून अनुसुचित जातीच्या किंवा अनुसूचीत जमातीच्या किंवा यथास्थिती, महिला संचालकांना बहुमताने निर्देशित करतील.

(६) नामनिर्देशित संचालकांना अध्यक्षाच्या निवडणुकीत मत देण्याचा अधिकार आणि पाणी वापर संस्थेच्या अध्यक्षाच्या पदाकरीता निवडणूक लढविण्याचा अधिकार याखेरीज निवडून आलेल्या संचालकांस असणारे सर्व अधिकार असतील.

(७) निवडणूक अधिकारी, प्रादेशिक मतदार संघाच्या प्रत्येक सुरुवातीच्या, मधल्या आणि शेवटच्या भागामधून संचालकाच्या यथास्थिती दोन किंवा तीन पदाकरीता आणि नियम ६ च्या पोट नियम (१) मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रादेशिक मतदार संघातील सुरुवातीच्या, मधल्या आणि शेवटच्या अशा प्रत्येक भागाकरीता एक या प्रमाणे संचालकाच्या पदाकरीता त्या त्या भागातील महिला सदस्यांकडून अर्ज मागवील.

(८) प्रादेशिक मतदार संघातील सुरुवातीच्या किंवा मधल्या किंवा शेवटच्या भागामधून निवडणुक लढविण्याकरीता सदस्य हा त्या विशिष्ट भागातीलच असला पाहिजे. एखादा भूधारक किंवा भोगवटादार एकाहून अधिक प्रादेशिक मतदार संघाच्या भागातील पाणी वापर संस्थेच्या कार्यक्षेत्रामधील जमीन धारण करीत असेल किंवा तिचा भोगवटा करीत असेल तर तसा सदस्य जोडपत्र-२ च्या नमुना सहा मधील निवडणूक अधिकाऱ्यास सादर केलेला नामनिर्देशपत्रामध्ये त्यांनी पसंती दर्शविलेल्या केवळ एकाच प्रादेशिक मतदार संघातून संचालकाच्या पदाकरीता निवडणूक लढविण्यास पात्र असेल.

(९) पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीची निवडणूक घेण्याची कार्यपध्दती जोडपत्र-२ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असेल. अशा निवडणुका घेताना कालवा अधिकारी, खुल्या आणि निःपक्ष निवडणुकांसाठी जलसंपदा विभागाने वेळोवेळी काढलेल्या आदेशांचे किंवा निदेशांचे अनुसरण करील.

(१०) पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या अगदी पहिल्या निवडणुकीचा खर्च राज्य शासन करील. एखाद्या पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीचे सर्व संचालक बिनविरोध निवडून आले असतील तर, संचालकाची निवडणुकीच्या प्रक्रियेसाठी येणा-या

संभाव्य अदमासे खर्चाइतकी रक्कम, संबंधित पाणी वापर संस्थेस शासनाकडून अनुदान म्हणून प्रदान करण्यात येईल. ही अदमासे खर्चाची रक्कम समुचित प्राधिका-याकडून निश्चित करण्यात येईल आणि ती अंतीम असेल. तथापि, नंतरच्या निवडणूका घेण्यावरील सर्व खर्च संबंधित पाणी वापर संस्था करील.

(११) टंचाई, अवर्षण, पूर, आग यासारखी अपवादात्मक परिस्थिती किंवा इतर कोणतीही नैसर्गिक आपत्ती किंवा राज्य विधानमंडळाची किंवा संसदेची किंवा एखाद्या स्थानिक प्राधिकरणाची कोणतीही निवडणूक व कोणत्याही पाणी वापर संस्थेची निवडणूक एकाच वेळी येणे यासारखी किंवा समुचित प्राधिकाऱ्याच्या मते अपवादात्मक असतील अशी इतर कोणतीही कारणे ज्यामुळे कोणत्याही पाणी वापर संस्थेच्या निवडणूका घेणे लोकहिताचे असणार नाही, अशा बाबतीत, समुचित प्राधिका-यास लेखी स्वरुपात कारणे नमूद करुन, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, कोणत्याही पाणी वापर संस्थेच्या निवडणुका एका वर्षापेक्षा अधिक असणार नाही इतक्या कालावधीकरिता पुढे ढकलता येतील.

(१२) कालवा अधिकाऱ्यास निवडणुका होईपर्यन्त आणि व्यवस्थापन समिती घटित होईपर्यन्त नियम ६ मध्ये तरतुद केल्याप्रमाणे तशीच संरचना असलेली तदर्थ व्यवस्थापन समिती नेमता येईल आणि कोणत्याही परिस्थितीत अशा तदर्थ व्यवस्थापन समितीची मुदत एका सिंचन वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

(१३) पोट-नियम (१) ते (१२) च्या तरतुदी, पाणी वापर संस्थेच्या वितरिकास्तरीय पाणी वापर संस्थेच्या , कालवास्तरीय पाणी वापर संस्थेच्या, प्रकल्पस्तरीय पाणी वापर संस्थेच्या आणि उपसा सिंचन पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या निवडणुकांना योग्य त्या फेरफारासह, लागू होतील.

८ *लघु वितरिकास्तरावरील पाणी वापर संस्थेच्या अध्यक्षाची निवडणूक :* (१) कालवा अधिकारी विविध शासकीय अभिकरणाचे, आवश्यक असेल तेव्हा सहाय्य मिळण्याबरोबरच संबंधित लघु वितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थेच्या अध्यक्षाची निवडणूक घेण्याची व्यवस्था करील. निवडणुका घेण्याची कार्य पध्दती जोडपत्र-२ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे आहे.

(२) लघु वितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या संचालकांच्या निवडणुका पाड पाडल्यानंतर, व्यवस्थापन समितीची पहिली बैठक, निकाल घोषित झाल्यापासून तीस दिवसाच्या आत, घेण्यात येईल. कालवा अधिकाऱ्याने प्रारंभी ठरविल्याप्रमाणे, एकतर हात वर करुन किंवा गुप्त मतदानामार्फत पाणी वापर संस्थेचा अध्यक्ष निवडून आलेल्या संचालकांमधून सरळ बहुमताद्वारे निवडून देण्यात येईल.

(३) अध्यक्षाचा पदावधी अध्यक्ष म्हणून निवडून आल्याच्या दिनांकापासून २ वर्षापर्यन्त असेल आणि अध्यक्षाचे पद शेवटच्या, मधल्या व सुरुवातीच्या भागातील संचालकांना आळीपाळीने अशारितीने देण्यात येईल की, पहिला अध्यक्ष शेवटच्या भागातून निवडून येईल, नंतरचा मधल्या कार्यक्षेत्रातून आणि त्यानंतरचा अध्यक्ष सुरुवातीच्या भागातून निवडण्यात येईल.

परंतु पहिल्या दोन पदावधीसाठी व्यवस्थापन समितीच्या महिला संचालकाची अध्यक्ष म्हणून निवड झालेली नसेल तर जोवर महिला संचालकाची अध्यक्ष म्हणून निवड होत नाही तोवर तिस-या अध्यक्षाचा पदावधी हा केवळ व्यवस्थापन समितीच्या महिला संचालकासाठीच राखीव असेल.

(४) पोट-नियम (१) ते (३) च्या तरतुदी वितरिकास्तरीय पाणी वापर संस्थेच्या, कालवास्तरीय पाणी वापर संस्थेच्या, प्रकल्पस्तरीय पाणी वापर संस्थेच्या आणि उपसा सिंचनाच्या पाणी वापर संस्थांच्या अध्यक्षांच्या निवडणूकीना योग्य त्या फेरफारासह लागू होतील.

९. *सचिवाची नियुक्ती, सेवेच्या शर्ती, अर्हता आणि त्याला देय असलेले वेतन व भत्ते:*

(१) लघु वितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थेच्या सचिवाची नियुक्ती पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीद्वारे प्रारंभी किमान एका संपूर्ण सिंचन वर्षासाठी कंत्राटी तत्वावर करण्यात येईल. एक वर्षाचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, अशाप्रकारे नियुक्त केलेल्या सचिवांचे काम समाधानकारक आहे असे आढळून आल्यास व्यवस्थापन समितीला त्याचा कंत्राट कालावधी योग्य वाटेल इतक्या कालावधीपर्यन्त कंत्राटाचे नवीकरण करुन, वाढविता येईल.

(२) सचिवाच्या पदाकरिता, सेवेच्या अटी व शर्ती, व्यवस्थापन समिती निश्चित करील.

(३) (क) ज्या व्यक्तीने (एक) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केली आहे.

(दोन) जिचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नाही.

(तीन) जिला मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आहे, अशा अर्हताप्राप्त व्यक्तीची सचिव म्हणून नियुक्ती करता येईल.

(ख) (एक) कोणत्याही सहकारी संस्थेत किंवा ग्रामीण क्षेत्रातील पाणी वापर संस्थेत, कामाचा पूर्वानुभव असलेली व्यक्ती, आणि

(दोन) जल व भूव्यवस्थापन संस्थेकडून किवा तत्सम संस्थेकडून प्रशिक्षण घेतलेली व्यक्ती, आणि

(तीन) सेवानिवृत्त शिक्षक किंवा सेवानिवृत्त शासकीय कर्मचारी किंवा माजी सैनिक असलेली व्यक्ती, यांना प्राधान्य देण्यात येईल.

(४) सचिवाचे वेतन व भत्ते हे पाणी वापर संस्थेची व्यवस्थापन समिती, सचिवाचे कार्यक्षेत्र आणि त्यांने पार पाडणे आवश्यक असणाऱ्या जबाबदाऱ्या विचारात घेवून निश्चित करील. अशाप्रकारे निश्चित केलेले वेतन व भत्ते, संबंधित पाणी वापर संस्थेकडून केवळ प्रदान करण्यात येतील आणि शासन अशा कोणत्याही प्रदानास किंवा अशा कोणत्याही दायित्वास कोणत्याही प्रकारे जबादार असणार नाही.

(५) सचिव, संबंधित पाणी वापर संस्थेच्या क्षेत्रांतर्गत भागात निवास करील आणि आर्थिक जबाबदारीसाठी तो संबंधित पाणी वापर संस्थेबरोबर तो क्षतीपूर्ती बंधपत्र करील.

(६) पोट-नियम (१), (२), (३), (४) आणि (५) च्या तरतुदी वितरिकास्तरीय पाणी वापर संस्था, कालवास्तरीय पाणी वापर संस्था, प्रकल्पस्तरीय पाणी वापर संस्था आणि उपसा सिंचन पाणी वापर संस्था यांच्या सचिवाला योग्य त्या फेरफारांसह लागू होतील.

१०. *परत बोलाविण्यासाठीची कार्यपध्दती :* कोणत्याही स्तरावरील पाणी वापर संस्थेच्या सदस्यांची, पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या कोणत्याही संचालकाला

परत बोलाविण्याचा प्रस्ताव मांडण्याची इच्छा असल्यास जोडपत्र-२ मधील नमूना ११ नुसार ते तशी नोटीस संबंधित कालवा अधिकाऱ्याकडे देतील. कालवा अधिकारी, जोडपत्र-२ च्या भाग-७ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करील.

११. *उप समित्या घटित करणे :* (१) कलम २० मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, लघु वितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थेची व्यवस्थापन समिती, उप समित्या घटित करील. या उप समित्यांमध्ये, विशेषतः कृषि, जलव्यवस्थापन पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विकासाशी संबंधित बाबी विचारात घेऊन, अशा पाणी वापर संस्थेत निहित असलेली वेगवेगळी कर्तव्ये पार पाडण्यासाठी प्रत्येकी किमान ३ सदस्यांचा समावेश असेल.

(२) अशा उप समित्यांचे सदस्य, एकतर आपल्या संचालकांमधून किंवा सर्व सदस्य मंडळाच्या सदस्यांमधून आणि आवश्यक असेल तर, बाहेरील व्यवसायिकांमधून, पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीकडून नामनिर्देशित करण्यात येतील.

(३) प्रत्येक उप समितीचा अध्यक्ष देखील उप समितीच्या सदस्यांमधून, व्यवस्थापन समितीकडून नियुक्त करण्यात येईल.

(४) अशा उपसमितीचे काम सल्लागार स्वरुपाचे असेल आणि तिचा सल्ला शिफारशींच्या स्वरुपात असेल. व्यवस्थापन समितीला अशा उप समितीच्या शिफारशींवर अंतीम निर्णय घेण्याचा अधिकार असेल.

(५) पोट-नियम (१), (२), (३) व ४ च्या तरतुदी फेरफारासह वितरिकास्तरीय पाणी वापर संस्था, कालवास्तरीय पाणी वापर संस्था, प्रकल्प स्तरीय पाणी वापर संस्था व उपसा सिंचन पाणी वापर संस्था यांच्या उप समित्यांना लागू असतील.

१२. *करारनामा :* (१) पाणी वापर संस्था किंवा कालवा अधिकारी यांच्यामध्ये समुचित प्राधिकरणाने विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यात करारनामा करण्यात येईलः-

परंतु, लघु वितरिकास्तरावरील पाणीवापर संस्थाखेरीज सर्व उच्चस्तरीय पाणी वापर संस्थांनी, प्रतिभूती ठेव म्हणून वार्षिक पाणीपट्टीच्या ५० टक्के इतक्या रकमेची बँक हमी दिली पाहिजे.

(२) असा करारनामा, करारनाम्यातील संबंधित पक्षकाराकडून किंवा त्यांच्या कायदेशीर उत्तराधिकाऱ्याकडून रद्द करण्यात येत नाही तो पर्यन्त वैध असेल, आणि करारनाम्यातील पक्षकाराच्या परस्पर संमतीने कोणत्याहीवेळी त्यात फेरबदल करता येवू शकेल.

(३) अशा करारनाम्याची नोंद, नमुना-अ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यात जलसंपदा विभागाकडून ठेवण्यात येईल.

१३. *दुरुस्ती व नुतनीकरणाच्य कामामधील सहभाग :* दुरुस्ती व नुतनीकरणाच्या कामामधील पाणी वापर संस्थांचा सहभाग शासनाकडून वेळोवेळी निर्धारित करण्यात येईल, त्यानुसार असेल.

१४. *प्रवाहमापन, त्याची नोंदी व प्रवाह मापन साधनांचे नियतकालिक मूल्यमापन :*

अचूक प्रवाहमापन पध्दती तिची योग्य नोंद मापन साधनांचे नियतकालिक मूल्यमापन आणि ज्या कालावधीत मापन साधने नादुरुस्त झालेली असतील अशा कालावधीतील पाण्याचे घनफळ निश्चित करणे, या बाबी जोडपत्र-३ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असतील.

१५. *सिंचन जलाचा पुनर्वापर करण्याचे व भूजलाचा वापर करण्याचे स्वातंत्र्य* (१) सर्व स्तरावरील पाणी वापर संस्था, पाणी खारट होण्याच्या व जमिनी पाणथळ होण्याच्या घटना टाळण्यासाठी, भूस्तरापासून ३ मीटरमधील त्यांच्या कार्यक्षेत्रामधील भूजलपृष्ठाचे परिरक्षण करण्यासाठी शक्य त्या सर्व उपाययोजना हाती घेईल. ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी ती पाणी वापर संस्था भूजलाच्या वापराचे योग्य प्रचालन करील.

(२) एखाद्या प्रकल्पामधील पाणी पुरवठयाची समन्याय्यता सुनिश्चित करण्यासाठी आणि पर्यावरण रक्षणासाठी, समुचित प्राधिकरण, जेव्हाजेव्हा व जेथे जेथे आवश्यक असल्याचे आढळून येईल, तेव्हा तेव्हा व तेथे तेथे भूजल वापरावर पुढीलपैकी कोणतेही निर्बंध लादिलः-

(क) आडव्या किंवा पार्श्व विंधन विहिरी काढण्यात येणार नाहीत.

(ख) विंधन विहिरीच्या विवरांची/छिद्रांची किंवा खोदलेल्या विहिरींची खोली समुचित

प्राधिकाऱ्याने विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असेल.

(ग) पाणी वापर संस्था केवळ आपल्या कार्यक्षेत्रातील भूजलाचाच वापर करतील. तथापि, समुचित प्राधिकरी, तो मान्य करील अशा वैध प्रयोजनासाठी केवळ पाणी वापर संस्थेची कार्यक्षेत्राबाहेरील भूजलाचा वापर करण्यास परवानगी देवू शकेल.

१६. पाणी वापर संस्थेवर तिला पाणी पुरवठा केल्याबद्दल पाणीपट्टी व किमान आकार आकारण्याचा अधिकार :

समुचित प्राधिकाऱ्यास, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाकडून वेळोवेळी निर्धारित करण्यात येईल त्याप्रमाणे पाणी वापर संस्थेवर तिला पाणी पुरवठा केल्याबद्दल पाणीपट्टी व किमान आकार आकारण्याचा अधिकार असेल.

१७ पाणीपट्टीच्या मागील थकबाकीची वसुली :

सर्व स्तरावरील पाणी वापर संस्थांना वसूल केलेल्या मागील थकित रकमेपैकी वेळोवेळी शासनाकडून ठरविण्यात येईल इतके टक्के रक्कम स्वतःकडे ठेवण्याची मूभा असेल.

१८ हक्कानुसार पाणीपुरवठा : महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने (एम.डब्ल्यु.आर.आर.अे.) किंवा नदीखोरे अभिकरणाने (आर.बी.अे.) ठरविल्याप्रमाणे समुचित स्तरावरील पाणी वापर संस्थेला करारनाम्यानुसार वेळोवेळी अनुज्ञेय हक्काच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येईल. पाणी वापर संस्थेच्या प्रत्येक सदस्यास, अनुज्ञेय हक्काच्या पाण्याच्या प्रमाणात पाणी मिळत आहे, याचे संनियंत्रण करणे व सुनिश्चिती करणे, ही कालवा अधिकाऱ्याची जबाबदारी असेल.

१९ पाणी वापर संस्थांच्या पदाधिकाऱ्यांचे व सचिवाचे सर्वसाधारण अधिकार : या अधिनियमात किंवा त्याखाली केलेल्या नियमात अन्यथा तरतूद केलेली नसेल तर कोणताही संचालक किंवा व्यवस्थापन समितीने त्याबाबतीत विनिर्देशपूर्वक अधिकार दिलेला सचिव, या अधिनियमाची उद्दीष्टे साध्य करण्यासाठी पाणी वापर संस्थेची कामे पार पाडील.

२० अतिक्रमणे हटविणे : जर पाणी वापर संस्थेच्या कार्यक्षेत्रात कोणतीही अतिक्रमणे असतील तर, कोणत्याही स्तरावरील संबंधित पाणी वापर संस्था अतिक्रमणे हटविण्यासाठी पुढील उपाययोजना करील ;

(१) व्यवस्थापन समितीच्या बैठकीत अतिक्रमणाविषयी चर्चा करील व त्यानुसार निर्णय घेईल.

(२) व्यवस्थापन समितीने घेतलेल्या निर्णयानुसार, पाणी वापर संस्था उक्त अतिक्रमण हटविण्यासाठी प्रयत्न करील.

(३) अतिक्रमण हटविण्यात अपयश आल्यास अतिक्रमण हटविण्याबाबत समितीने घेतलेला निर्णय व त्यासाठी केलेले प्रयत्न या विषयी व्यवस्थापन समिती संबंधित कालवा अधिकाऱ्याला लेखी माहिती कळविल.

(४) अतिक्रमणाबाबतचे सर्वेक्षण पार पाडण्यात आणि त्याबाबतचा अधिकृत अहवाल तयार करण्यात संबंधित कालवा अधिकाऱ्यास मदत करील.

(५) शासनाने वेळोवेळी दिलेल्या निदेशानुसार अतिक्रमण हटविण्यात संबंधित कालवा अधिकाऱ्यास सहाय्य करील.

२१ रिक्त जागा भरणे : मृत्यू, राजीनामा, पदावरुन परत बोलाविणे, अपात्रता या कारणांमुळे किंवा इतर कोणत्याही कारणांमुळे व्यवस्थापन समितीच्या संचालकाचे रिक्त होणारे पद, संबंधित पाणी वापर संस्थेच्या कोणत्याही पात्र सदस्याच्या नामनिर्देशनाद्वारे समितीकडून भरण्यात येईल. असे नामनिर्देशन असे पद रिक्त झाल्याच्या दिनांकापासून ४५ दिवसांच्या कालावधीच्या आत करण्यात येईल. सर्वसामान्यपणे व्यवस्थापन समितीच्या बैठकीत सर्वानुमते संमत केलेल्या ठरावाद्वारे असे नामनिर्देशन करण्यात येईल, असे रिक्त पद भरण्यासंबंधी सर्वानुमते निर्णय झाला नाही तर, तो निर्णय उपस्थित संचालकांच्या बहुमताने आणि हात वर करुन किंवा आवाजी मताने घेण्यात येईल.

२२ इतर लेखे, अभिलेखे व दस्तऐवज : पाणी वापर संस्थेने ठेवलेली लेखा पुस्तके व अन्य अभिलेख, अशा संस्थेच्या सर्व सदस्यांच्या माहितीसाठी पाणी वापर संस्थेच्या कार्यालयात कोणत्याही कामाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत विनामूल्य खुले असतील.

तथापि जर कोणत्याही सदस्यास कोणत्याही दस्तऐवजाची प्रत हवी असेल तर ती लेखी मागणी केल्यावर आणि व्यवस्थापन समितीने वेळोवेळी ठरवून दिलेली फी प्रदान केल्यावर संबंधित पाणी वापर संस्थेकडून उपलब्ध करुन देण्यात येईल.

२३ पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीचे विसर्जन आणि तात्पुरती व्यवस्था : कोणत्याही स्तरावरील कसुरदार पाणी वापर संस्था विसर्जित करण्यापूर्वी, संबंधित समुचित प्राधिकरणाकडून पुढील उपाय योजण्यात येतील :-

(एक) पाणी वापर संस्थेने केलेल्या चुका किंवा कसूर नमूद करुन कारणे दाखवा नोटीस काढणे ;

(दोन) नोटीसीमध्ये दर्शविलेल्या चुका किंवा कसूरीसंबंधात कसूरदार पाणी वापरा संस्थेचे कार्य सुधारण्यासाठी आवश्यक ते मार्गदर्शन व समुपदेशन करणे ;

(तीन) अशी कारणे दाखवा नोटीस काढल्याच्या दिनांकापासून ६ महिने, पाणी वापर संस्थेच्या कामावर बारीक लक्ष ठेवणे ;

(चार) वर नमूद केलेले उपाय योजण्यात आल्यानंतर सुध्दा, समुचित प्राधिकरणाचे समाधान होईल अशी कोणतीही सुधारणा त्या पाणी वापर संस्थेच्या कामात दिसून आली नाही तर, समुचित प्राधिकरण, निकटतम उच्चस्तरीय पाणी वापर संस्थेशी किंवा, यथास्थिती, कालवा अधिकाऱ्याशी विचारविनिमय करुन अशा कसुरदार पाणी वापर संस्थेला विसर्जित करील :-

(पाच) व्यवस्थापन समिती विसर्जित करण्यासाठीचे समुचित प्राधिकरण पुढीलप्रमाणे असेल.

प्रकल्प	समुचित प्राधिकरण
क) मोठया व मध्यम प्रकल्पांसाठी	
१. प्रकल्पस्तरावरील पाणी वापर संस्था	मुख्य अभियंत्याने शिफारशी केल्यानंतर, शासन
२. कालवास्तरावरील पाणी वापर संस्था	अधीक्षक अभियंत्याने शिफारशी केल्यानंतर, मुख्य अभियंता.
३. वितरिका स्तरावरील पाणी वापर संस्था आणि लघु वितरिका स्तरावरील पाणी वापर संस्था.	कार्यकारी अभियंत्याने शिफारशी केल्यानंतर, अधीक्षक अभियंता.
ख) लघु प्रकल्पांसाठी प्रकल्पस्तरावरील पाणी वापर संस्था आणि लघु वितरिका पाणी वापर स्तरावरील संस्था	कार्यकारी अभियंत्याने शिफारशी केल्यानंतर अधीक्षक अभियंता.

(सहा) कलम ३७ च्या पोट-कलम (१) अन्वये व्यवस्थापन समिती पुनर्घटित करण्यात आल्यानंतर सुध्दा जर अशी पुनर्घटित व्यवस्थापन समिती कार्य करणार नसेल तर, समुचित प्राधिकरणास, निकटतम उच्चस्तरीय पाणी वापर संस्थेशी विचारविनिमय करुन, अशा पुनर्घटित व्यवस्थापन समितीला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर ती समिती विसर्जित करता येईल आणि अशा पाणी वापर संस्थेचे व्यवस्थापन निकटतम उच्च स्तरीय पाणी वापर संस्थेकडे किंवा, यथास्थिति, संबंधित कालवा अधिकाऱ्याकडे सुपूर्द करण्याची व्यवस्था करता येईल.

प्रकरण-तीन

उपसा सिंचन पाणीवापर संस्था

२४. *उपसा सिंचन पाणीवापर संस्थेचे कार्यक्षेत्र निश्चीत करणे*

(१) नियम-३ च्या परंतुकाच्या अधीन राहून, जलाशय किंवा कोल्हापूर पध्दतीचा बंधारा किंवा बांध किंवा नदी किंवा कालवा किंवा साठवण तलाव यांवरील उपसा सिंचन पाणी वापर संस्थेच्या निश्चित करण्यात आलेल्या कार्यक्षेत्रात पुढील सर्वांना संबंधित उपसा सिंचन पाणी वापर संस्थेचे सदस्य समजण्यात येईल :-

(क) विद्यमान वैयक्तिक उपसा सिंचन योजनांचे सर्व मालक,

(ख) विद्यमान सहकारी उपसा सिंचन योजनांचे सर्व सदस्य

(ग) जमीनमालक किंवा भोगवटादार यांची संयुक्त मालकी असलेल्या विद्यमान उपसा सिंचन योजनेचे सर्व सदस्य.

(२) शासनाच्या जलसंपदा विभागाद्वारे वेळावेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या मार्गदर्शक तत्वांनुसार, अधिनियमाखालील सर्व उपसा सिंचन योजनांना मंजुरी देण्यात येईल.

(३) उपसा सिंचन पाणीवापर संस्थेच्या बाबतीत, तिचा उच्चस्तरीय संस्थेशी जोडण्यात आल्यास, असलेला संबंध पुढीलप्रमाणे असेलः-

अ.क्र.	प्रवर्ग	संबंध
१	कालव्यांमधून व्यक्तिगत उपसा सिंचनास मंजुरी असलेल्या व्यक्ती.	जवळच्या लघु वितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थेचा सदस्य म्हणून समावेश करण्यात यावा.
२	कालव्यावरील उपसा सिंचन पाणी वापर संस्था	संबंधित कालवास्तरीय पाणी वापर संस्थेमध्ये समावेश करण्यात यावा. कालव्यावरील अशा उपसा सिंचन पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य, संबंधित कालवा स्तरीय पाणी वापर संस्थेच्या सर्वसाधारण सभेचे सदस्य असतील.
३	जलाशयावरील उपसा सिंचन पाणीवापर संस्था	संबंधित प्रकल्पस्तरीय पाणी वापर संस्थेमध्ये समावेश करण्यात यावा. उपसा सिंचन पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य संबंधित प्रकल्पस्तरीय पाणी वापर संस्थेच्या सर्वसाधारण

		सभेचे सदस्य असतील.
४	पाटबंधारे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील नद्यांवरील कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यावरील उपसा सिंचन पाणी वापर संस्था	संबंधित प्रकल्पस्तरीय संस्थेमध्ये समावेश करण्यात यावा. लाभक्षेत्रातील नद्यांवरील उपसा सिंचन पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य संबंधित प्रकल्प स्तरीय संस्थेच्या सर्वसाधारण सभेचे सदस्य असतील.
५	धरणाकडून उद्ग्रहण बंधाऱ्या पर्यन्तच्या (पीक अप वीअर) नदी प्रवाहावरील उपसा सिंचन पाणी वापर संस्था.	संबंधित प्रकल्पस्तरीय पाणी वापर संस्थेमध्ये समावेश करण्यात यावा. धरणाकडून उद्ग्रहण बंधाऱ्याकडे जाणाऱ्या नदयांवरील उपसा सिंचन पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य संबंधित प्रकल्प स्तरीय पाणी वापर संस्थेच्या सर्वसाधारण सभेचे सदस्य असतील.
६	नद्दयांवरील, कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यावरील उपसा सिंचन पाणी वापर संस्था (राखीव जलसाठा असलेल्या)	(क) कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यावर उपसा सिंचन पाणी वापर संस्थांची संख्या जास्त असली तर, अशा उपसा सिंचन पाणी वापर संस्थांचा कोल्हापूर पध्दतीचे बंधारे स्तरावरील उपसा सिंचन पाणी वापर संस्थांमध्ये प्रथम समावेश करण्यात येईल. (ख) कोल्हापूर पध्दतीचे बंधाऱ्यावरील उपसा सिंचन पाणी वापर संस्थाचा संबंधित प्रकल्पस्तरीय पाणी वापर संस्थांमध्ये समावेश करण्यात येईल. (ग) निम्न स्तरीय उपसा सिंचन पाणी वापर संस्थांच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य संबंधित उच्चस्तरीय पाणी वापर संस्थेच्या सर्वसाधारण सभेचे सदस्य असतील.
७	नदयांवरील कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांवरील उपसा सिंचन पाणी वापर सस्था (राखीव जलसाठा नसलेल्या)	(क) कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यावर उपसा सिंचन पाणी वापर संस्थांची संख्या जास्त असल्यास अशा उपसा सिंचन पाणी वापर संस्थांच्या कोल्हापूर पध्दतीचे बंधारे स्तरावरील उपसा सिंचन पाणी वापर संस्थांमध्ये प्रथम समावेश करण्यात येईल्. (ख) निम्न स्तरीय उपसा सिंचन पाणी वापर संस्थांच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य संबंधित उच्चस्तरीय पाणी वापर संस्थेच्या सर्वसाधारण सभेचे सदस्य असतील.

(४) उपसा सिंचन पाणी वापर संस्था, त्यांना अनुज्ञेय असलेल्या हक्काच्या पाण्याचा सलग ५ वर्षाच्या कालावधीसाठी पूर्ण वापर करीत नसल्याचे आढळून आल्यास, (प्रत्यक्ष वापर ७० टक्याहून कमी असल्यास) कार्यकारी अभियंता या पदाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला कालवा अधिकारी, संबंधित उपसा सिंचन पाणी वापर संस्थांना पाण्याच्या कमी वापरासंबंधीचे आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर त्या उपसा सिंचन पाणी वापर संस्थेला दिलेल्या हक्काच्या पाण्याच्या प्रमाणात सुधारणा करण्याची व्यवस्था करील. उपसा सिंचन पाणी वापर संस्थेचे निश्चित करुन देण्यात आलेले कार्यक्षेत्र देखील उपरोक्त कारणांसाठी त्यात सुधारणा केली जाण्यास पात्र असेल.

२५. *उपसा सिंचन पाणी वापर संस्थेला वीज पुरवठा :* (१) या बाबत यथोचितरीत्या अधिकार प्रदान करण्यात आलेला कालवा अधिकारी, उपसा सिंचन पाणी वापर संस्थेचे अध्यक्ष किंवा प्रतिनिधी यांच्याबरोबर बैठक घेऊन पाणी उपसण्याचे क्षेत्रनिहाय व

हंगामनिहाय वेळापत्रक ठरवील. उपसा सिंचन पाणी वापर संस्था आणि उपसा सिंचन योजनांचे वैयक्तिक मालक, या वेळापत्रकाचे काटेकोरपणे पालन करतील.

(२) या बाबत यथोचितरित्या अधिकार प्रदान करण्यात आलेल्या कार्यकारी अभियंत्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेल्या कालवा अधिकाऱ्याने आदेश दिल्यानंतरच उपसा सिंचन पाणी वापर संस्थांना किंवा उपसा सिंचन योजनांच्या व्यक्तिगत मालकांना वीज जोडणी विद्युत पुरवठादाराकडून पुरविण्यात येईल.

(३) कोणतीही उपसा सिंचन पाणी वापर संस्था किंवा उपसा सिंचन योजनांचे वैयक्तिक मालक यांनी या नियमाच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन केल्यास उपसा सिंचन योजनेची अशी जोडणी काढून टाकण्यात यावी किंवा त्यांची वीज तोडण्यात यावी अशा अर्थाचा आदेश कालवा अधिकाऱ्याने दिल्यास, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून किंवा वीज पुरवठादाराकडून तसे करण्यात येईल :

परंतु, असा कोणताही आदेश देण्यापूर्वी कालवा अधिकारी, अशा उपसा सिंचन पाणी वापर संस्थांना किंवा यथास्थिती, उपसा योजनांच्या वैयक्तिक मालकांना स्वतःची बाजू मांडण्याची वाजवी संधी देईल.

पोटनियम (३) खालील कालवा अधिकाऱ्याचा कोणताही आदेश, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ किंवा वीज पुरवठाकार (अभिकरण) यांना बंधनकारक असेल आणि ते त्याची तात्काळ अंमलबजावणी करतील.

२६. *उपसा सिंचन पाणी वापर संस्थेसाठी पाणीपट्टी दर निश्चीत करणे* : समुचित प्राधिकरण, उपसा सिंचन पाणी वापर संस्थेसाठी पाण्याच्या घनफळाच्या आधारे पाणीपट्टीचे दर ठरवून ते अधिसूचित करतील. अशा पाणीपट्टीच्या दरांचा समुचित प्राधिकरणास जेव्हा व जसा आढावा घेणे किंवा त्यात सुधारणा करणे योग्य वाटेल त्या प्रमाणे, नियतकालांतराने त्या दरांचा आढावा घेण्यात येईल व त्यामध्ये सुधारणा करण्यात येईल.

प्रकरण ४

समुचित प्राधिकरणाचा वार्षिक सिंचन स्थितीदर्शक अहवाल, त्रिपक्षीय करार आणि इतर कार्ये

२७. *वार्षिक सिंचन स्थितीदर्शक अहवाल* : शासनाला वार्षिक सिंचन स्थितीदर्शक अहवाल प्रसिध्द करणे शक्य व्हावे यासाठी कालवा अधिकारी संबंधित पाणी वापर संस्थेकडून संबंधित माहिती गोळा करुन ती संकलित करील. पाणी वापर संस्था, जोडपत्र-४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या किंवा संबंधित कालवा अधिकाऱ्याने मागविलेल्या नमुन्यात व वेळेत अशी आवश्यक माहिती पुरवील.

२८. *त्रिपक्षीय करार* : पाणी वापर संस्थेला आपल्या सर्व सदस्यांच्या संमतीने आपल्या पाण्याचा वाटा देण्यासाठी स्वतः पाणी वापर संस्था, कालवा अधिकारी आणि खाजगी संस्था किंवा कंपनी यांच्यात वार्षिक त्रिपक्षीय करार करता येईल प्रत्येक वर्षाच्या शेवटी करारातील सर्व पक्षकारांना परस्पर संमतीने नवीन करार करता येईल असे करार करताना पुढील मुद्यांचे शक्य तेवढे पालन करण्यात येईल.

(१) त्रिपक्षीय करार करण्यासाठी आणि त्याचे नवीकरण किंवा त्यामध्ये कोणतेही फेरबदल करावयाचे असल्यास ते करण्यासाठी पाणी वापर संस्थेला सर्वसाधारण सभेच्या ठरावाच्या स्वरुपात तिच्या सर्व सदस्यांची संमती असणे आवश्यक असेल.

(२) त्रिपक्षीय कराराचा मसुदा संबंधित कालवा अधिकाऱ्याकडून तयार करण्यात येईल आणि त्यास त्रिपक्षीय करारातील सर्व पक्षकारांची संमती असेल व सर्व पक्षकार मिळून त्यास अंतिम स्वरुप देतील. पाणी वापर संस्था, पाणी वापर हक्क, पाणी वापर संस्थेच्या कार्यक्षेत्रातील जमीन, पीक, हवामान आणि ओलिताखालील शेतीशी निगडीत असलेले अन्य संबध्द सामाजिक व आर्थिक पैलू या सर्वांचा यथोचित विचार करुन त्रिपक्षीय करारातील संबंधित पक्षकारांकडून मूळ मसुदा किंवा सुधारित स्वरुपातील मसुदा किंवा नव्याने तयार केलेला मसुदा तयार करण्यात येईल.

(३) समुचित प्राधिका-याचा प्रतिनिधी या नात्याने अधिनियमामध्ये करण्यात आलेल्या तरतुदी व त्याखाली करण्यात आलेले नियम यांनुसार करार करण्यात आला आहे किंवा कसे याबाबतची तपासणी करण्याची तसेच कालवा पध्दती व शासकीय मालमत्ता यांचे जतन व संरक्षण करण्याची जबाबदारी कालवा अधिकाऱ्याची असेल.

(४) खाजगी संस्थेने किंवा कंपनीने, पाणी वापर संस्थेला पुरवावयाच्या सेवांच्या संबंधातील अटी आणि शर्ती ठरविण्याची जबाबदारी अशी खाजगी संस्था किंवा कंपनी व पाणी वापर संस्था यांचीच असेल. अशा सेवा किंवा कोणतीही नुकसानभरपाई किंवा त्रिपक्षीय कराराशी संबंधित अशा कोणत्याही प्रकरणासाठी कालवा अधिकारी व समुचित प्राधिकारी हे कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाहीत.

(५) त्रिपक्षीय करार हा केवळ पाणी वापर संस्थेच्या कार्यक्षेत्रामध्येच वैध असेल आणि तो केवळ ओलिताखालील शेतीशी संबंधित असेल.

(६) त्रिपक्षीय कराराच्या बाबतीत, जो विवाद किंवा संघर्ष निर्माण होईल तो खुद्द त्या त्रिपक्षीय करारामध्ये ज्या तरतुदी करण्यात आल्या असतील त्यानुसार मिटविण्यात येईल.

(७) त्रिपक्षीय कराराच्या मूळ प्रती ह्या करार केलेला प्रत्येक पक्षकार स्वतःकडे ठेवील. अशा कराराची प्रत, पाणी वापर संस्थेच्या संबंधित सदस्याला त्याने लेखी मागणी केल्यावरुन आणि कालवा अधिकाऱ्याने वेळोवेळी निश्चित केलेल्या शुल्काचे आगाऊ प्रदान केल्यानंतर उपलब्ध करुन देण्यात येईल.

२९. *समुचित प्राधिकरण व कालवा अधिकारी यांची इतर कार्ये :* इतर कोणतीही कार्ये, अधिकार आणि कर्तव्ये या व्यतिरिक्त समुचित प्राधिकारी व कालवा अधिकारी यांना खालील कार्ये पार पाडावी लागतील -

(क) **जोडपत्र पाच** मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मार्गदर्शक तत्वांच्या आधारे सर्व स्तरावरील पाणी वापर संस्थेचा अनुज्ञेय पाणी वापर हक्क समुचित प्राधिकाऱ्याकडून

निर्धारित व अधिसूचित करण्यात येईल ;

(ख) सर्वसाधारणपणे किंवा तुटीच्या किंवा शिलकी वर्षामध्ये समुचित प्राधिकरणाने अनुज्ञेय हक्काच्या पाण्याचे प्रमाण निर्धारित केल्यावर, त्या आधारे अनुज्ञेय हक्काच्या पाण्याचे प्रमाण अधिसूचित करण्याची आणि प्रत्येक वर्षी मान्य केलेल्या ठराविक अंतराने सर्व स्तरावरील पाणी वापर संस्थांना अनुज्ञेय हक्काच्या पाण्याच्या प्रमाणानुसार, घनमापन तत्वावर ठोक प्रमाणात पाणी पुरवठा केला जात असल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी कालवा अधिकाऱ्याची असेल ;

(ग) कलम १९ अन्वये कोणत्याही स्तरावरील पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या संचालकाला परत बोलाविण्यासंबंधीची कार्यपध्दती कालवा अधिकारी पार पाडील ;

(घ) कालवा अधिकारी पाणी वापर संस्थेशी करार करील ;

(ङ) कलम ३७ अन्वये व्यवस्थापन समिती पुनर्घटित होईपर्यन्तच्या कालावधीत कालवा अधिकारी व्यवस्थापन समितीची कार्ये पार पाडील ;

(च) पाणी वापर संस्थांना सहाय्य व तांत्रिक मार्गदर्शन पुरविण्याच्या दृष्टीने सक्षम प्राधिकरण कार्यक्षमरित्या कार्य करीत आहे यावर संनियंत्रण ठेवणे व त्याची सुनिश्चिती करणे ;

(छ) कलम-६३ च्या पोटकलम (२) अन्वये कालवा अधिकाऱ्याने प्रकल्प स्तरीय पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या सदस्यांमध्ये किंवा दोन किंवा अधिक प्रकल्पस्तरीय पाणी वापर संस्थांमध्ये उद्‌भवणारे तंटे वा मतभेद मिटविणे;

(ज) कलम-६४ च्या पोट-कलम (२) अन्वये, प्रकल्प स्तरावरील पाणी वापर संस्थेच्या कोणत्याही व्यवस्थापन समितीने दिलेल्या कोणत्याही निर्णयामुळे किंवा संमत केलेल्या आदेशामुळे बाधित झालेल्या कोणत्याही व्यक्तीने दाखल केलेल्या विनंती अर्जावर (अपीलावर) कालवा अधिकाऱ्याने निर्णय देणे ;

(झ) कालवा अधिकारी, पाणी पुरवठा संस्थांना केलेल्या पाणी पुरवठयासंबंधी विहित

रीतीने आकारणी केल्यानंतर, देयक देईल व त्याची वसुली करील **;**

(ञ) (पाणी पुरवठा योजनेच्या) कार्यक्रमाचा आराखडा व वार्षिक परिरक्षण आराखडा तयार करण्यासाठी मदत करणे **;**

(ट) शासनाच्या जलसंपदा विभागाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार निश्चित करण्यात आलेल्या दुरुस्तीच्या कामांची अंमलबजावणी करण्यासाठी अंदाजपत्रक तयार करणे **;**

(ठ) कार्यकारी अभियंत्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या कालवा अधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय मान्यताप्राप्त जलव्यवस्था मानकांच्या संदर्भात कालवा पध्दतीमध्ये पाणी वापर संस्थेने कोणताही फेरफार किंवा बदल केलेला नाही याची तपासणी करणे,

(ड) कालवा अधिकाऱ्याने पाणी वापर संस्थेच्या अध्यक्षास कालवा पध्दतीची तांत्रिक माहिती देणे,

(ढ) हंगामामधील बदलांनुसार करावयाच्या सुधारणांच्या सूचनेसह उपलब्ध मागणी व पुरवठयावर आधारित पाण्याचे नियमन करण्यासाठी सल्ला देणे,

(ण) पाणी वापर संस्थेच्या पाण्याचे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी मार्गदर्शन करणे **;**

(त) आपली कामे कार्यक्षमपणे पार पाडण्यासाठी पाणी वापर संस्थेने नामनिर्देशित केलेल्या सदस्यांना व इतर व्यक्तींना प्रशिक्षण देण्यासाठी कालवा अधिकाऱ्याने मदत करणे**;**

(थ) पाणी वापर संस्थेची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी जलसंपदा विभागाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक तत्वांचे अनुसरन करणे **;**

३०. *पाणीपट्टीचे देयक व पावती* : कोणत्याही स्तरावरील पाणी वापर संस्थेस पुरविलेल्या पाण्याच्या पाणीपट्टीची देयके व पावत्या, अनुक्रमे नमुना **“ब“** व **“क“** मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असतील **;**

३१. *उच्चस्तरावरील पाणी वापर संस्थेच्या निर्मितीसाठी निम्न स्तरावरील पाणी वापर संस्थांच्या कामगिरीचे मूल्यमापन करण्याची मानके* : उच्च स्तरावरील पाणी वापर संस्थांची

निर्मिती करण्याचे वेळापत्रक निश्चित करण्यासाठी निम्न स्तरावरील पाणी वापर संस्थांच्या कामगिरीचे मूल्यमापन करण्याकरिता पुढील मानकांचा वापर करावयाचा आहे. उच्च स्तरावरील पाणी वापर संस्थांच्या कार्यक्षेत्रातील पाणी वापर संस्थांच्या एकूण संख्येपैकी पन्नास टक्क्यांपेक्षा कमी नसतील इतक्या संस्थांनी खाली नमूद केलेल्या मानकांची समाधानकारकरीतीने पूर्तता केल्याशिवाय, उच्च स्तरावरील पुढील पाणी वापर संस्थांची रचना करण्याची कार्यपध्दती सुरु करण्यात येणार नाही. :-

अ. कार्यविषयक मानके :

(१) पाणी वापर संस्थेची व्यवस्थापन समिती निवडून दिलेली आहे किंवा कसे **;**

(२) कोणत्याही सिंचन वर्षामध्ये सिंचन कालावधी सुरु होण्यापूर्वी दोन सर्वसाधारण सभा घेण्यात आल्या आहेत किंवा कसे **;**

ब. वित्तीय मानके :

(१) पाणी वापर संस्थेने कलम ५७ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे बँकेमध्ये आपले खाते उघडले आहे किंवा कसे **;**

(२) पाणी वापर संस्थेने तिचे विविध लेखे अनुक्रमे नमुना ड व ई मध्ये आणि खातेवह्या नमुना एफ मध्ये योग्य प्रकारे ठेवले आहेत किंवा कसे **;**

(३) पाणी वापर संस्थेने नमुना "ग" मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पाणीपट्टी देयकानुसार आपल्या सदस्यांकडून पाणीपट्टी गोळा करण्यास तसेच नमूना "ह" मध्ये त्याच्या पावत्या देण्यास आणि तत्परतेने ती रक्कम आपल्या बँक खात्यात भरणा करण्यास सुरुवात केली आहे किंवा कसे **;**

(४) पाणी वापर संस्थेने नमुना "आय" मध्ये योग्य पावत्या दिल्या आहेत किंवा कसे, नमुना "जे" मध्ये रोख पुस्तक ठेवले आहे किंवा कसे आणि केलेल्या प्रदानांबाबत नमुना "के" मध्ये प्रदान नोंदवही ठेवलेली आहे किंवा कसे आणि नमुना एल मध्ये जड वस्तु संग्रह नोंदवही ठेवलेली आहे किंवा कसे **;**

(५) पाणी वापर संस्थेने कालवा अधिकाऱ्याकडून मिळालेल्या देयकांनुसार पाणीपट्टीचा भरणा करण्यास सुरुवात केली आहे किंवा कसे **;**

क. प्रशासकीय मानके :

(१) पाणी वापर संस्थेंने आपल्या सचिवाची नियुक्ती केली आहे किंवा कसे **;**

(२) आपल्या कार्यक्षेत्रातील आपल्या सदस्यांचा अभिलेख, म्हणजेच नमुना-"एम" मधील सदस्यांचे नोंदणी पुस्तक आणि नमुना "एन" मधील खाते पुस्तक अचूकपणे ठेवण्यात आले आहे आणि ते अद्ययावत करण्यात आले आहे किंवा कसे **;**

(३) शासनाच्या जलसंपदा विभागाने तरतूद केल्याप्रमाणे खाली नमूद केलेल्या प्रमुख व महत्वाच्या अभिलेखांची विविध पुस्तके ठेवली आहेत किंवा कसे.

(एक) सदस्यांची नांवे, पाणी वापर संस्थेच्या कार्यक्षेत्रामधील त्यांनी धारण केलेल्या जमिनींचा तपशील आणि सर्वसाधारण वर्षातील त्यांचे पाणी वापर हक्क यांचा अंतर्भाव असणारी पाणी वापर संस्थेच्या सदस्यांची एक नोंदवही.

(दोन) अधिनियमाची आणि त्याखाली करण्यात आलेल्या नियमांची यथोचितरित्या अद्ययावत करण्यात आलेली प्रत.

(तीन) बांधकाम व कालवा यंत्रणेच्या नकाशासह पाणी वापर संस्थेच्या कार्यक्षेत्राचा नकाशा.

(चार) मत्ता व दायित्व यांचे विवरणपत्र.

(पाच) सर्वसाधारण सभेच्या कार्यवृत्तांची नोंदवही.

(सहा) व्यवस्थापन समितींच्या सभांच्या कार्यवृत्तांची नोंदवही.

(सात) व्यवस्थापन समितीच्या संचालकांच्या निवडणुकांच्या किंवा त्यांना परत पाठवण्याबाबतच्या कार्यपध्दतीची नोंदवही.

(आठ) रोख जमा पुस्तक, धनादेश नोंदवही, प्रमाणकांच्या फायली आणि तत्सम अभिलेखासह जमा व खर्च दर्शविणारी लेखा पुस्तके.

(नऊ) पाणी वापर संस्थेने केलेल्या मालाच्या खरेदी-विक्रीची लेखा पुस्तके.

(दहा) मोजणी पुस्तके, सर्वेक्षणाची क्षेत्रीय पुस्तके, कार्यादेश व तत्सम अभिलेखांची नोंदवही.

(अकरा) लेखापरीक्षा अहवाल व चौकशी अहवाल यांच्या प्रती.

(बारा) जललेखा.

(तेरा) जलवहन यंत्रणेच्या (कालवा व बांधकामे) बांधकामासाठी आणि अन्य संबध्द कामे करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने संपादित केलेल्या जमिनीच्या सीमा दर्शविणारा नकाशा.

(चौदा) पाणी वापर संस्थेच्या अधिकार क्षेत्रात असलेल्या विहिरी, नलिका विहिरी यांची नोंदवही.

(पंधरा) पाटबंधारे रोजवही.

(सोळा) पाणीपट्टी वसुलीची नोंदवही.

(सतरा) पाणी वापर संस्थेने पार पाडलेल्या कामाची नोंदवही.

(अठरा) सिंचित क्षेत्राची नोंदवही.

(एकोणीस) अर्थसंकल्प. (जोडपत्र ६ नुसार)

(वीस) तक्रार नोंदवही.

प्रकरण-पाच

सर्वसाधारण सभा

३२. *सर्वसाधारण सभा* : (१) पाणी वापर संस्थेची सर्वसाधारण सभा ही निदान प्रत्येक सिंचन हंगाम सुरु होण्याच्या लगतपूर्वी घेण्यात येईल. पाणी वापर संस्थेचा अध्यक्ष, प्रत्येक सर्वसाधारण सभेचा अध्यक्ष असेल व तो सभेच्या कामकाजाचे नियमन करील आणि त्याच्या अनुपस्थितीत सभेला उपस्थित असलेल्या व्यवस्थापन समितीच्या सदस्यांपैकी ज्या सदस्याची त्या सभेमध्ये अध्यक्ष म्हणून निवड करण्यात येईल तो सदस्य त्या सभेचा अध्यक्ष असेल आणि तो सभेच्या कामकाजाचे नियमन करील.

(२) अध्यक्षाला स्वत:हून किंवा लघुवितरिका स्तरावरील पाणीवापर संस्थेच्या, मतदानाचा हक्क असलेल्या, एकूण सदस्यांच्या १० टक्क्यापेक्षा कमी नसेल इतक्या सदस्यांच्या किंवा उच्च स्तरावरील पाणी वापर संस्थेच्या मतदानाचा अधिकार असलेल्या एकूण सदस्यांच्या पन्नास टक्के इतक्या सदस्यांच्या लेखी मागणीनुसार सर्वसाधारण सभा बोलविता येईल.

(३) नियम २३ अन्वये पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीचे विसर्जन करण्याचा अधिकार सोपाविण्यात आलेल्या समुचित प्राधिकरणाने किंवा निकटतम उच्चस्तरीय पाणी वापर संस्थेने या संबंधात दिलेल्या निदेशांवरुन देखील सर्वसाधारण सभा बोलविता येईल.

३३. *गणपूर्ती* : (१) सर्वसाधारण सभांच्या गणपूर्तीसाठी लघुवितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थेच्या एकूण सदस्यांच्या दहा टक्के आणि उच्च` स्तरावरील पाणी वापर संस्थेच्या एकूण सदस्यांच्या पन्नास टक्के इतक्या सदस्यांची उपस्थिती आवश्यक असेल आणि उपस्थित असलेल्या व मतदान करणाऱ्या सदस्यांच्या बहुमताने सर्व ठराव मंजूर करण्यात येतील.

(२) सभेची गणपूर्ती न झाल्यास, बैठक तहकूब करण्यात येईल आणि मूळ सभेच्या दिनांकापासून सात दिवसांनंतर त्याच ठिकाणी व त्याच वेळेला ती परत घेण्यात येईल.

(३) अशाप्रकारे तहकूब करण्यात आलेल्या सर्वसाधारण सभेसाठी गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही आणि उपस्थित असलेल्या व मतदान करणाऱ्या सदस्यांच्या बहुमताने सर्व ठराव मंजूर करण्यात येतील.

(४) सर्वसाधारण सभेत, कार्यसूची मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या बाबींवर चर्चा करण्यात येईल आणि अध्यक्षांच्या परवानगीशिवाय अन्य कोणत्याही विषयावर चर्चा करण्यात येणार नाही.

३४. *बैठकीची कार्यवृत्ते :* सर्वसाधारण सभेच्या कामकाजाच्या कार्यवृत्ताची नोंद, त्यासाठी ठेवण्यात आलेल्या कार्यवृत्त वहीमध्ये करण्यात येईल आणि अध्यक्ष किंवा यथास्थिती, ज्या व्यक्तीने सभेचे अध्यक्षस्थान भूषविलेले असेल अशी व्यक्ती ते कार्यवृत्त अधिप्रमाणित करील. कार्यवृत्ताची एक प्रत पाणी वापर संस्थेच्या उच्च स्तरीय पदाधिकाऱ्यास आणि सक्षम प्राधिकाऱ्यास पाठविण्यात येईल.

प्रकरण-सहा

निधी, अर्थसंकल्प व लेखापरीक्षा

३५. *निधीचा वाटप :* (१) अधिनियमाच्या तरतुदींनुसार पाणी वापर संस्थेस मिळालेला सर्व निधी आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदीं अन्वये तिच्याकडे उपार्जित झालेल्या सर्व रकमा कलम ५७ मध्ये नमूद केलेल्या बँकांकडे तात्काळ जमा करण्यात येतील आणि हा निधी पाणी वापर संस्थेची उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी उपयोगात आणला जाईल.

(२) पुढील वित्तीय वर्षाकरीता वेगवेगळया बाबींवरील संभाव्य खर्चाचे अंदाज पत्रक तयार करण्यात येतील आणि त्यांना उक्त वित्तीय वर्षाच्या प्रारंभापूर्वी वार्षिक सर्वसाधारण सभेत मान्यता घेण्यात येईल.

(३) फक्त एक हजार रुपयांपर्यन्तचाच खर्च अध्यक्षांच्या लेखी पूर्व परवानगीने करता येऊ शकेल. एक हजार रुपयांपेक्षा अधिक असलेल्या कोणत्याही खर्चासाठी व्यवस्थापन समितीच्या बैठकीमध्ये आगाऊ मान्यता घेण्यात येईल. खरेदीसाठी किंवा बांधकामे पार पाडण्यासाठी दरपत्रक किंवा निविदा मागविण्याची कार्यपध्दती अनुसरण्यात येईल. या

कार्यपध्दतीमुळे या व्यवहारांमध्ये खात्रीपूर्वक पारदर्शकता, स्पर्धा आणि व्यवहार्य दर राहील.

(४) पाणी वापर संस्था आपल्या सचिवास चालू खर्च भागविण्यासाठी एक हजार रुपयांपेक्षा जास्त नसेल इतकी रोख रक्कम स्वत:कडे ठेवण्याची मुभा देईल.

(५) निधीची जास्तीत जास्त रक्कम प्रत्यक्ष परिरक्षण, दुरुस्ती व व्यवस्थापन यासाठी वापरता यावी या दृष्टीने व्यवस्थापन समिती उद्घाटन व इतर समारंभ, कार्यालयीन इमारत व सजावट, परिवहन, फर्निचर, बैठका, छायाचित्रे, वार्षिक अहवालांचे प्रकाशन व अशा प्रकारच्या इतर सर्व बाबी यावर किमान खर्च होईल याची सुनिश्चिती करील.

(६) एक हजार रुपयांपेक्षा जास्त रकमेची सर्व प्रदाने धनादेशाद्वारे करण्यात येतील.

(७) पाणी पुरवठयासाठी शासनाला देय असलेल्या रकमा त्याचप्रमाणे पाणी वापर संस्थेचा कामकाज चालनावर होणारा खर्च या बाबी विचारात घेऊन, पाणी वापर संस्था, तिच्या सदस्यांकडून पाणीपट्टी वसूल करण्याबाबतची कार्यपध्दती निश्चित करील.

(८) पाणी वापर संस्था, आपल्या संस्थेच्या मत्तेशी प्रमाणहीन ठरेल असे कोणतेही ऋण निर्माण करणार नाही किंवा कोणतीही कर्जे उभारणार नाही. तथापि, पाणी वापर संस्थेला आपली उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी व्यवस्थापन समितीच्या पूर्व मान्यतेने अल्प मुदतीची कर्जे घेता येतील. पाणी वापर संस्था, तिच्याकडे वापराकरिता सोपविलेल्या शासकीय मत्तांवर ऋण किंवा कर्जे उभारणार नाही.

३६. *अर्थसंकल्प :* (१) प्रत्येक वित्तीय वर्षात, पाणी वापर संस्थेची व्यवस्थापन समिती, पुढील वित्तीय वर्षाच्या संबंधात जोडपत्र-६ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यात अर्थसंकल्पाचा मसुदा तयार करील. हा अर्थसंकल्प प्रत्येक वर्षाच्या दिनांक १५ मार्च पर्यन्त होणाऱ्या सर्वसाधारण सभेपुढे सादर करण्यात येईल.

(२) अर्थसंकल्पाच्या मसुद्यास पुढील गोष्टी विशद करणारी एक संक्षिप्त टिप्पणी जोडण्यात येईल.

(क) अलीकडील लेखापरीक्षा अहवालामधील अभिप्राय व त्याचे अनुपालन.

(ख) अर्थसंकल्पीय प्रस्ताव व त्यांबाबतचे समर्थन.

(३) अर्थसंकल्पीय मसुदा आणि पोट नियम (२) अन्वये आवश्यक असलेली स्पष्टीकरणात्मक टिप्पणी सर्वसाधारण सभेसाठी निश्चित केलेल्या दिवसाच्या किमान एक आठवडा अगोदर पाणी वापर संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध करुन देण्यात येईल.

(४) अर्थसंकल्पीय मसुदा, कोणतेही आवश्यक बदल असल्यास, त्यांसह , सर्वसाधारण सभेमध्ये मान्य करुन घेण्यात येईल.

३७. *राखीव निधी :* प्रत्येक पाणी वापर संस्था कलम ५८ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे एक राखीव निधी निर्माण करील. पाणी वापर संस्थेकडून गोळा केलेल्या पाणीपट्टीच्या दहा टक्के इतकी रक्कम आणि पाणी वापर संस्थेला उपार्जित होणाऱ्या नफ्याच्या दहा टक्के इतकी रक्कम प्रत्येक वर्षी या प्रयोजनार्थ उघडण्यात आलेल्या स्वतंत्र खात्यामध्ये जमा करण्यात येईल. सर्वसाधारणतः उपार्जित राखीव निधी, व्यवस्थपन समितीनें मान्यता दिल्यानुसार आवश्यक असेल तेव्हा पाणी वापर संस्थेच्या अधिकार क्षेत्रातील यंत्रणेच्या प्रत्यक्ष बांधकामाच्या विशेष किंवा आकस्मिक दुरुस्त्यांसाठी वापरण्यात यावा अशी अपेक्षा आहे.

३८. *वित्तीय लेखापरीक्षा :* (१) प्रत्येक वित्तीय वर्षाच्या अखेरीस आणि नवीन वित्तीय वर्षाच्या प्रारंभापासून तीन महिन्येाच्या आत, पाणी वापर संस्था तिच्या लेख्यांची खाली दिलेल्या रीतीने लेखापरीक्षा करवून घेईल.

(अ) (१) व्यवस्थापन समिती लघु वितरिका स्तरावरील पाणी वापर संस्था आणि लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या प्रकल्प स्तरीय संस्था यांच्या बाबतीत, नेहमीच्या लेखा परीक्षणविषयक कामाचा पुरेसा अनुभव असलेल्या लेखापरीक्षकाची नियुक्ती करील. मोठया व मध्यम प्रकल्पांच्या वितरिका स्तरीय पाणी वापर संस्था, कालवा स्तरीय पाणी वापर संस्था आणि प्रकल्प स्तरीय पाणी वापर संस्था यांच्या बाबतीत, व्यवस्थापन समिती, लेख्यांची लेखापरीक्षा करण्यासाठी लेखापरीक्षक म्हणून एका सनदी लेखापालांची नियुक्ती करील. या प्रयोजनासाठी अधीक्षक अभियंता या पदाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला कालवा अधिकारी, पाणी वापर संस्थेकरीता लेखापरीक्षक म्हणून काम करण्यास इच्छूक आणि सक्षम असलेल्या सनदी लेखापालांकडून अर्ज मागवील. आणि अशा यथोचितरित्या निवड केलेल्या सनदी लेखापालांचे एक मंडळ (पॅनेल) तयार करील. पाणी वापर संस्था,

अशा मंडळामध्ये समाविष्ट असलेल्या सनदी लेखापालांमधून एका सनदी लेखापालाची नियुक्ती करील.

(ब) (२) पाणी वापर संस्थेने अशा प्रकारे नियुक्त केलेला लेखापरीक्षक त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, जमा व खर्चाच्या लेख्यांचे परिनिरीक्षण करण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करील आणि लेखा विवरणपत्र व ताळेबंदासह आपला लेखापरीक्षा अहवाल संबंधित पाणी वापर संस्थेच्या अध्यक्षाकडे दरवर्षी ३१ जुलैपूर्वी सादर करील.

(क) (३) पाणी वापर संस्थेची व्यवस्थापन समिती, लेखापरीक्षा अहवाल विचारात घेईल आणि आवश्यक असल्यास, लेखापरीक्षा दोषनिरसन अहवाल तयार करील. हा अहवाल लेखापरीक्षकांना, त्यांचा अहवाल प्राप्त झाल्यापासून एक महिन्याच्या आत सादर करण्यात येईल.

(ड) (४) हा लेखापरीक्षा अहवाल, दरवर्षी ३० सप्टेंबरच्या आत सर्वसाधारण सभेमध्ये सादर करण्यात येईल. सर्वसाधारण सभा लेखापरीक्षा अहवाल विचारात घेईल.

(इ) (५) पाणी वापर संस्थेची व्यवस्थापन समिती, लेखा परीक्षा अहवालात दर्शविलेल्या सर्व बाबींवरील कृती अहवाल सर्वसाधारण सभेमध्ये तसेच संबंधित कालवा अधिकारी आणि उच्चस्तरीय पाणी वापर संस्थेला सादर करील आणि व्यवस्थापन समिती, या संदर्भात सर्वसाधारण सभेने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करील.

(ई) (६) पाणी वापर संस्थेचे वित्तीय वर्ष १ एप्रील ते ३१ मार्च असे असेल.

(२) रोकड वही, खातेवही आणि अशी इतर कागदपत्रे यांसारखी वित्तीय कागदपत्रे, ती सुरक्षित ठेवणे आणि ती ताब्यात ठेवणे याची जबाबदारी, पाणी वापर संस्थेच्या सचिवाची असेल आणि उक्त पाणी वापर संस्थेची व्यवस्थापन समिती जेव्हा प्राधिकृत करील तेव्हा पाणी वापर संस्थेच्यावतीने तो आवश्यक त्या कागदपत्रांवर सह्या करील.

(३) कलम ५९ खालील लेखा परीक्षेत, इतर अनेक बाबींबरोबर पुढील बाबींची तपासणी व पडताळणी याचा देखील अंतर्भाव असेल-

(अ) (१) ऋणांची थकबाकी, कोणतीही असल्यास.

(ब) (२) पाणी वापर संस्थेच्या शिल्लक रोख रकमा व प्रतिभूती आणि मत्ता व दायित्वांचे मूल्यांकन.

(क) (३) प्रतिभूतीच्या आधारे, पाणी वापर संस्थेने घेतलेली कर्जे व आगाऊ रकमा आणि ऋण योग्य प्रकारे प्रतिभूत केलेली आहेत किंवा कसे आणि अशी कर्जे व आगाऊ रकमा किंवा ऋण ज्या अटींवर घेण्यात आली आहेत त्या अटी, पाणी वापर संस्थेच्या आणि तिच्या सदस्यांच्या हितसंबंधास बाधक आहेत किंवा कसे ?

(ड) (४) पाणी वापर संस्था समुचित प्राधिकरण किंवा वित्तीय संस्था यांनी ज्या प्रयोजनांसाठी असे सहाय्य मंजूर केले होते त्याच प्रयोजनांसाठी देण्यात आलेल्या कोणत्याही वित्तीय सहाय्याचा योग्यरित्या वापर केला आहे किंवा कसे ?

(इ) (५) पाणी वापर संस्था त्यांची उद्दिष्टये व त्यांच्या सदस्यांप्रती त्यांची असलेली दायित्वे योग्यरित्या पार पाडीत आहेत किंवा कसे ?

(ई) (६) कालवा अधिकारी किंवा प्राधिकृत करण्यात आलेली कोणतीही व्यक्ती, यांना, लेखापरीक्षेच्या प्रयोजनाकरीता, संबंधित पाणी वापर संस्थेकडे असलेली किंवा त्यांच्या ताब्यात असलेली सर्व लेखा पुस्तके, लेखे, दस्तऐवज, कागदपत्रे, रोखे, रोख रक्कम व इतर मालमत्ता केव्हाही पाहणीसाठी उपलब्ध असेल आणि अशी कोणतीही लेखा पुस्तके, लेखे व असे अन्य दस्तऐवज ताब्यात असलेल्या किंवा त्यास जबाबदार असलेल्या अशा कोणत्याही व्यक्तीला, ती सादर करण्यासाठी कालवा अधिकारी किंवा अशी प्राधिकृत केलेली व्यक्ती पाणी वापर संस्थेच्या मुख्यालयात बोलावू शकेल.

प्रकरण-सात

विवाद सोडविणे

३९ *विवाद समझोता :* (१) लघु वितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थेचा सदस्य, पाणी वापर संस्थेची घटना, व्यवस्थापन, अधिकार किंवा कार्ये या बाबतीत विवाद किंवा मतभेद झाल्यास, असा विवाद किंवा मतभेद उद्‌भवल्याच्या दिनांकापासून पंधरा

दिवसांच्या कालावधीत, विवादाचा तपशील नमूद करुन, संबंधित पाणी वापर संस्थेला देय असलेल्या रुपये दहा एवढया रकमेच्या शुल्कासह, कार्यालयीन वेळेत व्यक्तीशः अर्ज सादर करील किंवा तो लघु वितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीकडे टपालाद्वारे पाठविल. पाणी वापर संस्थेची व्यवस्थापन समिती, उक्त अर्ज, तो प्राप्त झाल्याच्या दिवसांपासून ४५ दिवसांच्या आत निकालात काढील, परंतु, ज्या व्यक्तीच्या किंवा संस्थेच्या विरुध्द अर्ज केला आहे त्या व्यक्तीला किंवा संस्थेला आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल.

(२) जी व्यक्ती लघुवितरीका स्तरावरील पाणी वापर संस्थेचे सदस्य आहे व जिचा लघुवितरीका स्तरावरील पाणी वापर संस्थेचा समितीशी विवाद किंवा मतभेद आहेत, किंवा जी व्यक्ती, ज्या लघुवितरीका स्तरावरील पाणीवापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीचे लघुवितरीका स्तरावरील दुसऱ्या पाणी वापर संस्थेबरोबर विवाद व मतभेद आहेत, अशा संस्थेची सदस्य आहे अशा व्यक्तीने, असे विवाद उद्‌भवल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या कालावधीच्या आत, विवादाचा तपशील नमूद करुन, कार्यालयीन वेळेत, अर्ज सादर करील किंवा तो अर्ज टपालाव्दारे, वितरीका स्तरीय पाणी वापर संस्थेकडे किंवा वितरीका स्तरीय पाणी वापर संस्था अस्तित्वात नसेल तेंव्हा उप विभागीय स्तरावरील कालवा अधिकाऱ्याकडे पाठविल. अर्जदार, (वितरीका) स्तरीय संस्थेकडे किंवा यथास्थिति उप विभागीय स्तरावरील कालवा अधिकाऱ्याकडे, अर्जासोबत रुपये दहा एवढे शुल्क प्रदान करील. वितरीका स्तरीय पाणी वापर संस्था किंवा कालवा अधिकारी, हा अर्ज, तो प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ४५ दिवसाच्या कालावधीच्या आत निकालात काढील; परंतु, जिच्याविरुध्द अर्ज करण्यात आला आहे त्या पाणीवापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीला, आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल.

(३) ज्या लघुवितरीका स्तरावरील पाणीवापर संस्थेचा वितरिका स्तरीय पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीशी विवाद किंवा मतभेद असेल किंवा ज्या वितरिका स्तरीय पाणी वापर संस्थेचा दुसऱ्या वितरिका स्तरीय पाणी वापर संस्थेशी विवाद किंवा मतभेद असेल ती संस्था, असा विवाद उद्‌भवल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या कालावधीच्या आत, विवादाचा तपशील नमूद करणारा अर्ज कार्यालयीन वेळेत, कालवास्तरीय पाणी वापर संस्थेकडे किंवा कालवास्तरीय पाणी वापर संस्था अस्तित्वात नसल्यास संबंधित

कार्यकारी अभियंत्याकडे व्यक्तिशः सादर करील किंवा टपालाने पाठविल. अर्जदार, कालवा स्तरीय संस्था किंवा यथास्थिति संबंधित कार्यकारी अभियंता यांच्याकडे अर्जासोबत १० रुपये एवढे शुल्क प्रदान करेल. कालवा स्तरीय संस्थेची वव्यवस्थापन समिती किंवा संबंधित कार्यकारी अभियंता असा अर्ज, तो प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसाच्या कालावधीच्या आत निकालात काढील. परंतु ज्या पाणी वापर संस्थेच्या विरुध्द अर्ज करण्यात आला आहे, अशा वितरिकास्तरीय पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल.

(४) ज्या वितरिका स्तरीय, पाणी वापर संस्थेचा कालवा स्तरीय पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीशी विवाद असेल किंवा ज्या कालवा स्तरीय पाणी वापर संस्थेचा इतर कालवास्तरीय पाणी वापर संस्थेशी विवाद असेल, ती संस्था असा विवाद झाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत, अशा वादाचा तपशील नमूद केलेला एक अर्ज कार्यालयीन वेळेत, एकतर व्यक्तिशः प्रकल्पस्तरीय पाणी वापर संस्थेला किंवा प्रकल्प स्तरीय संस्था अस्तित्वात नसेल तर, संबंधित अधीक्षक अभियंत्याला सादर करील किंवा टपालाव्दारे त्यांच्याकडे पाठविल. अर्जदार यथास्थिति, प्रकल्पस्तरीय पाणी वापर संस्था किंवा संबंधित अधीक्षक अभियंता यांच्याकडे, त्या अर्जासोबत दहा रुपये फी भरील. प्रकल्पस्तरीय पाणी वापर संस्था किंवा संबंधित अधीक्षक अभियंता, असा अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसाच्या आत, तो निकालात काढील; परंतु जिच्याविरुध्द अर्ज केला असेल त्या कालवा स्तरीय पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल.

(५) ज्या कालवास्तरीय पाणी वापर संस्थेचा प्रकल्पस्तरीय पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीशी विवाद किंवा मतभेद असेल, किंवा ज्या प्रकल्पस्तरावरील पाणी वापर संस्थेचा इतर प्रकल्पस्तरावरील संस्थेशी वाद असेल ती संस्था असा विवाद घडल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत, अशा वादाचा तपशील नमूद केलेला एक अर्ज, कार्यालयीन वेळेत, एकतर व्यक्तिशः मुख्य अभियंत्याकडे सादर करील किंवा टपालाव्दारे त्यांच्याकडे पाठविल. मुख्य अभियंता, उक्त अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसाच्या आत, तो निकालात काढील, परंतु, जिच्या विरुध्द अर्ज केला असेल, त्या प्रकल्प स्तरावरील संस्थेच्या व्यवस्थापन समितीस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल.

(६) ज्या प्रकल्पस्तरीय संस्थेचा समुचित प्राधिकरणाशी विवाद किंवा मतभेद असेल ती संस्था असा विवाद घडल्याचा दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत, अशा वादाचा तपशील नमूद केलेला अर्ज, महाराष्ट्र जलसंपदा नियामक प्राधिकरणाकडे कार्यालयीन वेळेत व्यक्तिशः सादर करील किंवा टपालाव्दारे पाठविल. विहित प्राधिकरण, असा अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसाच्या आत तो निकालात काढील, परंतु, संबंधित मुख्य अभियंत्यास आपले म्हणणे मांडण्याची वाजीव संधी देण्यात येईल. उक्त प्राधिकरणाचा निर्णय हा अंतिम निर्णय असेल.

(७) पोट नियिम १ ते ६ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या प्राधिकरणाकडे विवाद दाखल करण्यात आला असेल ते प्राधिकरण, विवाद पंधरा दिवसाच्या आत दाखल करण्यात झालेला विलंब पुरेशा कारणावरुन व ती कारणे लेखी नमूद करुन, क्षमापित करु शकेल.

४०. *अपिले* : (१) लघुवितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीने संमत केलेल्या प्रत्येक आदेशाविरुध्द वितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीकडे अपिल करता येईल, किंवा वितरिका स्तरावरील पाणी वापर संस्था अस्तित्वात नसल्यास, उप विभागीय स्तरावरील कालवा अधिकाऱ्याकडे अपील करता येईल.

(२) वितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीने किंवा उप विभागीय स्तरावरील कालवा अधिकाऱ्याने संमत केलेल्या प्रत्येक आदेशाविरुध्द कालवास्तरीय पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीकडे अपिल करता येईल किंवा कालवा स्तरावरील पाणी वापर संस्था अस्तित्वात नसेल तर संबंधित कार्यकारी अधिकाऱ्याकडे अपिल करता येईल.

(३) कालवा स्तरावरील पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीने किंवा कार्यकारी अभियंत्याने संमत केलेल्या प्रत्येक आदेशाविरुध्द प्रकल्प स्तरावरील पाणी वापर संस्थेकडे अपिल करता येईल किंवा प्रकल्प स्तरावरील संस्था अस्तित्वात नसेल तर संबंधित अधीक्षक अभियंत्याकडे अपील करता येईल.

(४) प्रकल्प स्तरावरील संस्थेच्या व्यवस्थापन समितीने किंवा संबंधित अधीक्षक अभियंत्याने संमत केलेल्या प्रत्येक आदेशाविरुध्द मुख्य अभियंत्याकडे अपील करता येईल.

(५) त्या अधिनियमाखाली किंवा पोट-नियम (१) ते (५) या खालील दाखल करण्यात आलेली सर्व अपिले लेखी असतील व त्यावर अपिलकाराने स्वाक्षरी केली असेल आणि अपिल प्राधिकरणाला देय असलेली दहा रुपय एवढी फी त्या सोबत जोडलेली असेल.

असे अपिल, अपिलाकाराकडून अपिल प्राधिकरणाच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत व्यक्तिशः सादर करण्यात येईल किंवा टपालाव्दारे पाठविण्यात येईल. परंतु जिच्या विरुध्द अपिल करण्यात आले असेल त्या व्यक्तिला किंवा त्या पाणीवापर संस्थेला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल.

(६) वादाच्या निर्णयासंबंधातील सर्व संबंध्द अभिलेख संबंधित पाणीवापर संस्थेच्या कार्यालयात आणि संबंधित कालवा अधिकाऱ्याच्या कार्यालयात योग्यरितीने ठेवण्यात येईल.

प्रकरण-८

सर्वसाधारण तरतुदी

४१. *चालू प्रकल्पांच्या अंमलबजावणीमध्ये पाणी वापर संस्थांचा सहभाग* : पाणी वापर संस्था स्थापन करण्याच्या प्राथमिक उद्दीष्टाबरोबरच प्रति सेंकद १ घ.मी.पेक्षा कमी नाही एवढ्या क्षमतेच्या वितरण यंत्रणेच्या कामाच्या अंमलबजावणीमध्ये लघुवितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थेला सहभागी करुन घेण्यासाठी पुढील कार्यपध्दती अनुसरण्यात येईल.

(क) विहित पाणीवापर हक्कासह वितरीकेचे संरेखन, लघु वितरिका, उप लघु वितरिका शेतातील पाट, पाटांवरील सर्व बांधकामाचे स्थान व पातळी, सर्व पाटांच्या पाणलोट क्षेत्राच्या सीमा, गाव सीमा, नैसर्गिक मोऱ्या, गावठाण, दर्शविणारा प्रस्तावित वितरण यंत्रणेचा लाभक्षेत्र आराखडा, शेतकऱ्यांच्या निरिक्षणासाठी आणि त्यांचे अभिप्राय किंवा सूचनांसाठी कमीत कमी पंधरा दिवसांच्या कालावधीकरीता संबंधित कालवा अधिकाऱ्याच्या कार्यालयात प्रदर्शित करण्यात येईल आणि तसेच, त्या भागातील आघाडीच्या

वृत्तपत्रामधूनही त्यास संबंधित कालावा अधिकाऱ्याकडून प्रसिध्दी देण्यात येईल.

(ख) कालवा अधिकारी सर्व संभाव्य लाभार्थींची बैठक बोलाविल आणि त्यामध्ये त्या प्रस्तावाबाबत त्यांना माहिती देईल.

(ग) प्रस्तावित वितरण यंत्रणेबाबतच्या कोणत्याही सूचना किंवा अभिप्राय, संभाव्य लाभार्थीकडून ३० दिवसांच्या कालावधीच्या आत संबंधित कालवा अधिकाऱ्याकडे सादर करण्यात येईल. आवश्यकता असल्यास, लाभार्थींना तज्ञांचाही सल्ला घेता येईल.

(घ) प्राप्त झालेल्या सर्व सूचना किंवा अभिप्रायांवर या प्रयोजनासाठी बोलाविलेल्या शेतकऱ्यांच्या बैठकीत चर्चा करण्यात येईल आणि त्या बैठकीत योग्य तो निर्णय घेण्यात येईल आणि त्याबाबतचा अभिलेख ठेवण्यात येईल. एकमत न झाल्यास, संबंधित अधीक्षक अभियंत्याचा किंवा यथास्थिति कार्यकारी अभियंत्याचा त्या बाबतचा निर्णय अंतिम असेल.

(ङ) आवश्यकता भासल्यास उक्त बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयांच्या आधारे, आराखड्यात व अंदाजांमध्ये सुधारणा करण्यात येईल.

(च) प्रस्तावाला अंतीम रुप दिल्यानंतर, कालवा अधिकारी, पाणी वापर संस्था स्थापन करण्याची प्रक्रिया सुरु करुन ती पूर्ण करील.

(छ) जलसंपदा विभागात अवलंबिण्यात आलेली प्रचलित कार्यपध्दती अनुसरुन कामाच्या अंमलबजावणीस सुरुवात करता येईल.

(ज) चालू कामाची पहाणी करण्यासाठी आणि संबंधित कालवा अधिकाऱ्याला लेखी अभिप्राय किंवा सूचना देण्यासाठी लघुवितरीका स्तरावरील संबंधित पाणी वापर संस्थेच्या सर्व अध्यक्षांची एक समिती स्थापन करण्यात येईल. कालवा अधिकारी अभिप्राय किंवा सूचनांचे परिक्षण केल्यानंतर योग्य ती कार्यवाही करील. व त्याबाबत समितीला रीतसर कळवील. यंत्रणेच्या कामाची चाचणी घेण्याचे काम, सर्व अध्यक्षांच्या समितीसमक्ष पार पाडण्यात येईल आणि त्यात कोणताही दोष दिसून आल्यास, समितीचे समाधान होईल अशा प्रकारे ते दूर करण्यात येतील.

झ) ती परिपूर्ण यंत्रणा चाचणी घेतल्यानंतर संबंधित पाणी वापर संस्थेकडे सुपूर्द करण्यात येईल.

जोडपत्र-१

(नियम ३ पहा)

पाणीवापर संस्थेच्या कार्यक्षेत्राच्या निश्चितीसाठी मार्गदर्शक तत्वे.

१. कार्यक्षेत्राची निश्चिती :- प्रकल्पामधील पाणीवापर संस्थेच्या कार्यक्षेत्र निश्चिती करण्याच्या (यात या पुढे ज्याचा निर्देश, 'कार्यक्षेत्र निश्चिती' असा करण्यात आला आहे.) एकूण प्रक्रियेचे नियोजन करताना कालवा अधिकारी पुढील निकषांच्या आधारे ''पूर्णाकडून अंशाकडे'' या धोरणाचा अवलंब करील.

(एक) लाभक्षेत्राचा विकास :- महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६ (१९७६ चा महा. अडतीस) याच्या कलम ३ अन्वये अधिसूचित करण्यात आलेले लाभक्षेत्र कार्यक्षेत्र निश्चितीसाठी प्रथम विचारात घ्यावे. लाभक्षेत्राच्या उर्वरित भागाची कार्यक्षेत्र निश्चिती, महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६ च्या कलम ३ अन्वये अधिसूचित करण्यात आलेल्या कालवा पध्दतीनुसार ताबडतोब पूर्ण करण्यात यावी.

स्पष्टीकरण (१) महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६ च्या कलम ३ अन्वये, प्रवाह, उपसा, पाझर (विहीरीसहीत इत्यादी अशा सर्व सिंचन पध्दतीखालील क्षेत्र, प्रथम अधिसूचित करणे अपेक्षित आहे. जर हे क्षेत्र अशाप्रकारे अधिसूचित करण्यात आले नसल्याचे आढळून आले तर ते क्षेत्र अधिसूचित करण्यासंबंधीची अधिसूचना तात्काळ काढणे आवश्यक आहे.

(दोन) पाणीवापर संस्थेचे (प्रवाह) कार्यक्षेत्र निश्चित करण्यापूर्वी, आवश्यकता भासल्यास खालील क्षेत्र प्रवाही सिंचनाच्या लाभक्षेत्रातून, निरधिसूचित करण्याबाबत अत्यंत काळजी घेण्यात यावी.

(क) मान्यताप्राप्त अकृषिक वापरांसाठी अतिक्रमण केलेले क्षेत्र.

(ख) उप सिंचनाखालील क्षेत्र (उपसा सिंचनाखालील लाभक्षेत्र म्हणून स्वतंत्रपणे पुन्हा अधिसूचित करावे.)

(२) पाण्याची उपलब्धता :- कालवा अधिकारी, प्रकल्प स्तरावर सिंचनासाठी (उपसा व प्रवाही दोन्ही) पाण्याच्या उपलब्धतेचा काटेकोर आढावा घेईल आणि विशेष करुन महाराष्ट्र जलसंपत्ती नियमक प्राधिकरण अधिनियम २००५ याची कलमे ११,१२,१३, १४ व २२ विचारात घेऊन सिंचन व बिगर सिंचनोत्तर प्रयोजनांकरीता पाण्याच्या

नियत वाटपाशी संबंधित व्यापक प्रश्नांचा खोरे किंवा उपखोरे स्तरावर योग्य विचार केल्यानंतर, संपूर्ण प्रकल्पासाठी हक्काच्या पाणीवापराचे विहित युनिट ठरविल.

(३) निधीची उपलब्धता :- कार्यक्षेत्र निश्चितीसंदर्भात कोणतीही अधिसूचना काढण्यापूर्वी सुमचित प्राधिकरण, किंवा यथास्थिती कालवा अधिकारी, पुनर्वसनाच्या खर्चाकरीता आवश्यक तो निधी मिळाला आहे याची खात्री करुन घेईल.

२. पद्धतशीर व एक प्रणाली म्हणून (systemic) कार्यक्षेत्र निश्चिती करताना अंमलात आणावयाचे उपाय :-

(१) पद्धतशीर व एक प्रणाली म्हणून (systemic) कार्यक्षेत्र निश्चित करणा-या प्रयोजनासाठी संबंधित प्रकल्पाच्या अलिकडच्या किंवा अद्ययावत लाभक्षेत्र नकाशावर खालील तपशील अंतर्भूत असणे आवश्यक आहे :-

क) खालील बांधकामाचे अंतरासहीत ठिकाण,

(एक) सर्व विमोचके/शीर्षनियंत्रक

(दोन) सर्व प्रवाहमापन साधने,

(तीन) सर्व काट नियमक तथा अतिवाहक,

(चार) सर्व कोल्हापूर पद्धतीचे बंधारे,

(पाच) सर्व वैयक्तिक आणि सर्व सामूहिक उपसा सिंचन योजनांची पाणी उपसा करण्याची ठिकाणे (जलाशय, नदी कालवे इत्यादींवरील ठिकाणांसह),

ख) लाभक्षेत्र (सर्वेक्षण क्रमांक किवा गट क्रमांक या सहीत)

(एक) सर्व थेट विमोचक, लघुवितरिका, वितरिका, शाखा कालवे, कालवे.

(दोन) सर्व कोल्हापूर पद्धतीचे बंधारे,

(तीन) सर्व वैयक्तिक व सामूहिक उपसा सिंचन योजना,

(चार) विद्यमान पाणी वापर संस्था (प्रवाही व उपसा दोन्ही)

ग) पाटबंधारे शाखा, उपविभाग, विभाग इत्यादींच्या प्रशासकीय सिमारेषा.

घ) गांव, तालुका, व जिल्हा यांच्या सीमारेषा.

ङ) प्रवाही उपसा सिंचन योजनेच्या लाभक्षेत्राचे भाग पुढील पैकी असतील :-

(एक) पूर्णपणे विकसीत आणि नियमित सिंचनाखालील,

(दोन) अडचणी असलेले आणि नियमित सिंचनाखाली नसलेले,

(तीन) विकसीत होत असलेले,

(२) कालवा अधिकारी क्षेत्र निश्चितीसाठी परिच्छेद २(१) मध्ये नमूद केलेल्या तपशीलासह प्रकल्पाच्या अद्ययावत पाणलोटक्षेत्र नकाशाचा वापर करील. योजनेच्या आराखडयांचा (उपसा सिंचन-आराखडा १, आणि प्रवाही अधिक अंशतः उपसा सिंचन-आराखडा २) क्षेत्र निश्चितीसाठी मार्गदर्शक म्हणून वापर करण्यात येईल. कालवा अधिकारी सर्व स्तरावरील सर्व पाणी वापर संस्थाचे आणि सर्व प्रकारच्या उपसा सिंचनाचे क्षेत्र निश्चित करण्यासाठी एक आराखडा तयार करील. परिच्छेद ३ मध्ये दिलेल्या मूलभूत तत्वांच्या आधारे संपूर्ण प्रकल्पासाठी उक्त नकाशावरील पाणी वापर संस्था , एका व्यापक स्तरावर एकत्रितपणे काम करतील. नियोजित केल्याप्रमाणे पाणी वापर संस्था आणि उपसा सिंचन पाणी वापर संस्था या बाबतच्या अधिसूचना प्रशासकीय सोयीनुसार (म्हणजे अधिनियमाच्या कलम ५३ च्या पोटकलम १ च्या तरतुदी विचारात घेवून, लघु वितरिका स्तरावरील पाणी वापर संस्था आणि उपसा सिंचन पाणी वापर संस्था यांच्या प्रथम आणि वितरिका स्तरावरील पाणी वापर संस्था, कालवा स्तरावरील पाणी वापर संस्था आणि प्रकल्प स्तरावरील पाणी वापर संस्था यांच्यानंतर) अशा प्रकारे गटागटाने किंवा टप्याटप्याने काढण्यात येतील.

३. कार्यक्षेत्र निश्चित करण्याची मूलभूत तत्वे :-

(१) लघु वितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थेचे कार्यक्षेत्र (लागवडीलायक लाभक्षेत्र असे या अर्थाने) जास्तीत जास्त एक हजार हेक्टर असेल आणि शक्य तो ते, जलशास्त्रीय तत्वाच्या आधारे निवडलेल्या जमिनीच्या सलग खंडामध्ये असेल. अपवादात्मक परिस्थितीत, कार्यक्षेत्रात वाढ करताना त्या बद्दलची कारणे लेखी नमूद केल्यानंतर ते वाढविण्यात येईल.

(२) कार्यक्षेत्रात पुढील कोणत्याही क्षेत्राचा समावेश असेल :-

(एक) लघु वितरिकास्तरावरील पाणी वापर संस्थेचे क्षेत्र

(दोन) वितरिकास्तरावरील पाणी वापर संस्थेचे क्षेत्र

(तीन) एकापेक्षा जास्त, शेजारील किवा लगतच्या लघु वितरिकास्तरावरील पाणी वापर संस्थांचे क्षेत्र

(चार) एका लघु वितरिकास्तरावरील पाणी वापर संस्थांचे क्षेत्र आणि शेजारच्या किंवा लगतच्या मार्गस्थै विमोचकाखालील क्षेत्र,

(पाच) एका लघु वितरिकास्तरावरील पाणी वापर संस्थांचे क्षेत्र शेजारच्या किंवा लगतच्या वैयक्तिक उपसा सिंचन योजनेखालील क्षेत्र,

(सहा) एका उपसा सिंचन योजनेखालील क्षेत्र

(सात) एकापेक्षा जास्त, शेजारील किंवा लगतच्या (लहान) उपसा सिंचन योजनांखालील क्षेत्र.

(नऊ) शेजारच्या किंवा लगतच्या वैयक्तिक उपसा सिंचन योजनांच्या समुहाखालील क्षेत्र,

(दहा) एका लघु प्रकल्पाखालील क्षेत्र.

टीप :- जमिनीचा सलग भूखंड म्हणजे केवळ नैसर्गिक नाला आणि/किंवा किरकोळ भौगोलिक वैशिष्टयामुळे विभागले गेलेले एकमेकाला लागून असलेले क्षेत्र होय. एखाद्या पाणी वापर संस्थेचे कार्यक्षेत्र, दुसऱ्या कोणत्याही पाणी वापर संस्थेच्या कार्यक्षेत्रात आलेले नसावे.

(३) प्रत्येक वितरिका व कालवा याची अनुक्रमे स्वतंत्र वितरिका स्तरावरील पाणी वापर संस्था आणि कालवास्तरावरील पाणी वापर संस्था असावी. तथापि, प्रकल्पाचे आकारमान,वितरिकांची संख्या आणि प्रशासकीय सोय यानुसार वितरिका स्तरावरील पाणी वापर संस्था किंवा कालवा स्तरावरील पाणी वापर संस्था किंवा दोन्ही समुचित प्राधिकरणाने तशी परवानगी दिल्यास वगळता येतील. लघु वितरिका स्तरावरील पाणी वापर संस्था, उपसा सिंचन पाणी वापर संस्था आणि प्रकल्प स्तरावरील पाणीवापर संस्था मात्र, आवश्यक आहेत. एखाद्या लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या बाबतीत, त्याचे लागवडियोग्य लाभक्षेत्र व गावांची संख्या यानुसार लहान उपकालवा लघु वितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थेला, समुचित प्राधिकरणाने तशी परवानगी दिल्यास, प्रकल्पस्तरावरील पाणी वापर संस्था मानता येईल.

(४) अगोदरच अस्तित्वात असलेल्या पाणी वापर संस्थांची कार्यक्षेत्रे निश्चिती आणि त्यांच्या परिणामारुप अधिसूचना काढण्याची प्रक्रिया, या अधिनियमाच्या आणि त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींनुसार त्वरित पूर्ण करण्यात येईल.

४. लघु वितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थेचे कार्यक्षेत्र निश्चित करण्यासाठी काढावयाच्या अधिसूचनेची कार्यपध्दती :-

(१) प्रस्तुत अधिनियमांन्वये नियुक्त केलेला अधिकार प्रदान केलेला कालवा अधिकारी, लघु वितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थांच्या लाभक्षेत्राची वर नमूद केलेल्या मार्गदर्शक तत्वाच्या आधारे, निश्चिती करण्यासाठी, या जोडपत्रासोबत जोडलेल्या प्रपत्रात, राजपत्रातून अधिसूचना प्रसिध्द करील. प्रत्येक पाणी वापर संस्थेचे नांव वेगळे असेल.

(२) कालवा अधिकाऱ्यास एकतर स्वतःहून किंवा त्यांच्याकडे करण्यात आलेल्या अर्जावरुन, लेखी नमूद करण्याच्या कारणास्तव, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे प्रसिध्द केलेल्या कार्यक्षेत्रामध्ये सुधारणा किंवा दुरुस्ती करता येईल.

(३) जोडपत्र-१ च्या नमूना-२ मध्ये विनिर्दिष्ट केलेला संपूर्ण तपशील दर्शविणाऱ्या, पाणी वापर संस्थेच्या अद्ययावत नकाशाची प्रमाणित प्रत तसेच तिच्या कार्यक्षेत्रातील जमिनीचे धारक किंवा भोगवटादार यांची सूची, राजपत्रात कार्यक्षेत्राची अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या लगत पुढच्या दिवशी संबंधित ग्रामपंचायत, पाटबंधारे शाखा, उप विभाग व विभाग यांच्या कार्यालयाच्या सूचना फलकावर, लावण्यात येईल.

(४) पाणी वापर संस्थेच्या कार्यक्षेत्राचे अद्ययावत नकाशे :- पाणी वापर संस्थांच्या कार्यक्षेत्राच्या अद्ययावत नकाशावर पुढील तपशील (शक्य तो १:२००० ते १:४००० या प्रमाणात) दर्शविण्यात येईल.

(एक) प्रकल्पाचे नाव, गाव, तालुका, जिल्हा आणि नदी उपखोरे,

(दोन) मूळ कालवा प्रणालीचा भाग (ज्यावर पाणी वापर संस्था स्थित असेल असा कालवा, शाखा, कालवा, वितरिकाव लघु वितरिका

(तीन) शीर्ष विमोचकाचे ठिकाण, साखळी क्रमांक आणि क्षमता (म्हणजेच निर्देशित विसर्ग प्रमाण, लिटर्स प्रति सेकंद आणि क्युसेक अशा दोन्ही एककात)

(चार) लघु वितरिकेचे संरेखा व त्यावरील बांधकामाचा प्रकार व स्थान,

(पाच) शासनाने अधिगृहित केलेल्या जमिनीच्या सीमा व त्यावरील शासकीय बांधकामे, शासनाने संपादित केलेल्या जमिनीचे क्षेत्र (हेक्टरमध्ये), शासकीय बांधकामांचे प्रकार व संख्या,

(सहा) पाणी वापर संस्थेच्या कार्यक्षेत्राच्या सीमारेषांची वैशिष्टये (जसे गाव, सीमा, इतर पाणी वापर संस्था इत्यादी)

(सात) अधिकृतपणे प्राप्त केलेल्या अगदी अलीकडील महसुली अभिलेखानुसार, गट क्रमांक किंवा भूमापन क्रमांक आणि त्यांचे पोटभाग व क्षेत्र हेक्टरमध्ये.

(आठ) सर्व नैसर्गिक प्रवाहांच्या संरेखा व असल्यास त्यांची नांवे व त्यावरील असलेली अस्तित्वातील बांधकामे,

(नऊ) कृत्रिमरीत्या बांधण्यात आलेलया सर्व चरांचे (निःस्सारण मार्गांचे) संरेखन व त्यावरील अस्तित्वातील बांधकामे

(दहा) पाणी वापर संस्थेचा सुरुवातीचा , मध्यावरचा व शेवटाचा प्रभाग (संपूर्ण चक केवळ एकाच भागात असावे). या भागांचे क्षेत्र निश्चित करण्यासाठी खालील निकष वापरण्यात येतील.

क) प्रत्येक सुरुवातीचे, मध्यावरचे आणि शेवटाचे लागवडयोग्य लाभक्षेत्र हे, पाणी वापर संस्थेच्या एकूण लागवडयोग्य लाभक्षेत्राच्या अदमासे एक तृतिअंश इतके असेल.

ख) सुरुवातीच्या, मध्यावरच्या आणि शेवटाच्या भागांचे मतदारसंघ (प्रभाग) निश्चित करताना, कोणत्याही एका विमोचकाचे क्षेत्र दोन किंवा तीन मतदारसंघात (प्रभागात) विभागले जाऊ नये.

ग) प्रथम सुरुवातीच्या क्षेत्राचे आणि नंतर शेवटाच्या क्षेत्राचे प्रभाग पाडण्यात येतील आणि उर्वरित क्षेत्र आपोआप मध्यावरचा प्रभाग म्हणून निश्चित होईल.

(अकरा) सिंचन तसेच बिगर सिंचन प्रयोजनांसाठी वापरात असलेल्या सर्व खोद विहिरी व विंधण विहिरी.

(बारा) कोल्हापूर पध्दतीचे बंधारे, बंधारे, पाझर तलाव, नाला बांध, गावतळी, भूमिगत बंधारे अशी सर्व प्रकारची पाणी साठवण्याची बांधकामे.

(तेरा) पाणी वापर संस्थांच्या कार्य क्षेत्रातील सर्व विद्यमान आणि/किंवा प्रस्तावित उपसा सिंचन (विहिरींचे क्षेत्र वगळून) योजनांची जलग्रहण ठिकाणे, स्त्रोत व क्षेत्र

(चौदा) अधिसूचनेचा तपशील जसे, राजपत्राचा भाग, अधिसूचनेचा क्रमांक व दिनांक.

(पंधरा) अधिसूचना काढणाऱ्या अधिकाऱ्याचे नांव, पदनाम व कार्यालय,

(सोळा) हा नकाशा, प्रस्तुत अधिनियमाच्या कलम ६ च्या पोटकलम २ च्या खंड (क) च्या आवश्यकतांप्रमाणे आहे, आणि याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की, या नकाशावर दाखविलेला तपशील उपलब्ध अभिलेखाप्रमाणे आहे, असे नमूद करणारे अधिसूचना काढणाऱ्या अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र.

(सतरा) कलम ५ आणि/किंवा अपील अधिकाऱ्याचा आदेश यांच्या विशिष्ट संदर्भात, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार नकाशातील नंतरचे कोणतेही फेरफार, अशा फेरफारांशी निगडित असलेल्या संबध्द तपशिलासह यथोचितरीत्या दाखविण्यात येतील.

टीप :- वर नमूद केलेला तपशील, वितरिका स्तरावरील पाणी वापर संस्था, कालवा स्तरावरील पाणी वापर संस्था आणि प्रकल्प स्तरावरील पाणी वापर संस्था यांच्या कार्यक्षेत्राच्या अद्ययावत नकाशांवर, योग्य त्या फेरफारांसह दाखविण्यात येईल.

(५) जमिनीच्या धारकांची व भोगवटदारांची अद्ययावत सूची :-

जोडपत्र-१ च्या नमुना दोनमध्ये जमिनीच्या धारकांची आणि/किंवा भोगवटादारांची अद्ययावत सूची तयार करण्यात येईल. अशी सूची, जमिनीच्या धारकांनी आणि /किंवा भोगवटादारांनी दिलेल्या लेखी माहितीवर आधारलेली असेल.

टीप :- वितरिका स्तरावरील पाणी वापर संस्था, कालवा स्तरावरील पाणी वापर संस्था आणि प्रकल्प स्तरावरील पाणी वापर संस्था यांच्या अद्ययावत सूच्या ह्या अनुक्रमे जोडपत्र-१ च्या नमुना-तीन, चार आणि पाच यामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असतील.

(६) उक्त अधिसूचनेची प्रत मिळण्यासाठीची फी ही, शासनाने वेळोवेळी ठरवून दिल्याप्रमाणे असेल.

(६) रेखांकनाच्या संबंधातील उक्त अधिसूचना प्रसिध्द झाल्यानंतर, संबंधित कालवा अधिकारी, उक्त अधिसूचनेकडे जनतेचे लक्ष वेधून घेण्यासाठी पाणी वापर संस्थेच्या त्या रेखांकित क्षेत्राबाबत कार्य क्षेत्राच्या परिसरातील आघाडीच्या स्थानिक वृत्तपत्रातही ती अधिसूचना प्रसिध्द करील.

मार्गदर्शक आकृति-१ : उपसा सिंचन (परिशिष्ट-१)



उपसा सिंचन पा.वा. संस्था

१) जलाशयावरील
२) मुख्य कालव्यावरील
३) धरण ते उन्नेयी बंधाऱ्या दरम्यानच्या नदीवरील
४) प्रवाही सिंचनाच्या लाभक्षेत्रातील नदीवरील
५) जलाशयातून पाणी पुरवठा होणाऱ्या को.प. बंधाऱ्यावरील
६) जलाशयातून पाणी पुरवठा न होणाऱ्या को.प. बंधाऱ्यावरील

मार्गदर्शक आकृति क्र. २ : प्रवाही + उपसा (अंशतः) परिशिष्ट- १



नमुना- एक

जोडपत्र-१

[नियम ५(३) व ५(५) पहा]

पाणी वापर संस्थांच्या नोंदणीची नोंदवही

_____ पाटबंधारे विभाग _____, _____
(कमांक) (ठिकाण)

_____ प्रकल्प (मोठा / मध्यम / लघु)
(नांव)

अ. क्र.	पाणी वापर संस्थेचे नांव व पत्ता	नोंदणी क्रमांक व दिनांक	पाणी वापर संस्थेचा प्रवर्ग	पाणी वापर संस्थेचा प्रकार	लहान उपकालवा (लघुवितरिका) उपकालवा (वितरिका) क्रमांक	एकूण क्षेत्र (सी.सी.ए.) हेक्टर	लाभधार कांची संख्या	लाभ मिळणाऱ्या गावांची संख्या व नांवे	शेरा
१	२	३	४	५	६	७	८	९	१०

१. प्रवाही / उपसा / संयुक्त

२. लहान उपकालवा (लघुवितरिका) /उपकालवा (वितरिका) कालवा / प्रकल्प स्तरावरील पाणी वापर संस्था

नमुना- दोन

जोडपत्र-१

[नियम ३ व जोडपत्र-१ परिच्छेद ४(३) व (५) पहा]

भूधारक आणि / अथवा भोगवटदारांची यादी

_____ पाणी वापर संस्था, _____

(नाव) (गाव)

लहान उपकालवा (लघुवितरिका) /(लघुवितरिका) व सरळ विमोचक: _____ उपसा: _____ सिंचन शाखा: _____ ग्रामपंचायतीचे ठिकाण: _____

उपकालवा वितरिका _____ स्त्रोत: _____ उपविभाग: _____ तालुका: _____

शाखा कालवा: _____ विभाग: _____ जिल्हा: _____

प्रकल्प _____ मंडळ: _____ राज्याचा विभाग: _____

प्रकल्पाचा प्रकार: _____ प्रादेशिक विभाग: _____

नदीचे उपखोरे: _____ महामंडळ: _____

अ. क्र.	नांव	लिंग पु / स्त्री	जन्म तारीख	____ या दिनांकास वय	प्रवर्ग अनुसुचित जाती/जमाती/ सर्वसाधारण	गाव	भूमापन क्रमांक सर्व्हेक्षण क्रमांक / गट क्रमांक	प्रादेशिक विभाग (सुरुवातीचा मध्यावरील/ शेवटाकडील)	अन्य पाणी वापर संस्थेतील भूधारक अथवा भोगवटदार आहे का? असल्यास, संस्थेचे / संस्थांची नांवे	भूधारक अथवा भोगवटदाराची नमुना सही अथवा अंगठा
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११

*अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/सर्वसाधारण

नमुना- तीन

जोडपत्र-१

[जोडपत्र-१ परिच्छेद ४(५) पहा]

उप कालवा (वितरिका) स्तरावरील पाणी वापर संस्थेत समाविष्ट केलेल्या लघु वितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थांची यादी

_____ वितरिका स्तरावरील पाणी वापर संस्था, _____

(नाव) (गाव)

वितरिका: _____उपविभाग: _____ तालुका: _____
शाखा कालवा: _____विभाग: _____ जिल्हा: _____
कालवा:----------
प्रकल्प: _____मंडल: _____ राज्याचा विभाग: _____
प्रकल्पाचा प्रकार: _____प्रादेशिक विभाग: _____
नदीचे उपखोरे: _____ महानगरपालिका: _____

उप कालवाच्या (वितरिकेच्या) मुखाकडील नेमून दिलेले पाण्याचे प्रमाण
_____, _____, _____

(लिटर्स प्रति सेकंद) (क्युसेक) (क्युमेक)
हक्काच्या पाणी वापराचे विहित युनिट (घ.मी./हेक्टर)
_____
खरीप रबी उन्हाळी
_____
पाणी वापर हक्कांचे मंजूर प्रमाण (सहस्त्र घ.मी.)
_____
खरीप रबी उन्हाळी

अ. क्र.	लघु वितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थेचे नाव	लघु वितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थेचा पत्ता	पाणी वापर संस्थेचे कार्यक्षेत्र निश्चित करण्यासंबंधा तील अधिसूचनेचा दिनांक	नोंदणी क्रमांक व दिनांक	प्रकार (प्रवाही/उपसा/ संयुक्त)	प्रादेशिक भाग (मुखाकडील/ मध्यावरील/ शेवटाकडील)	मुखाकडील भागासाठी नेमून दिलेले पाण्याचे प्रमाण (लिटर्स प्रति सेकंद/ क्युसेक)	सी.सी.ए. (हेक्टर)	पाणी वापर हक्कांचे मंजूर प्रमाण (सहस्त्र घ.मी.) _____ खरीप रबी उन्हाळी
१	२	३	४	५	६	७	८	९	१०

नमुना- चार

जोडपत्र-१

[नियम ३ व जोडपत्र-१ परिच्छेद ४(५) पहा]

उप कालवा (वितरिका) स्तरावरील पाणी वापर संस्थेत समाविष्ट केलेल्या लघु उपकालवा (वितरिका) स्तरावरील पाणी वापर संस्थांची यादी

_____ वितरिका स्तरावरील पाणी वापर संस्था, _____

(नाव) (गाव)

वितरिका: _____उपविभाग: _____ तालुका: _____

शाखा कालवा: _____विभाग: _____ जिल्हा: _____

कालवा: ----------

प्रकल्प: _____मंडल: _____ राज्याचा विभाग: _____

प्रकल्पाचा प्रकार: _____प्रादेशिक विभाग: _____

नदीचे उपखोरे: _____ महानगरपालिका: _____

उप कालवाच्या (वितरिकेच्या) मुखाकडील नेमून दिलेले पाण्याचे प्रमाण

_____, _____, _____

(लिटर्स प्रति सेकंद) (क्युसेक) (क्युमेक)

हक्काच्या पाणी वापराचे विहित युनिट (घ.मी./हेक्टर)

_____

खरीप रबी उन्हाळी

_____

पाणी वापर हक्कांचे मंजूर प्रमाण (सहस्त्र घ.मी.)

_____

खरीप रबी उन्हाळी

अ. क्र.	लघु वितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थेचे नाव	लघु वितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थेचा पत्ता	पाणी वापर संस्थेचे कार्यक्षेत्र निश्चित करण्यासंबंधा तील अधिसूचनेचा दिनांक	नोंदणी क्रमांक व दिनांक	प्रादेशिक भाग (मुखाकडील/ मध्यावरील/ शेवटाकडील)	मुखाकडील भागासाठी नेमून दिलेले पाण्याचे प्रमाण (लिटर्स प्रति सेकंद/ क्युसेक)	सी.सी.ए. (हेक्टर)	पाणी वापर हक्कांचे मंजूर प्रमाण (सहस्त्र घ.मी.) _____ खरीप रबी उन्हाळी
१	२	३	४	५	६	७	८	९

नमुना- पाच

जोडपत्र-१

[नियम ३ व जोडपत्र-१ परिच्छेद ४(५) पहा]

प्रकल्पस्तरीय पाणी वापर संस्थेत समाविष्ट केलेल्या कालवा स्तरीय पाणी वापर संस्था, उपसा सिंचन पाणी वापर संस्था तसेच अन्य पाणी वापर संस्था यांची यादी

_____ प्रकल्पस्तरीय संस्था, _____

(नाव) (गाव)

कालवा: _____ विभाग: _____ तालुका: _____

प्रकल्प: _____मंडल_____ जिल्हा: _____

प्रकल्पाचा प्रकार: _____प्रादेशिक विभाग: _____ राज्याचा विभाग: _____

नदीचे उपखोरे: _____ महानगरपालिका_____

हक्काच्या पाणी वापराचे विहित युनिट (घ.मी./हेक्टर)

_____

खरीप रबी उन्हाळी

_____

कालवा मुखाशी पाणी वापर हक्कांचे मंजुर प्रमाण (सहस्त्र घ.मी.)

_____

खरीप रबी उन्हाळी

अ. क्र.	लघु वितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थेचे नाव	लघु वितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थेचा पत्ता	पाणी वापर संस्थेचे कार्यक्षेत्र निश्चित करण्यासंबंधा तील अधिसूचनेचा दिनांक	नोंदणी क्रमांक व दिनांक	प्रकार (प्रवाही/उपसा/ संयुक्त)	प्रादेशिक भाग (मुखाकडील/ मध्यावरील/ शेवटाकडील)	मुखाकडील भागासाठी नेमून दिलेले पाण्याचे प्रमाण (लिटर्स प्रति सेकंद/ क्युसेक)	सी.सी.ए. (हेक्टर)	पाणी वापर हक्कांचे मंजूर प्रमाण (सहस्त्र घ.मी.)		
									खरीप	रबी	उन्हाळी
१	२	३	४	५	६	७	८	९	१०		

जोडपत्र-२

निवडणुका घेणे
(नियम ७(१), ७, (८) व ७, (९) आणि नियम ८(१) पहा)
भाग-एक

सक्षम प्राधिकारी, निवडणूक अधिकारी, सहायक निवडणूक अधिकारी यांची नियुक्ती व त्यांची कर्तव्ये

१. निवडणुकांवरील नियंत्रण :

(१) या अधिनियमाखालील पाणी वापर संस्थांच्या व्यवस्थापन समितीच्या संचालकाची निवडणूक, कालवा अधिकाऱ्याच्या किवा राजपत्रातील अधिसूचनेद्वारे यथोचितरित्या नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याच्या सर्वसाधारण अधिक्षणाखाली व नियंत्रणाखाली घेण्यात येईल. या अधिनियमाखालील निवणुकांच्या प्रयोजनार्थ, उक्त कालवा अधिकारी हा निवडणूक अधिकारी असल्याचे मानण्यात येईल.

(२) कालवा अधिकारी, निवडणूका घेतेवेळी जोडपत्र-२ च्या नमुना-१ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीचे पालन करील.

२. सहायक निवडणूक अधिकाऱ्यांची नियुक्ती व त्यांची कर्तव्ये :

(१) निवडणुक अधिका-यास त्यांची निवडणूक विषयक कामे पार पाडताना त्याला मदत करण्यासाठी एका किंवा अधिक व्यक्तींची सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून नियुक्ती करता येईल :

परंतु अशी प्रत्येक व्यक्ती ही राज्य शासनाची अधिकारी असेल.

(२) प्रत्येक सहायक निवडणूक अधिकारी, निवडणूक अधिकाऱ्यांच्या नियंत्रणास अधीन राहून, निवडणूक अधिका-याची सर्व किंवा त्यापैकी कोणतीही कामे पार पाडण्यास सक्षम असेल :

परंतु कोणताही सहायक निवडणूक अधिकारी, निवडणूक अधिकाऱ्याची जी कामे नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्याशी संबंधित आहेत अशी कोंणतीही कामे, उक्त करण्यास उक्त निवडणूक अधिकाऱ्यास अपरिहार्यपणे प्रतिबंध केलेला नसेल तर करणार नाही.

(३) या नियमांन्वये किंवा त्याखाली दिलेल्या आदेशांन्वये तरतूद केलेल्या रितीने परिणामकारक निवडणुका घेण्यासाठी आवश्यक असतील अशी सर्व कामे व गोष्टी करणे, हे कोणत्याही निवडणूकातील निवडणूक अधिका-यांचे सर्वसाधारण कर्तव्य असेल.

भाग-दोन

मतदार यादी

३. मतदारयादी तयार करणे :-

(१) संबंधित कालवा अधिकारी, जे जमिनधारक व भोगवटादार आहेत आणि ज्यांनी वयाची अठरा वर्षे पूर्ण केलेली आहेत अशा प्रादेशिक भागाच्या सुरुवातीलकडील, मध्यावरील व शेवटाकडील सदस्यांची प्रादेशिक भागनिहाय यादी तयार करील. जोडपत्र दोन च्या नमुना-२ मध्ये तयार केलेल्या अशा प्रादेशिक भागनिहाय यादया संबंधित पाणी वापर संस्थेच्या निवडणूक याद्या म्हणून समजण्यात येतील. निवडणूक अधिकारीख्, निवडणूक प्रक्रिया सुरु होण्यापूर्वी ९० दिवस आधी हक्क अभिलेख्यांच्या आधारे निवडणूक यादीचे नवीकरण करील.

(२) निवडणूक अधिकारी उप-परिच्छेद (१) अन्वये तयार केलेली मतदार यादी, जलसंपदा विभागाच्या, ग्रामपंचायतीच्या व पाणी वापर संस्थेच्या संबंधित कार्यालयाच्या सूचना फलकावर हरकती मागविणाऱ्या नोटीशीसह प्रदर्शित करील आणि उक्त नोटीस प्रसिध्द केल्याच्या तारखेपासून तीन दिवसाच्या कालावधीत त्या मतदार यादीच्या संबंधातील हरकती मागविल.

४. दावे व हरकतीचे नमुने :

(१) जिचे नांव मतदारयादीत नोंदविलेले नाही किंवा ते चुकीच्या ठिकाणी नोंदविलेले आहे किंवा ते चुकीच्या रितीने नोंदविलेले किंवा चुकीच्या माहितीसह नोंदविलेले आहे अशी कोणतीही व्यक्ती अथवा जिचे नांव मतदार यादीत नोंदविलेले आहे आणि जिची तिचे स्वतःचे किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीचे नांव त्या मतदार यादीत समाविष्ट करण्यास हरकत आहे अशी कोणतीही व्यक्ती, नमुना-३ मध्ये दावा करु शकेल. किंवा जोडपत्र २ च्या नमुना ४ मध्ये अशा प्रकारे नांव समाविष्ट करण्यास हरकत घेवू शकेल किंवा ते संबंधित कालवा अधिकाऱ्याच्या कार्यालयास टपालाद्वारे पाठवू शकेल. या सर्व हरकती किंवा दावे, विहित कालावधीत, म्हणजेच तीन दिवसांच्या आत निवडणूक अधिकाऱ्या मिळणे आवश्यक असून त्या कालावधीनंतर मिळालेला कोणताही दावा किंवा हरकत विचारात घेतली जाणार नाही.

(२) मतदार यादीत नाव समाविष्ट करण्याबाबतचा प्रत्येक दावा, जोडपत्र-२ च्या नमुना तीन मध्ये करण्यात येईल आणि त्यावर, मतदार यादीत आपले नाव समाविष्ट करण्याची इच्छा असणाऱ्या व्यक्तीची स्वाक्षरी असेल.

(३) यादीमध्ये नाव समाविष्ट करण्यासंबंधात घेतलेला नमुना ४ मधील प्रत्येक आक्षेप हा, विशेष करुन ज्या व्यक्तीचे नांव यापूर्वीच संबंधित पाणी वापर संस्थेच्या यादीत समाविष्ट असेल त्या व्यक्तीकडून घेण्यात येईल.

(४) यादीमधील एखाद्या विशिष्ट नोंदीसंबंधात किंवा तपशीलासंबंधात घेतलेला नमुना ५ मधील प्रत्येक आक्षेप हा, ज्या व्यक्तीचे नांव मतदार यादीत समाविष्ट करण्यात आले असेल त्या व्यक्तीकडून घेण्यात येईल.

(५) दावेदार किंवा आक्षेप घेणा-या व्यक्तीने, दावा किंवा यथास्थिती, आक्षेप हा ज्या प्रमाणित कागदपत्रावरुन घेतला आहे ती कागदपत्रे अशा प्रत्येक दाव्यासोबत किंवा आक्षेपासोबत जोडण्यात येतील.

(६) कोणताही दावा किंवा आक्षेप हा अशा दाव्याची किंवा आक्षेपाची एक प्रत संबंधित कालवा अधिकाऱ्याच्या कार्यालयात सादर करण्यात आली असल्याखेरीज विचारात घेण्यात येणार नाही.

(७) विनिर्दिष्ट मुदतीत किंवा विहित नमुन्यात व विहित पध्दतीने दाखल करण्यात न आलेला कोणताही दावा किंवा आक्षेप फेटाळण्यात येईल.

५. दावे व आक्षेप (हरकती) निकालात काढणे :

(१) निवडणूक अधिकारी :-

(क) दावाकारावर त्यांनी केलेल्या दाव्यासाठी ;

(ख) आक्षेप घेणाऱ्या व्यक्तीवर तिने घेतलेल्या आक्षेपासाठी ;

(ग) संबंधित कालवा अधिकाऱ्यावर, विवादास्पद विषयासंदर्भातील नोटीस मिळाल्यानंतर सात दिवसांच्या आत आपला अहवाल सादर करण्यासाठी नोटीस बजावील ;

परंतु, निवडणूक अधिकारी, दावा किंवा आक्षेपाच्या वैधतेविषयी त्याचे समाधान झाल्यास व आणखी चौकशी न करता तो (दावा किंवा आक्षेप) दाखल करण्याची मूभा देण्याचे त्याने ठरविल्यास, अशी कोणतीही नोटीस बजाविणे आवश्यक असणार नाही ;

परंतु आणखी असे की, नांवे समाविष्ट करण्यासाठी किंवा काढून टाकण्यासाठी अर्ज करणाऱ्या व्यक्तींची नांवे व पत्ते यांचा समावेश असणारी यादी, संबंधित कालवा अधिकाऱ्याच्या, पाणी वापर संस्थेच्या आणि ग्रामपंचायतीच्या कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रदर्शित करण्यात येईल.

(२) उपपरिच्छेद (१) खालील नोटीस एकतर व्यक्तिशः देउुन किंवा नोंदणीकृत डाकेने पाठवून किवा त्या व्यक्तीच्या मतदार संघातील निवासाच्या पत्त्यावर किंवा तिच्या ज्ञात असलेलया शेवटच्या निवासाच्या पत्त्यावर ती चिकटवून किंवा दावेदारावर नोटीस बजावण्याची आवश्यकता नसेल तर, कालवा अधिकाऱ्याच्या कार्यालयात अशी नोटीस ठेऊन देण्यात येईल.

(३) निवडणूक अधिकारी ज्या दाव्याच्या किंवा आक्षेपाच्या संबंधात उप परिच्छेद एक खाली नोटीस देण्यात आली आहे अशा प्रत्येक दाव्याच्या किंवा आक्षेपाची संक्षिप्त चौकशी करील आणि संबंधित कालवा अधिकाऱ्याने याबाबत कोणताही अहवाल दिला असल्यास, त्यावर विचार करील आणि त्यावरील स्वतःचा निर्णय नोंदविल.

(४) दावेदार किंवा यथास्थिती, आक्षेप घेणारी व्यक्ती तसेच जिच्यावर आक्षेप घेण्यात आला आहे ती व्यक्ती आणि निवडणूक अधिकाऱ्याचे मते, जी व्यक्ती त्याला सहाय्यभूत होवू शकेल अशी अन्य कोणतीही व्यक्ती, सुनावणीच्यावेळी उपस्थित राहण्यास व आपले म्हणणे मांडण्यास हकदार असेल.

(५) निवडणूक अधिकारी त्याच्या स्वेच्छाधिकारात ;

(क) कोणत्याही दावेदारास, आक्षेप घेणाऱ्या किंवा आक्षेप घेण्यात आलेल्या व्यक्तीला त्याच्या समोर जातीने उपस्थित राहण्यास फर्मावू शकेल.

(ख) कोणत्याही व्यक्तीने दिलेला पुरावा शपथेवर देण्यास फर्मावू शकेल. आणि त्या प्रयोजनासाठी तिला शपथ देऊ शकेल किंवा दिलेला पुरावा यथोचितरित्या साक्षांकित केलेले शपथपत्र दाखल करुन सादर करण्यास फर्मावू शकेल.

(६) या परिच्छेदाखालील, कोणत्याही कार्यवाहीत, कोणत्याही व्यक्तीला वकीलामार्फत आपली बाजू मांडता येणार नाही. निवडणूक अधिकारी यादीमध्ये त्याला सापडलेले कोणतेही लेखन किंवा मुद्रण दोष देखील सुधारील.

६. अनावधानाने वगळल्या गेलेल्या नावांचा समावेश करणे व मृत मतदारांची आणि नोंदणी केली जाण्यास हक्कदार नसलेल्या व्यक्तींची नांवे वगळणे.

मतदारयादी अंतिमरित्या प्रसिध्द करण्यापूर्वी, कोणत्याही वेळी, निवडणूक अधिकाऱ्यास, कोणत्याही मतदारांची नांवे अनावधानाने किंवा चूकीने किंवा अन्यथा यादीत आलेली नाहीत अथवा मृत व्यक्तींच्या नांवाचा किंवा ज्या व्यक्ती अन्यथा यादीत नोंदणी केली जाणास हक्कदार नव्हत्या अशा व्यक्तींच्या नावाचा समावेश यादीत करण्यात आला आहे आणि या नियमाखाली त्यावर सुधारात्मक उपाय योजना आवश्यक आहे असे आढळून आल्यास निवडणूक अधिकारी -

(क) अशा मतदारांच्या नांवाची आणि अन्य तपशीलांची एक यादी तयार करील

(ख) यादीतून अशी नांवे वगळण्याच्या किंवा यथास्थिती समाविष्ट करण्याच्या प्रश्नावर ज्या ठिकाणी व ज्यावेळी विचार करण्यात येणार असेल त्यासंबंधातील नोटीस यादीच्या प्रतीसोबत आपल्या कार्यालयाच्या आणि पाणी वापर संस्थेच्या कार्यालयाच्या सूचना फलकावर लावील आणि त्याला योग्य वाटेल अशा अन्य रितीने देखील ती यादी व नोटीस प्रसिध्द देखील करील.

(ग) दाखल करण्यात येतील अशा कोणत्याही मौखिक किंवा लेखी आक्षेपांवर विचार केल्यानंतर, ती सर्व किंवा त्यापैकी कोणतीही नांवे मतदारयादीतून वगळण्यात यावीत किंवा यथास्थिती, तीमध्ये समाविष्ट करण्यात यावीत, ते ठरवील.

७. <u>मतदार यादी अंतिमरित्या प्रसिध्द करणे :</u>

(१) निवडणुक आयुक्त, त्यानंतर,

(क) परिच्छेद ६ व ७ खालील त्याने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी आणि मतदार यादीत नंतर सापडलेले लेखन प्रमाद अथवा मुद्रणदोष किंवा अन्य चुका दुरुस्त करण्यासाठी सुधारणांची यादी तयार करील; आणि

(ख) निरीक्षणासाठी सुधारणांच्या यादी व मतदार यादी यांची एक परिपूर्ण प्रत व

नोटीस त्याच्या कार्यालयाच्या सूचनाफलकावर लावून सुधारणांच्या यादीसह मतदार यादी प्रसिध्द करील. आणि त्याच पध्दतीने संबंधित पाणी वापर संस्थेच्या कार्यालयात देखील ती प्रसिध्द करील.

(२) मतदार यादी अशा प्रकारे प्रसिध्द करण्यात आल्यानंतर सुधारणांच्या यादीसह असलेली मतदार यादी ही पाणी वापर संस्थेची मतदार यादी असेल.

८. मतदार यादीचा कालावधी -

परिच्छेद ८ चा उप परिच्छेद (२) मध्ये निर्देशिलेली प्रत्येक मतदार यादी ही, परिच्छेद १० नुसार जोवर मतदार यादीमध्ये सुधारणा करण्यात येत नाही, तोवर अंमलात असणे चालू राहील.

९. मतदार यादीमधील सुधारणा करणे :-

(१) निवडणुक अधिकारी, अर्हतकारी दिनांकाच्या म्हणजेच निवडणूक प्रक्रियेस सुरुवात होण्यापूर्वी ९० दिवस या संदर्भात जसे निर्देश देईल त्यानुसार प्रत्येक पाणी वापर संस्थेच्या मतदार यादीमध्ये एकतर सखोलपणे किंवा संक्षिप्तपणे किंवा अंशतः सखोलपणे आणि अंशतः संक्षिप्त पणे सुधारणा करण्यात येईल.

(२) जेव्हा मतदार यादीमध्ये सखोल सुधारणा करावयाच्या असतील तेव्हा ती नव्याने तयार करण्यात येईल, आणि परिचछेद ५,६,७ आणि ८ च्या तरतुदी, प्रथमच तयार करण्यात येणाऱ्या मतदार यादीच्या संबंधात ज्याप्रमाणे लागू होतात त्याचप्रमाणे त्या अशा सुधारीत मतदार यादीच्या संबंधातही लागू होतील.

(३) जेव्हा मतदार यादीमध्ये किंवा तिच्या कोणत्याही भागामध्ये संक्षिप्त रीतीने सुधारणा करावयाच्या असतील तेव्हा, निवडणूक अधिकारी, चटकन उपलब्ध होईल अशा माहितीच्या आधारे मतदार यादीतील सुधारणांची एक यादी तयार करवून घेईल आणि ती मतदार यादी व सुधारणांची यादी यांचा मसुदा प्रसिध्द करील.

(४) उप परिच्छेद (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, निवडणुक अधिकाऱ्यास, विशेष सुधारणेसाठीची कारणे लेखी नमूद करुन कोणत्याही पाणी वपार संस्थेच्या मतदार यादीमध्ये कोणत्याही वेळी त्याला योग्य वाटेली अशारीतीने विशेष सुधारणा

करण्याचे निदेश देता येतील.

परंतु, असा कोणताही निदेश देण्याच्या वेळी अंमलात असलेली मतदारयादी, असा निदेश दिलेले विशेष सुधारणेचे काम पूर्ण होईपर्यन्त, अंमलात असण्याचे चालू राहील.

१० अंतरिम फेरफार :- (१) निवडणूक अधिकाऱ्याने, स्वतःहून किंवा त्याच्याकडे केलेल्या अर्जावरुन त्याला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, मतदारयादीतील कोणतीही नोंद-

क) कोणत्याही तपशिलाच्या दृष्टीने चुकीची आहे किंवा सदोष आहे, किंवा

ख) संबंधित व्यक्तीने आपली जमीन बदलल्यामुळे दुस-या पाणी वापर संस्थेच्या मतदारयादीत घालण्यात यावी, किंवा

ग) संबंधित व्यक्ती, त्या मतदारयादीत तिची नोंद केली जाण्यास हक्कदार नाही या कारणामुळे वगळण्यात यावी, किंवा

घ) संबंधित व्यक्ती मरण पावली आहे किंवा ती, त्या मतदारयादीत तिची नोंदणी केली जाण्यास हक्कदार नाही या कारणामुळे वगळण्यात यावी,

याबाबत त्याची खात्री पटली असेल तर, तो, याबाबतीत कोणतेही सर्वसाधारण किंवा विशेष निदेश असल्यास त्यांना अधीन राहून त्या नोंदीत सुधारणा करील, ती दुसऱ्या मतदारयादीत घालील किंवा ती वगळील.

परंतु, संबंधित व्यक्ती त्या मतदारसंघाच्या मतदारयादीत तिची नोंदणी केली जाणस हक्कदार नाही या कारणास्तव या परिच्छेदाखालील कोणतीही कार्यवाही करण्यापूर्वी, निवडणूक अधिकारी, संबंधित व्यक्तीला तिच्या बाबत करावयच्या प्रस्तावित कार्यवाहीच्या संबंधात आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देईल.

(२) पाणी वापर संस्थेच्या मतदारयादीत नाव समाविष्ट नसलेल्या कोणत्याही व्यक्तीस, त्या यादीत तिचे नाव समाविष्ट करण्यासाठी निवडणूक अधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल आणि अर्जदार व्यक्ती अशा मतदारयादीत तिचे नाव नोंदले जाण्यास हक्कदार आहे

याबाबत पूर्वोक्त अधिकाऱ्याची खात्री पटली तर, तो तिचे नांव त्या मतदारयादीत समाविष्ट करण्याचे निदेश देईल.

(३) उप परिच्छेद (१) किंवा (२) खाली अर्ज करणाऱ्या व्यक्तींची यादी, आदेश काढण्यापूर्वी पूर्ण तीन दिवसांच्या कालावधीसाठी निवडणूक अधिकाऱ्याच्या सूचना फलकावर प्रदर्शित करण्यात येईल.

(४) परिच्छेद १४ अन्वये निवडणुकीची जाहीर सूचना काढल्यानंतर आणि त्या निवडणुका समाप्त होईपर्यन्त उप परिच्छेद (१) अन्वये कोणत्याही नोंदीमध्ये सुधारणा करण्यात येणार नाही किंवा ती अन्य मतदारयादीत घालण्यात येणार नाही किंवा ती वगळण्यात येणार नाही आणि उप परिच्छेद (२) अन्वये मदारयादीत नाव समाविष्ट करण्यासाठीचा कोणताही निदेश देण्यात येणार नाही.

(५) निवडणूक अधिकाऱ्यास मतदारयादीतील कोणताही लेखनदोष केव्हाही दुरुस्त करुन घेता येईल.

(६) या परिच्छेदानुसार फेरफार करण्यात आलेली मतदारयादी ही त्या वेळी अंमलात असलेली यादी असल्याचे समजण्यात येईल.

(७) उप परिच्छेद (१) व (२) मध्ये निर्दिष्ट केलेले अर्ज, अनुक्रमे जोडपत्र- २ च्या नमुना दोन, तीन आणि चार मध्ये असतील.

११. अपिले :- (१) निवडणूक अधिकाऱ्याने परिच्छेद ५ किंवा १० अन्वये दिलेल्या आदेशावर त्या आदेशाच्या दिनांकापासून सात दिवसांच्या कालावधीच्या आत अपील अधिकाऱ्याकडे अपील करता येईल. परंतु अपील करण्यास इच्छुक असलेल्या एखाद्या व्यक्तीने अपिलाच्या विषयाबाबत निवडणूक अधिकाऱ्यासमोर आपले म्हणणे मांडण्याच्या किंवा अभिवेदन सादर करण्याच्या अधिकाराचा वापर केला नसेल तर, त्याला त्या बाबतीत अपील दाखल करता येणार नाही.

(२) (क) असे अपील, अर्जदाराने स्वाक्षरी केलेल्या ज्ञापनाच्या स्वरुपात असेल.

(ख) त्यासोबत ज्या आदेशाविरुध्द असे अपील करण्यात आले असेल त्या आदेशाची एक

प्रत जोडलेली असेल आणि फी म्हणून शंभर रुपयांचे न्यायिकेतर मुद्रांक जोडलेले असतील, आणि

(ग) अपील, अपील अधिका-याकडे प्रत्यक्ष सादर करण्यात येईल किंवा उक्त कालावधीच्या आत ते त्याच्याकडे पोहोचावे या दृष्टीने नोंदणीकृत डाकेने पाठविण्यात येईल.

(३) या परिच्छेदान्वये अपील सादर केल्यामुळे परिच्छेद ७ किंवा ९ अन्वये निवडणूक अधिकाऱ्याकडून करण्यात यावयाची कोणतीही कार्यवाही स्थगित होणार नाही किंवा ती पुढे ढकलली जाणार नाही.

परंतु परिच्छेद १० खाली देण्यात आलेला आदेश हा जर अपिलाचा विषय असेल तर त्याबाबतीत त्या आदेशाला तहकुबी देण्यात येणार नाही.

(४) अपील अधिकारी, अपिलासंबंधीचे ज्ञापन त्याच्या कार्यालयात मिळाल्याच्या दिनांकापासून तीन दिवसांच्या कालावधीत निर्णय घेईल.

(५) अपील अधिकाऱ्याचा निर्णय अंतिम असेल, परंतु, जेव्हा तो निवडणूक अधिकाऱ्याचा निर्णय फिरवत असेल किंवा त्यात फेरफार करत असेल तेव्हा त्या बाबतीत फक्त तो, अपिलाच्या निर्णयाच्या दिनांकापासूनच अंमलात येईल.

१२. मतदार याद्या ताब्यात ठेवणे व त्यांचे जतन करणे-

(१) एखाद्या मतदारसंघाची मतदारयादी अंतिमतः प्रसिध्द करण्यात आल्यानंतर, त्या मतदारयादीमध्ये त्यानंतर करावयाच्या सखोल सुधारणा करण्याचे काम पूर्ण होईपर्यन्त त्या निवडणूक अधिकाऱ्याच्या कार्यालयात पुढील कागदपत्रे ठेवण्यात येतील :-

(एक) निवडणूक अधिकाऱ्याने यथोचितरीत्या अधिप्रमाणित केलेल्या मतदारयादीची एक परिपूर्ण प्रत.

(दोन) प्रारुप मतदारयादी तयार करण्याच्या संबंधातील सर्व अर्ज.

(तीन) प्रगणन अभिकरणांनी तयार केलेल्या व प्रारुप मतदारयादी तयार करण्याच्या कामी संकलित करण्यासाठी वापरण्यात आलेल्या हस्तलिखितांच्या सर्व प्रति.

(चार) प्रारुप मतदारयादीबाबतच्या सर्व हक्कमागण्या व आक्षेप

(पाच) हक्कमागण्या व आक्षेप यांबाबत दिलेले सर्व निर्णय,

(सहा) परिच्छेद ११ खालील अपिलांसंबंधीची कागदपत्रे, आणि

(सात) परिच्छेद १० खालील अर्ज.

(२) प्रत्येक पाणी वापर संस्थेच्या यादीची निवडणूक अधिकाऱ्याने यथोचितरीत्या अधिप्रमाणित केलेली एक संपूर्ण प्रत त्या यादीमध्ये पुन्हा सखोल सुधारणा होईपर्यन्त निवडणूक अधिकाऱ्याच्या कार्यालयात देखील ठेवण्यात येईल.

(३) उपपरिच्छेद (१) मध्ये निर्दिष्ट केलेली कागदपत्रे, निवडणूक अधिकाऱ्याने विनिर्दिष्ट केलेला कालावधी समाप्त झाल्यानंतर, निवडणूक अधिकारी निदेश देईल अशा रीतीने, निकालात काढली जातील.

(४) उपपरिच्छेद (३) अन्वये विल्हेवाट लावेपर्यन्त, मतदारयादीच्या प्रती, निवडणूक अधिकारी ठरवील अशा किंमतीत विक्रीद्वारे जनतेला उपलब्ध करुन दिल्या जातील.

भाग-३

लघु वितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या संचालकांची निवडणूक

१३. निवडणुकीची नोटीस देणे आणि दिनांक निश्चित करणे-

(१) पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या संचालकांची निवडणूक, निवडणूक अधिकारी ठरवील अशा दिनांकाला घेण्यात येईल.

(२) निवडणूक अधिकारी , निवडणूक घेण्याविषयीची नोटीस पुढील एका किंवा अनेक प्रकारे सदस्यांना देईल :-

(क) पाणी वापर संस्थेच्या सूचना फलकावर नोटीस चिकटवून; किंवा

(ख) संबंधित ग्राम पंचायतीच्या सूचना फलकावर नोटीस चिकटवून; किंवा

(ग) निवडणूक अधिकारी ठरवील अशा, पाणी वापर संस्थेच्या कार्यक्षेत्रातील ठळक जागी नोटीस चिकटवून; किंवा

(घ) स्थानिक वृत्तपत्रांमार्फत.

(३) नोटिशीत पुढील बाबींविषयीची माहिती असेल :-

(क) ज्या पदांकरिता किंवा रिक्त पदांकरिता निवडणूक घेण्यात येणार आहे अशा पदांची किंवा रिक्त पदांची संख्या;

(ख) ज्या मतदारसंघातून सदस्य निवडून द्यावयाचे आहेत तो मतदारसंघ;

(ग) ज्या दिवशी, ज्या ठिकाणी व ज्या वेळात नामनिर्देशनपत्रे सादर करावयाची आहेत तो दिनांक, ती जागा व ती वेळ. हा दिनांक, निवडणुकीसाठी निश्चित केलेल्या दिनांकाच्या किमान संपूर्ण सात दिवस अगोदरचा असेल; किंवा जर त्या दिवशी सार्वजनिक सुटी असेल तर, सार्वजनिक सुटीचा दिवस सोडून त्यानंतरचा दिवस असेल.

स्पष्टीकरण :- या परिच्छेदातील 'सार्वजनिक सुटीचा दिवस' याचा अर्थ, परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ (१८८१ चा अधिनियम क्रमांक २६) याच्या कलम २५ च्या प्रयोजनासाठी असलेला सार्वजनिक सुटीचा दिवस, किंवा शासनाने राज्यातील शासकीय कार्यालयांसाठी सुटीचा दिवस म्हणून अधिसूचित केलेला कोणताही दिवस, असा आहे.

(घ) ज्या दिवशी, ज्या ठिकाणी व ज्या वेळात नामनिर्देशनपत्रांची छाननी करण्यात येईल तो दिनांक, ते ठिकाण व ती वेळ ;

(ङ) ज्या दिवशी व ज्या वेळेपर्यन्त नामनिर्देशन मागे घेता येईल तो दिनांक व ती वेळ; आणि

(च) ज्या दिवशी, ज्या ठिकाणी व ज्या वेळात मतदान घेण्यात येईल तो दिनांक, ते ठिकाण व ती वेळ.

१४. नामनिर्देशनपत्रे सादर करणे :-

(१) प्रत्येक उमेदवार व्यवस्थापन समितीच्या संचालकाच्या निवडणुकीसाठीचे नामनिर्देशनपत्र जोडपत्र-२ नमुना सहा मध्ये परिच्छेद १३ च्या उपपरिच्छेद (३), उपखंड (ग) अन्वये नेमून दिलेल्या दिनांकास किंवा त्यापूर्वी, निवडणूक अधिकाऱ्याकडे पोच देय नोंदणीकृत डाकेने पाठवील किंवा स्वतः नेऊन देईल. सदस्याने निर्धारित फी प्रदान केल्यानंतर निवडणूक अधिकारी त्याला नामनिर्देशनपत्राचा नमुना देईल.

(२) प्रत्येक नामनिर्देशनपत्रावर, ज्याचे नाव मतदारयादीत किंवा या नियमांन्वये केलेल्या यादीत समाविष्ट आहे अशा मतदाराने सूचक म्हणून सही केलेली असेल. निवडणुकीसाठी नाव सुचविलेल्या उमेदवाराने आपण निवडणूक लढविण्यास इच्छुक आहोत अशा अर्थाचे सही केलेली प्रतिज्ञापन देखील या नामनिर्देशनपत्रासोबत असेल.

(३) प्रत्येक नामनिर्देशनपत्र, निर्धारित केलेल्या हमीच्या रकमेसह उमेदवार स्वतःहून किंवा त्याच्या सूचकाद्वारे, परिच्छेद १३ च्या उपपरिच्छेद (३) मध्ये निर्दिष्ट केलेल्या नोटिशीत नामनिर्देशनासाठी विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापूर्वी व वेळेपूर्वी निवडणूक अधिकाऱ्याकडे सादर करील.

(४) निवडणूक अधिकारी, प्रत्येक नामनिर्देशनपत्र मिळाल्यानंतर, त्यावर त्या पत्राचा अनुक्रमांक आणि ते नामनिर्देशनपत्र ज्या दिवशी व ज्या वेळी मिळाले तो दिनांक आणि ती वेळ लेखी नमूद करील आणि ताबडतोब त्या नामनिर्देशनपत्राची पोचपावती देईल.

(५) निवडणूक अधिका-याने नासमनिर्देशपत्र सादर करण्यासाठी नेमून दिलेल्या दिनांकास व वेळेपूर्वी जे नामनिर्देशनपत्र मिळणार नाही ते नामनिर्देशनपत्र नाकारण्यात येईल.

(६) ज्या उमेदवाराने सिंचन पाणी आकार भरण्यात कसूर केली असेल त्या उमेदवाराने सादर केलले नामनिर्देशनपत्र नाकारण्यात येईल.

१५. <u>नामनिर्देशनपत्रांची छाननी :-</u>

(१) निवडणूक अधिकाऱ्याने नामनिर्देशनपत्रांच्या छाननीसाठी नेमून दिलेल्या दिवशी व वेळी उमेदवार आणि त्यांचे सूचक निवडणूक अधिकाऱ्याच्या कार्यालयात उपस्थित राहू शकतील.

(२) निवडणूक अधिकारी, निवडणूक लढविणाऱ्या सर्व उमेदवारांना किंवा त्यांच्या सूचकांना उपरोक्त प्रमाणे त्याला प्राप्त झालेल्या सर्व उमेदवारांच्या नामनिर्देशनपत्रांची तपासणी करण्यासाठी सर्व वाजवी सुविधा पूरवील.

(३) निवडणूक अधिकारी त्याला मिळालेल्या सर्व नामनिर्देशनपत्रांची छाननी कारील आणि कोणत्याही नामनिर्देशनपत्राच्या वैधतेबाबत उदभवू शकतील अशा सर्व आक्षेपांवर निर्णय घेईल आणि त्यावरील त्याचा निर्णय अंतिम असेल.

परंतु, निवडणूक अधिका-याने किंवा इतर कोणत्याही व्यक्तीने कोणताही आक्षेप घेतल्यास, संबंधित उमेदवारास दुस-या दिवसापर्यन्त त्याचे खंडन करण्यास वेळ देण्यात येईल आणि निवडणूक अधिकारी त्याच दिवशी किंवा ज्या दिवशी कार्यवाही स्थगित करण्यात आली त्या दिवशी त्याचा निर्णय नोंदवील :

परंतु आणखी असे की, जर एखाद्या उमेदवाराची किंवा यथास्थिति, त्याच्या सूचकाची ओळख अन्यथा निःसंशयपणे सिध्द झाली असेल तर, त्या उमेदवाराचे किंवा त्याच्या सूचकाचे नामनिर्देशनपत्रातील नाव चुकीचे आहे किंवा या नियमांन्वये तयार केलेल्या मतदार यादीतील त्या उमेदवाराच्या किंवा त्याच्या सूचकाच्या संबंधातील तपशिलापेक्षा वेगळा तपशील त्यात आहे याच केवळ कारणास्तव त्या उमेदवाराचे नामनिर्देशन नाकारण्यात येणार नाही.

(४) मतदान अधिकारी, प्रत्येक नामनिर्देशनपत्रावर ते नामनिर्देशनपत्र स्वीकारले अथवा नाकारले याबाबतचा निर्णय लेखी नमूद करील आणि जे नामनिर्देशनपत्र नाकारण्यात येईल त्यावर , ते नाकारण्याबाबतची कारणे थोडक्यात लेखी नमूद करील.

(५) ज्या दिवशी नामनिर्देशनपत्रांची छाननी पूर्ण होईल त्याच दिवशी, उमेदवार आणि सूचक या दोहोंच्याही नामनिर्देशनपत्रात समाविष्ट असलेल्या वर्णनाबरहुकूम वर्णन

असलेली वैध नामनिर्देशनांची सूची नमुना-७ मध्ये प्रसिध्द करुन निवडणूक अधिकाऱ्याच्या कार्यालयातील सूचना फलकावर लावण्यात येईल.

१६. उमेदवारी मागे घेणे : कोणत्याही उमेदवारास परिच्छेद १३ च्या उपपरिच्छेद (३) खंड (ङ) अन्वये निश्चित केलेल्या दिनांकापूर्वी स्वतःच्या सहीनिशी लेखी नोटीस देऊन आणि ती निवडणूक अधिकाऱ्याच्या कार्यालयात पोहोचती करुन आपली उमेदवारी मागे घेता येईल. ही नोटीस उमेदवार एकतर स्वतः नेऊन देईल किंवा त्याच्या सूचकाद्वारे उथवा उमेदवाराने या बाबतीत लेखी प्राधिकृत केलेल्या एखाद्या निवडणूक एजंटद्वारे पाठवील :

परंतु, उमेदवारी मागे घेण्याबाबतची कोणतीही नोटीस, अशाप्रकारे उमेदवारी मागे घेण्यासाठी निश्चित केलेल्या दिनांकानंतर व वेळेनंतर स्वीकारण्यात येणार नाही. उमेदवारी मागे घेण्याबाबत एकदा दिलेली नोटीस अंतिम असेल.

१७. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी तयार करणे :

(१) परिच्छेद १६ च्या उपपरिच्छेद (१) अन्वये उमेदवारी मागे घेण्यासाठीचा कालावधी समाप्त झाल्यानंतर ताबडतोब निवडणूक अधिकारी, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी नमुना-८ मध्ये तयार करुन ती निवडणूक अधिकाऱ्याच्या कार्यालयातील सूचनाफलकावर लावील. ही यादी, निवडणूक अधिकारी निदेश देईल अशा भाषेत किंवा भाषांमध्ये तयार करण्यात येईल.

(२) उक्त यादीत निवडणूक लढविणा-या उमेदवारांची नामनिर्देशनपत्रात दिल्याप्रमाणे नांवे (वर्णानुक्रमे) व पत्ते अंतर्भूत असतील.

१८. निवडणूक अधिकाऱ्याने चिन्हांचे वाटप करणे :-

(१) ज्या मतदारसंघासाठी निवडणूक घेण्यात येणार आहे त्या मतदारसंघातून संचालकाच्या निवडणुकीसाठी एकच उमेदवार निवडणूक लढवीत असेल आणि त्याचे नामनिर्देशन स्वीकारण्यात आले असेल तर निवडणूक अधिकारी, तात्काळ,

तो उमेदवार यथोचितरीत्या निवडून आल्याचे घोषित करील. जरी वैध नामनिर्देशित उमेदवारांची संख्या एकापेक्षा अधिक असेल तर, निवडणूक अधिका-याने अधिसूचित केलेल्या पुढील यादीतील चिन्हांपैकी उमेदवार निवड करतील ती चिन्हे निवड अधिकारी विनिर्दिष्ट करील :-

(एक) हातपंप

(दोन) रेडिओ किंवा दूरदर्शन संच

(तीन) पंप संच

(चार) दूरध्वनी यंत्र

(पाच) विजेचा खांब

(सहा) तलवार

(सात) बस

(आठ) सायकल

(नऊ) छत्री

(दहा) कुदळ

(अकरा) गाडी (खटारा)

(बारा) मनगटी घडयाळ

(तेरा) कुलूप

टीप : निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या तेरापेक्षा अधिक असेल तर निवडणूक अधिकारी इतर कोणतेही चिन्ह (कोणत्याही राजकीय पक्षाच्या चिन्हापेक्षा वेगळे) नेमून देईल.

१९. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे :-

(१) निवडणूक लढविणा-या उमेदवारांना चिन्हाचे वाटप केल्यानंतर निवडणूक अधिकारी, ताबडतोब, व्यवस्थापन समितीच्या संचालकपदासाठी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी स्वतंत्रपणे जोडपत्र-२ च्या नमुना-९ मध्ये तयार करील. या यादीत, निवडणूक लढविणा-या उमेदवारांची नांवे आणि त्यांना नेमून दिलेली चिन्हे नमूद करण्यात येतील. निवडणूक अधिकारी ही यादी, त्याच्या कार्यालयाच्या सूचनाफलकावर लावील. तसेच या यादीची एक प्रत त्या क्षेत्रातील सार्वजनिक ठिकाणी किंवा मतदान केंद्रावर लावण्याचीही व्यवस्था करील. निवडणूक अधिकारी, अशी यादी तयार झाल्यानंतर ताबडतोब त्याची एक प्रत निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना पाठवील.

(२) निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांपैकी, एकापेक्षा अधिक उमेदवारांनी एकाच चिन्हासाठी पसंती दर्शविली असेल तर, निवडणूक अधिकारी, चिठ्ठया टाकून अशा उमेदवारांपैकी कोणत्या उमेदवाराला त्या चिन्हाचे वाटप करायचे हे ठरवील.

(३) निवडणूक अधिकारी प्रत्येक उमेदवाराला किंवा त्याच्या सूचकाला, त्या उमेदवाराला नेमून दिलेल्या चिन्हाविषयी ताबडतोब कळवील आणि त्या चिन्हाचा नमुनादेखील पाठवील.

२०. मतदान :-(Poll)

(१) कोणत्याही पाणी वापर संस्थेच्या किंवा यथास्थिति, मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी एकापेक्षा अधिक उमेदवारांची वैध नामनिर्देशनपत्रे प्राप्त झाली तर, निवडणूक अधिकारी त्या प्रयोजनासाठी निश्चित केलेल्या दिनांकास मतदान घेण्याची व्यवस्था करील.

(२) निवडणूक अधिकारी, मतपेटया किंवा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे मतपत्रिका, मतदारांच्या यादीची प्रत आणि निवडणूक घेण्यासाठी आवश्यक असतील अशा इतर वस्तुंची व्यवस्था करील. मतपेटीची रचना अशा त-हेची असेल की, मतपत्रिका मतपेटीत घालता येईल परंतु कुलूप उघडल्याशिवाय ती मतपत्रिका बाहेर काढता येणार नाही.

(३) निवडणूक लढविणाऱ्या कोणत्याही उमेदवाराला, निवडणूक अधिकाऱ्याला तसे पत्र देऊन, त्याचा मतदान प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी निवडणुकीच्या वेळी निवडणूक घेण्यात येणाऱ्या प्रत्येक मतदान केंद्रावर प्रतिनिधीची नेमणूक करता येईल. अशा पत्रासोबत, संबंधित प्रतिनिधीची लेखी संमती कळविलेली असेल.

(४) मतदान सुरु होण्याच्या लगतपूर्वी, निवडणूक अधिकारी किंवा त्याच्या अनुपस्थितीत सहाय्यक निवडणूक अधिकारी, त्यावेळी तिथे उपस्थित असलेल्या व्यक्तींना रिकामी मतपेटी दाखवील आणि नंतर तिला कुलूप लावून त्यावर आपली मोहोर अशा त-हेने लावील की, जेणेकरुन मोहोर तोडल्याखेरीज ती पेटी उघडता येणार नाही. उमेदवार किंवा त्याचा प्रतिनिधी यांची स्वतःची मोहोर लावण्याची इच्छा असल्यास, त्यांना तशी परवानगी देण्यात येईल.

२१. मतपत्रिकेचा नमुना :-

(१) प्रत्येक मतपत्रिकेला प्रतिपत्र जोडलेले असेल आणि उक्त मतपत्रिका व ते प्रतिपत्र, जोडपत्र २ मधील नमुना १० प्रमाणे असेल.

(२) एकाच नावाचे दोन किंवा अधिक उमेदवार असल्यास त्यांच्या नावाबरोबरच त्यांचा व्यवसाय किंवा त्यांचे निवासस्थान लिहून किंवा इतर अन्य पध्दतीने त्यांच्यातील भेद दाखविण्यात येईल.

(३) मतपत्रिकेवरील तपशील मराठीमध्ये (देवनागरी लिपीमध्ये) असेल.

(४) मतपत्रिका अनुक्रमांकित असतील. मतपत्रिकेच्या स्थळप्रतीवर आणि मतपत्रिकेच्या दर्शनी भागावर हे अनुक्रमांक छापलेले असतील किंवा लिहिलेले असतील.

(५) परिच्छेद-१८ अन्वये उमेदवारांना नेमून देण्यात आलेले चिन्ह मतपत्रिकेवरील उमेदवाराच्या नावासमोर दर्शविण्यात येईल.

(६) प्रत्येक उमेदवारास मतपत्रिकेवर नेमून दिलेली जागा ही सारख्याच आकाराची असेल.

(७) मतपत्रिकेवरील वेगवेगळया उमेदवारांच्या जागा वेगळया दर्शविण्यासाठी असणारी ठळक रेषा सर्वत्र समान असेल.

२२. मतदारांना मतपत्रिका देण्याची कार्यपध्दती :-

(१) मतदान सुरु करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेपूर्वी कोणत्याही मतदारास मतपत्रिका देण्यात येणार नाही.

(२) मतदान संपण्याच्या वेळी मतदान केंद्रावर उपस्थित असणाऱ्या मतदारांखेरीज इतर कोणत्याही मतदारांना मतदान बंद करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेनंतर मतपत्रिका देण्यात येणार नाही. मात्र, मतपत्रिका दिलेल्या मतदारांना मतदान संपल्यानंतरही मतदान करता येईल.

(३) व्यवस्थापन समितीच्या संचालकाच्या निवडणुकीकरिता प्रत्येक मतदारास स्वतंत्र मतपत्रिका देण्यात येईल. मतदारास मतपत्रिका देण्यापूर्वी प्रत्येक मतपत्रिकेवर आणि त्याला जोडलेल्या स्थळप्रतीवर मागच्या बाजूस निवडणूक अधिकारी देईल अशा विभेदक चिन्हाचा शिक्का मारण्यात येईल आणि प्रत्येक मतपत्रिकेवर, ती देण्यापूर्वी निवडणूक अधिकारी तिच्या मागील बाजूस स्वाक्षरी करील.

(४) मतदारास मतपत्रिका देतेवेळी निवडणूक अधिकारी :-

(क) मतदार यादीच्या चिन्हांकित प्रतीमध्ये नोंद केल्याप्रमाणे असलेला मतदाराचा मतदार यादीतील अनुक्रमांक तिच्या स्थळप्रतीवर नोंदवील.

(ख) उक्त स्थळप्रतीवर त्या मतदाराची स्वाक्षरी किंवा अंगठयाचा ठसा घेईल; आणि

(ग) मतदारास मतपत्रिका देण्यात आली आहे हे दर्शविण्यासाठी मतदारेयादीच्या चिन्हांकित प्रतीमध्ये त्याला देण्यात आलेल्या मतपत्रिकेचा अनुक्रमांक न नोंदविता फक्त नावासमोर खूण करील.

परंतु, मतदाराने त्या मतपत्रिकेच्या स्थळप्रतीवर त्याची स्वाक्षरी केल्याशिवाय किंवा अंगठयाचा ठसा उमटवल्याशिवाय त्याला मतपत्रिका देण्यात येणार नाही.

(५)(क) मतदारास मतपत्रिका देण्यापूर्वी, निवडणूक अधिकारी मतदाराच्या डाव्या तर्जनीवर पक्क्या शाईची खूण करण्याची व्यवस्था करील.

परंतु, जेव्हा मतदाराच्या डाव्या तर्जनीवर आधीच अशी खूण असल्याचे दिसून येईल तेव्हा त्याने निवडणूकीत आधीच त्याचे मत दिलेले आहे असे मानण्यात येईल आणि त्याला कोणतीही मतपत्रिका देण्यात येणार नाही.

परंतु आणखी असे की, कोणत्याही मतदाराने त्याच्या डाव्या हाताच्या तर्जनीवर पक्क्या शाईने खूण करण्यास अनुमती दिल्याखेरीज, त्या मतदारास मतपत्रिका देण्यात येणार नाही.

(ख) या परिच्छेदातील मतदाराच्या डाव्या तर्जनीबाबतच्या कोणत्याही निर्देशाचा अर्थ जेव्हा एखाद्या मतदाराला त्याची डावी तर्जनी नसेल तेव्हा त्याच्या डाव्या हाताचे इतर कोणतेही बोट असा लावण्यात येईल आणि जेव्हा त्याच्या डाव्या हाताची सर्वच बोटे नसतील तेव्हा त्याच्या उजव्या हाताची तर्जनी किंवा उजव्या हाताचे इतर कोणतेही बोट असा लावण्यात येईल, आणि जेव्हा त्याच्या दोन्ही हातांची सर्वच बोटे नसतील तेव्हा त्याच्या डाव्या किंवा उजव्या हाताच्या उर्वरित भागाचे टोक असा लावण्यात येईल.

(६) स्थळप्रतीवरील मतदाराच्या अंगठयाचा ठसा कोणत्याही निवडणूक अधिकाऱ्याने किंवा सहायक निवडणूक अधिका-याने किंवा कोणत्याही अन्य अधिका-याने साक्षांकित करणे आवश्यक असणार नाही.

(७) मतदान केंद्रातील कोणतीही व्यक्ती एखाद्या विशिष्ट मतदारास दिलेल्या मतपत्रिकेचा अनुक्रमांक लिहून घेणार नाही.

२३. मतदान :-(Voting)

(१) यात नमूद केले असेल त्या व्यतिरिक्त निवडणुकीत मतदान करणारे सर्व मतदार त्यांच्यासाठी नेमून दिलेल्या मतदान केंद्रामध्ये स्वतः मतदान करतील आणि त्या प्रयोजनार्थ, यात घालून दिलेल्या मतदान प्रक्रियेचे पालन करतील.

(२) मतदाराला मतपत्रिका मिळाल्यानंतर तो ताबडतोब-

(क) कोणत्याही एका मतदान कक्षात जाईल,

(ख) त्याला ज्या उमेदवारास मत द्यावयाचे असेल त्या उमेदवाराच्या मतपत्रिकेतील चिन्हावर किंवा उमेदवाराच्या नावावर किंवा त्या उमेदवाराच्या स्तंभात, या प्रयोजनासाठी त्याला देण्यात आलेल्या साधनाच्या सहाय्याने मतपत्रिकेवर खूण उमटवील;

(ग) त्याचे मत गुप्त ठेवण्यासाठी मतपत्रिकेची घडी करील,

(घ) मागणी केल्यास, मतपत्रिकेच्या मागच्या बाजूवर उमटवण्यात आलेले विभेदक चिन्ह मतदान केंद्राध्यक्षास दाखवील;

(ङ) घडी केलेली मतपत्रिका मतपेटीत टाकील; आणि

(च) मतदान केंद्रातून बाहेर पडेल.

(३) प्रत्येक मतदार गैरवाजवी विलंब न करता मतदान करील.

(४) एक मतदार मतदान कक्षात असताना इतर कोणत्याही मतदारास मतदान कक्षात प्रवेश करु दिला जाणार नाही.

(५) ज्या मतदाराला मतपत्रिका देण्यात आली आहे त्या मतदाराने, निवडणूक अधिकाऱ्याने इशारा दिल्यानतर देखील उपपरिच्छेद (२) मध्ये घालून दिलेलया कार्यपध्दतीचे अनुपालन करण्यास नकार दिला तर, निवडणूक अधिकारी किंवा निवडणूक अधिकाऱ्याच्या निदेशानुसार सहायक निवडणूक अधिकारी त्या मतदाराला दिलेली मतपत्रिका त्याच्याकडून काढून घेईल. मग त्या मतदाराने त्यावर त्याच्या मताची नोंद केलेली असो किंवा नसो-

(६) मतपत्रिका परत घेतल्यानंतर, निवडणूक अधिकारी, त्या मतपत्रिकेच्या मागच्या बाजूस "रद्द मतदान प्रक्रियेचा भंग" असे लिहिल व त्या मजकुराखाली त्याची स्वाक्षरी करील.

(७) "रद्द मतदान प्रक्रियेचा भंग" असा मजकूर लिहिलेल्या सर्व मतपत्रिका एका स्वतंत्र

लिफाप्यात ठेवण्यात येतील आणि त्या लिफाप्यावर "मतपत्रिका मतदान प्रक्रियेचा भंग" असा मजकूर लिहिण्यात येईल.

(८) अशा मतदाराने मतपत्रिकेवर मत नोंदवलेले असल्यास, ते मत, मतमोजणीमध्ये विचारात घेतले जाणार नाही. तथापि, यामुळे तो मतदार ज्या इतर कोणत्याही शास्तीस पात्र असेल तिला बाधा येणार नाही.

२४. मतदारास सहाय्य :- विफलता किंवा अंधत्व किंवा निरक्षरता या कारणामुळे जर एखादा मतदार परिच्छेद २३ मध्ये विहित केलेल्या रीतीने मत देण्यास असमर्थ असेल तर, निवडणूक अधिकारी, त्या मतदारास आवश्यक असेल त्याप्रमाणे सहाय्य देईल.

२५. मतदाराची ओळख :- मतदारास, मतमत्रिका देण्यापूर्वी, केव्हाही, निवडणूक अधिकारी, मतदाराची ओळख किंवा त्या मतदान केंद्रात मत देण्याच्या त्याचा अधिकार शंकास्पद आहे असे त्यास सकारण वाटत असेल तर, स्वेच्छेने, ज्या मतदाराच्या संबंधात अशी नोंद केली आहे तो मतदार व मतदानासाठी आलेली व्यक्ती एकच आहेत याची खातरजमा करण्यासाठी, त्याला आवश्यक वाटतील असे त्या व्यक्तीला प्रश्न विचारुन, स्वतःचे समाधान करुन घेऊ शकेल आणि उमेदवाराने किंवा मतदार प्रतिनिधीने तशी मागणी केली तर, तो तसे करील.

२६. मतदान समाप्त करणे :- निवडणूक अधिकारी, परिच्छेद १३ अन्वये मतदान समाप्त करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेस मतदान केंद्र बंद करील आणि त्यानंतर कोणत्याही मतदारास मतदान केंद्रामध्ये प्रवेश देणार नाही.

परंतु, मतदान समाप्त होण्यापूर्वी मतदान केंद्रात उपस्थित असणाऱ्या सर्व मतदारांना त्यांची मते देण्यास मुभा देण्यात येईल.

२७. मतपेटया मोहारबंद करणे :-

(१) मतदान समाप्त झाल्यानंतर, जमेल तितक्या लवकर निवडणूक अधिकारी, मतपेटीची फट बंद करील, आणि फट बंद करण्यासाठी कोणत्याही यांत्रिक साधनाचा त्या पेटीत समावेश नसल्यास, तो ती फट मोहारबंद करील आणि

उपस्थित असलेल्या एखाद्या मतदान प्रतिनिधीस ती मोहोर स्वाक्षरित करण्याची मुभाही देईल.

(२) त्यानंतर मतपेटी मोहोरबंद करण्यात येईल आणि सुरक्षित ठेवण्यात येईल.

(३) जर पहिली मतपेटी पूर्ण भरल्यामुळे दुसऱ्या मतपेटीचा वापर करणे आवश्यक झाले तर, दुसरी मतपेटी वापरण्यासाठी घेण्यापूर्वी, पहिली मतपेटी उपपरिच्छेद(१) आणि (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे बंद करण्यात येईल, मोहोरबंद करण्यात येईल आणि सुरक्षित ठेवण्यात येईल.

२८. मतमोजणी :-

(१) प्रत्येक मतपेटीतून काढण्यात आलेल्या मतपत्रिकांचे गठ्ठे तयार करण्यात येतील. मतदान समाप्त झाल्यानंतर लगेचच मतमोजणीस प्रारंभ होईल. निवडणूक अधिकाऱ्याच्या पर्यवेक्षाणाखाली मतमोजणी करण्यात येईल. प्रत्येक उमेदवारास आणि त्याच्या प्राधिकृत प्रतिनिधीस मतमोजणीच्या वेळी उपस्थित असण्याचा हक्क असेल.

(२) (एक) निवडणूक अधिकारी किंवा सहाय्यक निवडणूक अधिकारी,

(क) जर मतपत्रिकेवर, ज्या मतदाराने मत दिले आहे त्याची ओळख पटू शकेल अशी एखादी खूण असेल किंवा काही लिहिलेले असेल तर; किंवा

(ख) मतपत्रिकेवर विभेदक चिन्ह नसेल तर; किंवा

(ग) जर मतपत्रिकेवर केलेली खूण, नक्की कोणत्या उमेदवारास मत दिले आहे याबाबत शंका निर्माण होईल अशा रीतीने केली असेल तर, ती मतपत्रिका फेटाळील.

(दोन) निवडणूक अधिकारी हा मतपत्रिका फेटाळण्यासाठीचा सक्षम प्राधिकारी असेल.

(३) मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर, निवडणूक अधिकारी पुढील तपशील नमूद करणारे एक विवरण तयार करील व ते प्रमाणित करील :-

(क) दिलेल्या मतपत्रिकांची एकूण संख्या;

(ख) प्रत्येक उमेदवारास मिळालेल्या वैध मतांची संख्या; आणि

(ग) अवैध ठरवण्यात आलेल्या किंवा फेटाळण्यात आलेल्या मतपत्रिकांची संख्या.

२९. निकाल घोषित करणे :- परिच्छेद २८ च्या उपपरिच्छेद (३) अन्वये तयार करण्यात आलेल्या विवरणाच्या आधारे, ज्या उमेदवारांना सर्वात जास्त वैध मते मिळाली असतील ते, उमेदवार निवडून आल्याचे घोषित करण्यात येईल व त्यांची नांवे, निवडणूक अधिकाऱ्याच्या सहीने मतदान केंद्राच्या सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात येतील; आणि जर दोन किंवा अधिक उमेदवारांना समसमान मते पडली असतील तर त्या बाबतीत यशस्वी उमेदवाराचे किंवा उमेदवारांची नांवे निश्चित करण्यासाठी निवडणूक अधिकारी ठरवील अशा रीतीने चिठ्ठया टाकण्यात येतील. निवडणूक अधिकाऱ्याने घोषित केलेला निवडणुकीचा निकाल हा, निकाल जाहीर केल्यानंतर लगेचच निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना देण्यात येईल.

३०. निवडणूकविषयक कागदपत्रे ताब्यात ठेवणे व ती नष्ट करणे :-

मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर आणि निकाल घोषित करण्यात आल्यानंतर, निवडणूक अधिकारी मतपत्रिका ताब्यात घेईल. मतपत्रिका आणि निवडणुकीच्या संबंधातील इतर अभिलेख एका पेटीत सुरक्षित ठेवण्यात येईल आणि त्या पेटीवर निवडणूक अधिकाऱ्याची मोहोर लावण्यात येईल आणि ज्या उमेदवारांना त्यांची मोहोर त्या पेटीवर लावण्याची इच्छा असेल त्यांचीही मोहोर त्या पेटीवर लावण्यात येईल. पेटीमधील अशा प्रकारे मोहोरबंद केलेल्या व सुरक्षित ठेवलेल्या सर्व मतपत्रिका आणि इतर निवडणूकविषयक सामग्री, निवडणूक अधिकारी, सुरक्षितपणे आपल्या ताब्यात ठेवील आणि मतदानाच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या कालावधीकरिता स्वतःकडे ठेवील; आणि त्यानंतर, त्या निवडणुकीविषयी किंवा तिच्यासंबंधात कोणताही विवाद न उद्‌भवल्यास, उक्त तीन महिन्यांच्या कालावधीनंतर ती कागदपत्रे नष्ट करण्यात येतील.

भाग-चार

वितरिकास्तरीय पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची निवडणूक

३१. निवडणुकीची कार्यपध्दती :-

(१) वितरिकास्तरीय पाणी वापर संस्थेच्या लाभक्षेत्रामधील लघु वितरिकास्तरावरील सर्व पाणी वापर संस्था आपल्या व्यवस्थापन समितीच्या सदस्यांमार्फत वितरिकास्तरीय पाणी वापर संस्थेच्या सर्वसाधारण सभेचे सदस्य असतील आणि या सर्वसाधारण सभेच्या सदस्यांना, मतदान करुन, वितरिकास्तरीय पाणी वापर संस्थेची व्यवस्थापन समिती निवडून देण्याचा अधिकार असेल. वितरिकास्तरीय पाणी वापर संस्थेच्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये वितरिकास्तरीय पाणी वापर संस्थेचे सर्व सदस्य, आपल्यामधून व्यवस्थापन समितीच्या संचालकांची निवड करतील.

(२) निवडणूक अधिकारी निश्चित करील अशा दिनांकास, वेळी व ठिकाणी वितरिकास्तरीय पाणी वापर संस्थेच्या सर्व सदस्यांची सर्वसाधारण सभा घेण्यात येईल आणि निवडणूक अधिकारी त्या सभेचा अध्यक्ष असेल. या सभेत अध्यक्ष प्रथम मतदानाची कार्यपध्दती (जसे हात वर करुन मतदान /आवाजी मतदान/गुप्त मतदान) ठरवील.

(३) निवडणूक अधिकारी, निवडणुकीच्या प्रयोजनासाठी कार्य क्षेत्रनिहाय मतदार यादी तयार करील आणि ती, निवडणुकीच्या नोटिशीबरोबर, उपपरिच्छेद (१) अन्वये निवडणुकीकरता निश्चित केलेल्या जागी, सूचना फलकावर प्रदर्शित करील. संबंधित कालवा अधिकाऱ्याच्या कार्यालयात देखील ही नोटीस प्रदर्शित करण्यात येईल.

(४) निवडणूक एकाच दिवशी घेण्यात येईल व त्या दिवशीच समाप्त होईल. निवडणुकीचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे असेल :-

(एक) नामनिर्देशने स्वीकारणे	सकाळी १०.०० ते ११.००
(दोन) नामनिर्देशनांची छाननी व नामनिर्देशनांची अंतिम सूची प्रसिध्द करणे	सकाळी ११.०० ते दुपारी १२.००

(तीन) नामनिर्देशने मागे घेणे	दुपारी १२.३० ते १.३०
(चार) निवडणूक लढवणा-या उमेदवारांची अंतिम यादी प्रसिध्द करणे	दुपारी २.००
(पाच) एकापेक्षा अधिक उमेदवार निवडणुकीस उभे राहिल्यास, घेण्यात येणारी निवडणूक	दुपारी ३.०० ते ५.००
(सहा) मतमोजणी व निकाल घोषित करणे	मतदानानंतर लगेचच.

(५) व्यवस्थापन समितीच्या संचालक पदांसाठी प्रवर्गनिहाय निवडणूक लढवित असलेल्या उमेदवारांची संख्या निवडून द्यावयाच्या सदस्यांपेक्षा अधिक असल्यास मतदान घेण्यात येईल. वैधरीत्या नामनिर्देशित करण्यात आलेल्या प्रवर्गनिहाय उमेदवारांची संख्या निवडून द्यावयाच्या सदस्यांच्या संख्येइतकीच किंवा त्यापेक्षा कमी असल्यास, निवडणूक अधिकारी ताबडतोब असा उमेदवार यथोचितरीत्या निवडून आल्याचे जाहीर करील.

(६) भाग तीन च्या परिच्छेद १३ ते ३० च्या तरतुदी योग्य त्या फेरफारांसह, वितरिकास्तरीय पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या संचालकांच्या निवडणुकीला लागू होतील.

(७) एकापेक्षा अधिक उमेदवार निवडणूक लढवित असल्यास, अशी निवडणूक उप परिच्छेद (२) मध्ये निश्चित करण्यात आलेल्या पध्दतीने घेण्यात येईल.

(८) मतदानाच्या अखेरीस, निवडणूक अधिकारी, व्यवस्थापन समितीच्या संचालक पदासाठी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना मिळालेल्या मतांची मतमोजणी सुरु करण्याची तात्काळ व्यवस्था करील आणि त्यांना मिळालेल्या मतांच्या आधारे, उमेदवार निवडून आल्याचे जाहीर करील.

(९) दोन किंवा त्यापेक्षा अधिक उमेदवारांना समसमान मते मिळाल्यास, निवडणूक

अधिकारी, सदस्यांच्या उपस्थितीत चिठ्ठया टाकील आणि ज्या उमेदवारांची चिठ्ठी प्रथम काढण्यात येईल तो, त्यानुसार येथोचितरीत्या निवडून आल्याचे जाहीर करण्यात येईल.

(१०) निवडणुकीचे निकाल जाहीर केल्यानंतर लगेचच, निवडणूक अधिकारी, सभेचे कार्यवृत्त तयार करील आणि त्यावर सही करुन ते समुचित प्राधिकाऱ्याकडे पाठवील. तो, वितरिकास्तरीय पाणी वापर संस्थेच्या कार्यालयाच्या सूचना फलकावर वितरिकास्तरीय पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीचे संचालक म्हणून निवडून आलेल्या व्यक्तींची नावे नमूद असणारा निवडणुकीचा निकाल देखील प्रसिध्द करील आणि अशा निकालाची एक प्रत समुचित प्राधिकाऱ्यास आणि वितरिकास्तरीय पाणी वापर संस्थेचा सदस्य म्हणून निवडून आल्याचे जाहीर करण्यात आलेल्या उमेदवारांस देखील अशी प्रत देण्यात येईल.

(११) या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असेल तरीही, निवडणूक अधिका-यास, या नियमाखाली बोलावण्यात आलेल्या विशेष सभेची तारीख पुढे ढकलण्यासाठीची पुरेशी कारणे लेखी नमूद करुन ती तारींख ढकलता येईल आणि निवडणूक अधिकारी निश्चित करील अशा दिवशी व अशा वेळी पुढील सभा घेण्यात येईल. तथापि, अशी निवडणूक, एक वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी पुढे ढकलता येणार नाही.

भाग-पाच

कालवास्तरीय पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची निवडणूक

३२. निवडणुकीची कार्यपध्दती :-

(१) कालवास्तरीय पाणी वापर संस्थेच्या कार्यक्षेत्रातील वितरिका स्तरीय पाणी वापर संस्थांच्या व्यवस्थापन समित्यांच्या संचालकांनी प्रतिनिधित्व केलेल्या सर्व वितरिका स्तरीय पाणी वापर संस्था, कालवा स्तरीय पाणी वापर संस्थेचे सर्व सदस्य मंडळ घटित करील आणि त्यांना मत देण्याचा व कालवास्तरीय पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीची निवड करण्याचा हक्क असेल. कालवा स्तरीय पाणी वापर

संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या संचालकांची निवड, कालवास्तरीय पाणी वापर संस्थेचे सदस्य, विशेष सर्वसाधारण सभेत आपल्यामधील सदस्याला निवडून देऊन करतील.

(२) कालवा स्तरीय संस्थेच्या सदस्यंची सभा, निवडणूक अधिकारी निश्चित करील अशा दिनांकास, वेळेस व ठिकाणी घेण्यात येईल आणि तिचे अध्यक्षस्थान निवडणूक अधिकारी भूषवील. या सभेमध्ये पीठासीन अधिकरी मत देण्याची पध्दती (हात उंचावून/आवाजी मतदान/गुप्त मतदान) निश्चित करील.

(३) निवडणूक अधिकारी, निवडणुकीच्या प्रयोजनार्थ, विभागनिहाय मतदारांची यादी प्रसिध्द करील आणि ती निवडणुकीच्या सूचनेसह भाग-दोन, परिच्छेद (३), उप परिच्छेद (१) अन्वये निवडणुकीसाठी निश्चित केलेल्या ठिकाणाच्या सूचना फलकावर लावील. ही सूचना संबंधीत कार्यकारी अभियंत्यांच्या कार्यालयात देखील लावण्यात येईल.

(४) निवडणूक प्रक्रिया एकाच दिवशी सुरु होईल व त्याच दिवशी ती संपेल. त्यासाठीचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे असेल :-

(एक) नामनिर्देशने स्वीकारणे	सकाळी १०.०० ते ११.००
(दोन) नामनिर्देशनांची छाननी व नामनिर्देशनांची अंतिम सूची प्रसिध्द करणे	सकाळी ११.०० ते दुपारी १२.००
(तीन) नामनिर्देशने मागे घेणे	दुपारी १२.३० ते १.३०
(चार) निवडणूक लढवणा-या उमेदवारांची अंतिम यादी प्रसिध्द करणे	दुपारी २.००
(पाच) एकापेक्षा अधिक उमेदवार निवडणुकीस उभे राहिल्यास, घेण्यात	दुपारी ३.०० ते ५.००

येणारी निवडणूक	
(सहा) मतमोजणी व निकाल घोषित करणे	मतदानानंतर लगेचच.

(५) व्यवस्थापन समितीच्या संचालक पदांसाठी प्रवर्गनिहाय निवडणूक लढवित असलेल्या उमेदवारांची संख्या निवडून द्यावयाच्या सदस्यांपेक्षा अधिक असल्यास मतदान घेण्यात येईल. वैधरीत्या नामनिर्देशित केलेल्या प्रवर्गनिहाय उमेदवारांची संख्या निवडून द्यावयाच्या सदस्यांच्या संख्येइतकीच किंवा त्यापेक्षा कमी असल्यास, निवडणूक अधिकारी ताबडतोब असा उमेदवार यथोचितरीत्या निवडून आल्याचे जाहीर करील.

(६) भाग तीनच्या परिच्छेद १३ ते ३० च्या तरतुदी, योग्य त्या फेरफारांसह, वितरिकास्तरीय पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या सदस्यांच्या निवडणुकीला लागू होतील.

(७) एकापेक्षा अधिक उमेदवार निवडणूक लढवित असल्यास, अशी घेण्यात येणारी निवडणूक ही, उप परिच्छेद (२) मध्ये निश्चित करण्यात आलेल्या पध्दतीने घेण्यात येईल.

(८) मतदानाच्या अखेरीस, निवडणूक अधिकारी, व्यवस्थापन समितीच्या सदस्य पदासाठी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना मिळालेल्या मतांची मतमोजणी तात्काळ सुरु करील आणि मिळालेल्या मतांच्या आधारे, उमेदवार निवडून आल्याचे जाहीर करील.

(९) दोन किंवा त्यापेक्षा अधिक उमेदवारांना समसमान मते मिळाल्यास, निवडणूक अधिकारी, सदस्यांच्या उपस्थितीत चिठ्ठया टाकील आणि ज्या उमेदवारांची चिठ्ठी प्रथम काढण्यात येईल त्यानुसार तो येथोचितरीत्या निवडून आल्याचे जाहीर करील.

(१०) निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर लगेचच, निवडणूक अधिकारी, सभेच्या

कामकाजाचे कार्यवृत्त तयार करील आणि त्यावर स्वाक्षरी करील व तो सक्षम प्राधिका-याकडे पाठवील. तो, याबरोबरच कालवास्तरीय पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य म्हणून निवड झालेल्या व्यक्तीची नांवे नमूद करणारा निवडणुकीचा निकालही कालवा स्तरीय पाणी वापर संस्थेच्या कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्द करील आणि या निकालाची एक प्रत संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याला पाठवील; तसेच ती कालवा स्तरीय पाणी वापर संस्थेचा सदस्य म्हणून निवडून आलेल्या उमेदवारांना देखील पाठवील.

(११) या नियमांत काहीही अंतर्भूत असले तरी, निवडणूक अधिका-यास, पुरेशी कारणे लेखी नमूद करुन या नियमाखाली बोलावण्यात येणाऱ्या विशेष सभेचा दिनांक पुढे ढकलता येईल आणि पुढील सभा निवडणूक अधिकारी निश्चित करील अशा दिवशी व वेळी घेण्यात येईल. तथापि, निवडणूका पुढे ढकलण्याचा हा कालावधी एका वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

भाग-सहा

प्रक्लपस्तरीय पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची निवडणूक

३३. निवडणुकीची कार्यपध्दती :-

(१) प्रकल्पामधील सर्व कालवास्तरीय पाणी वापर संस्था आणि जलाशयावरील उपसा सिंचन पाणी वापर संस्था या प्रकल्पस्तरीय पाणी वापर संस्थेच्या सर्वसाधारण सभेच्या सदस्य असतील आणि त्यांच्या व्यवस्थापन समित्यांचे संचालक त्या संस्थांचे या सभेवर प्रतिनिधित्व करतील. त्यांना मतदान करण्याचा आणि प्रकल्पस्तरीय पाणी वापर संस्थेची व्यवस्थापन समिती निवडून देण्याचा अधिकार असेल. प्रकल्पस्तरीय पाणी वापर संस्थेच्या एका विशेष सर्वसाधारण सभेत, प्रकल्पस्तरीय संस्थेच्या सर्वसाधारण सभेचे सदस्य आपल्या मधूनच व्यवस्थापन समितीच्या संचालकांची निवड करतील.

(२) निवडणूक अधिकारी निश्चित करील अशा दिनांकास, वेळी व जागी, प्रकल्पस्तरीय पाणी वापर संस्थेच्या सदस्यांची सभा घेण्यात येईल व निवडणूक अधिकारी त्या सभेचा अध्यक्ष असेल. या सभेत प्रारंभी अध्यक्ष, मतदानाची कार्यपध्दती (हात वर करुन मतदान/आवाजी मतदान/गुप्त मतदान) ठरवील.

(३) निवडणूक अधिकारी, निवडणुकीच्या प्रयोजनार्थ कार्यक्षेत्रनिहाय मतदारसूची तयार करील आणि भाग-दोन च्या परिच्छेद (३), च्या उप परिच्छेद (१) अन्वये निवडणुकीकरिता निश्चित केलेल्या जागी सूचनाफलकावर निवडणुकीच्या नोटिशीबरोबरच ती प्रदर्शीत करील. नोटीस, संबंधित समुचित प्राधिकाऱ्याच्या कार्यालयातही लावण्यात येईल.

(४) निवडणूक एकाच दिवसात घेण्यात येईल व त्याच दिवशी समाप्त होईल तिचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे असेल :-

(एक) नामनिर्देशनपत्रे स्वीकारणे	सकाळी १०.०० ते ११.००
(दोन) नामनिर्देशनपत्राची छाननी व नामनिर्देशित व्यक्तींची अंतिम सूची यादी प्रसिध्द करणे.	सकाळी ११.०० ते दुपारी १२.००
(तीन) नामनिर्देशने मागे घेणे	दुपारी १२.३० ते १.३०
(चार) निवडणूक लढविणा-या उमेदवारांची अंतिम यादी प्रसिध्द करणे	दुपारी २.००
(पाच) लढत असल्यास प्रत्यक्ष निवडणुका घेणे.	दुपारी ३.०० ते ५.००
(सहा) मतमोजणी व निकाल जाहीर करणे	मतदानानंतर लगेचच.

(५) जर व्यवस्थापन समितीच्या सदस्यत्वासाठी निवडणूक लढविणाऱ्या उमदवारांची

प्रवर्गनिहाय संख्या ही, समितीच्या भरावयाच्या रिक्त जागांपेक्षा अधिक असेल तर मतदान घेण्यात येईल. जर मतदान घेणे आवश्यक नसेल तर, निवडणूक अधिकारी, तात्काळ अशा उमदवारास, यथोचितरीत्या निवडून आलेला उमेदवार म्हणून घोषित करील.

(६) भाग तीनच्या परिच्छेद १३ ते ३० च्या तरतुदी, योग्य त्या फेरफारांसह, प्रकल्पस्तरीय पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या सदस्यांच्या निवडणुकीस लागू होतील.

(७) उमेदवारांमध्ये लढत होणार असेल तर उप परिच्छेद (२) मध्ये ठरविण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार निवडणुका घेण्यात येईल.

(८) मतदानाच्या शेवटी, निवडणूक अधिकारी, व्यवस्थापन समितीच्या सदस्यत्वाकरिता निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या मतांची मोजणी करण्याची तात्काळ व्यवस्था करील आणि त्यांना मिळालेल्या मतांच्या आधारे, निवडून आलेला उमेदवार घोषित करील.

(९) दोन किंवा अधिक उमेदवारांना समान मते पडल्यास, निवडणूक अधिकारी, सदस्यांच्या उपस्थितीत चिठ्ठया टाकील आणि ज्यांची नांवे पहिली काढण्यात येतील ती इतरांच्यावर ठेवण्यात येतील आणि तदनुसार त्यांना येथोचितरीत्या निवडून आल्याचे घोषित करण्यात येईल.

(१०) निवडणुकीचा निकाल जाहीर केल्यानंतर लगेचच, निवडणूक अधिकारी, सभेचे कार्यवृत्त तयार करील आणि त्यावर स्वाक्षरी करील आणि ते सक्षम प्राधिका-याकडे पाठवील. तो, प्रकल्पस्तरीय पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य म्हणून निवडून आलेल्या व्यक्तींची नांवे दर्शविणारा निवडणुकीचा निकाल जेथे निवडणूक झाली होती, त्या कार्यालयाच्या सूचनाफलकावर प्रसिध्द करील आणि अशा निकालाची एक प्रत, संबंधित सक्षम प्राधिका-यास पाठवील. तसेच ती प्रकल्पस्तरीय पाणी वापर संस्थेचा सदस्य म्हणून निवडून आल्याचे घोषित केलेल्या उमेदवारासही देण्यात येईल.

(११) या नियमांत काहीही अंतर्भूत असले तरी, निवडणूक अधिका-यास, पुरेशी कारणे लेखी नमूद करुन, या नियमान्वये घेण्यात येणाऱ्या विशेष सभेचा दिनांक पुढे

ढकलता येईल आणि या प्रयोजनार्थ होणरी पुढील सभा निवडणूक अधिकारी निश्चित करील त्या दिवशी व वेळी घेण्यात येईल. तथापि, निवडणुका पुढे ढकलण्याचा हा कालावधी एका वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

भाग-७

व्यवस्थापन समितीच्या संचालकांना परत बोलावून घेण्याचे नियम

३४. परत बोलावून घेणे :-

(१) कोणत्याही पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या संचालक पदावरील व्यक्तीला त्या पदावरुन परत बोलावून घेण्याबाबतची नोटीस ही संबंधित कालवा अधिका-याला उद्देशून असेल.

(२) ही नोटीस जोडपत्र-२ च्या नमुना अकरा मध्ये देणे आवश्यक असेल आणि त्या नोटिशीच्या जादा प्रती त्या नोटिशीसोबत पाठवण्यात येतील आणि कालवा अधिकारी त्या नोटिशीची एक प्रत संबंधित पाणी वापर संस्थेला पाठवील; तसेच प्रत्येक उप कालवा वितरिका स्तरीय पाणी वापर संस्था, प्रकल्पस्तरीय पाणी वापर संस्था, कालवास्तरीय पाणी वापर संस्था आणि उपसा सिंचन पाणी वापर संस्था आणि जलसंपदा विभाग यांना प्रत्येकी एक प्रत पाठवील; जेव्हा सदस्यांना एकापेक्षा अधिक व्यवस्थापन संचालकाविरुध्द प्रस्ताव पाठवायचा असेल तेव्हा ते परत बोलावून घेण्याचे प्रस्तावित केलेल्या प्रत्येक संचालकाकरिता स्वतंत्र नोटीस देतील.

(३) कालवा अधिकारी- जो पाणी वापर संस्थेचा निवडणूक अधिकारी देखील आहे- परिच्छेद १ खालील नोटीस मिळाल्याबरोबर ताबडतोब, ती नोटीस, संबंधित पाणी वापर संस्थेच्या एकूण सदस्यसंख्येच्या निम्म्यापेक्षा कमी नसतील इतक्या व ज्यांना पाणी वापर संस्थेच्या कोणत्याही बैठकीत मतदान करण्याचा हक्क आहे अशा, सदस्यांनी दिली आहे याबद्दल स्वतःची खात्री करुन घेईल आणि त्यानंतर या प्रयोजनार्थ, अशी नोटीस मिळाल्यापासून सात दिवसांच्या आत, एक विशेष बैठक बोलावील आणि निवडणूक अधिकारी हा

त्या बैठकीचा अध्यक्ष असेल,

परंतु, कोणत्याही पदाधिका-याविरुध्द त्याला पदावरुन परत बोलावण्याचा असा प्रस्ताव, अशा पदाधिकाऱ्याने पदग्रहण केल्यापासून, दोन वर्षाच्या आत मांडता येणार नाही.

परंतु आणखी असे की, पाणीपट्टी भरण्याच्या संदर्भात कसूरदार असलेल्या सदस्यांना, या परत बोलावण्याच्या प्रस्तावावर सही करता येणार नाही.

(४) जर निर्देशित अविश्वास प्रस्ताव उपस्थित असलेल्या आणि मतदान करणाऱ्या सदस्यांपैकी दोन तृतीयांश सदस्यांच्या पाठिंब्याने संमत करण्यात आला असेल तर तो संमत झाला असे मानण्यात येईल.

(५) संबंधित पाणी वापर संस्थेच्या सर्व सदस्यांना, राखीव प्रवर्गातील संचालकांना पदावरुन परत बोलावण्यासाठी मतदान करता येईल. तथापि विशिष्ट क्षेत्रातील सदस्यांना केवळ त्या संबंधित क्षेत्रातील संचालकांनाच परत बोलावण्याची मुभा असेल.

(६) निवडणूक अधिकारी, अशा बैठकीचे कामकाज अभिलिखित करील.

(७) संबंधित निवडणूक अधिकारी, बैठकीचे कार्यवृत्त मिळाल्यानंतर, ज्या व्यक्तीविरुध्द असा प्रस्ताव मांडण्यात आला आहे तिला पदावरुन काढून टाकण्याचा आदेश देईल आणि अशाप्रकारे रिक्त झालेले पद भरणसाठी यथोचित कार्यवाही सुरु करील.

(८) व्यवस्थापकीय संचालकास पदावरुन काढून टाकल्यानंतर, कालवा अधिकारी, ताबडतोब सर्व स्तरीय पाणी वापर संस्थांना आणि जलसंपदा विभागास, बैठकीला उपस्थित असलेल्या पाणी वापर संस्थांच्या सर्व सदस्यांची नांवे, प्रस्तावावर घेण्यात आलेला निर्णय

आणि प्रस्तावाच्या बाजूने किंवा प्रस्तावाच्या विरोधात असेलेली मतसंख्या कळवील.

नमुना-१

जोडपत्र-२

पाणी वापर संस्थेचा निवडणूक कार्यक्रम

(नियम ७ आणि जोडपत्र २, परिच्छेद १(२) पहा)

अ.क्र.	कार्यक्रम	दिनांक *
भाग-क		
१	मतदार यादी तयार करणे	१-१०
२	आक्षेप मागवण्याच्या नोटिशीसह मतदार यादी प्रसिध्द करणे	११
३	आक्षेप स्वीकारणे	१२-१४
४	प्रतिपादने निकालात काढणे ▪ नोटीसा काढणे (नियम ५(१)) ▪ नियम ५ आणि ६ अन्वये यादी प्रसिध्द करणे ▪ संक्षिप्त चौकशी करणे	२० २१-२३ ३०
५	प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे	३७
६	प्रारुप मतदार यादीवर अपील करण्याचा कालावधी	४४
७	अपील अधिकाऱ्याचा निर्णय	४५-४७

८	अंतिम मतदार यादी प्रसिध्द करणे	५०
भाग-ख		
९	निवडणुकीची नोटीस	१
१०	--------- दिनांकापर्यन्त नामनिर्देशनपत्रे स्वीकारणे	८
११	नामनिर्देशनपत्रांची छाननी आणि वैध नामनिर्देशनपत्रे प्रसिध्द करणे	९
१२	नामनिर्देशनपत्रे मागे घेणे	१३
१३	निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची चिन्हांसह यादी प्रसिध्द करणे	१४
१४	▪ निवडणूक अधिकाऱ्याने निवडणुकीची तयारी करणे (मतपत्रिका छापणे, इ.) ▪ निवडणुकीसाठी प्रचार करणे यांच्याकरीता असलेला कालावधी	१५-२३
१५	निवडणुका (मतदान) तसेच, शक्य झाल्यास मतमोजणी आणि निकाल.	२४
१६	मतदानाच्या दिवशीच मतमोजणी करणे शक्य नसेल तर ती दुसऱ्या दिवशी करण्यात येईल.	२४/२५

* प्रक्रिया चालू झाल्यापासूनचा/चे दिनांक

नमुना-२

जोडपत्र-२

मतदार यादीकरिता प्रपत्र

(जोडपत्र-२, परिच्छेद ३(१) आणि १०(७) पहा)

पाणी वापर संस्थेचे नांव :

अ. क्र.	पूर्ण नांव	लिंग पु./स्त्री	जन्म तारीख	--- रोजी वय	गाव	सर्वेक्षण क्रमांक/ गट क्रमांक	प्रवर्ग	सुरुवातीचा मधला/ शेवटचा प्रादेशिक भाग	शेरा

नमुना-तीन

जोडपत्र-दोन

मतदार यादीत नांव समाविष्ट करण्यासाठी हक्क मागणी अर्ज

(पहा जोडपत्र-२, परिच्छेद ४(१), ४(२) व १०(७))

प्रति,

निवडणूक अधिकारी,

---------- पाणी वापर संस्था.

महोदय,

मी विनंती करतो की, ---------- (पाणी वापर संस्थेचे नांव) च्या मतदार यादीत माझे नाव समाविष्ट करण्यात यावे.

१) नांव (संपूर्ण) ----------

२) वडिलांचे/आईचे/पतीचे नांव ----------

३) माझ्या निवासाच्या ठिकाणाचा तपशील ----------

(क) गल्ली : ----------

(ख) शहर/गांव ----------

(ग) टपाल कार्यालय ----------

(घ) तहसील ----------

नमुना-चार

जोडपत्र-दोन

नांव समाविष्ट करण्याविरोधात आक्षेप

(पहा जोडपत्र-२, परिच्छेद ४(१),४(३) व १०(७))

प्रति,

निवडणूक अधिकारी,

---------- पाणी वापर संस्था.

महोदय,

मी पुढील कारणासाठी (कारणांसाठी) ---------- ---------- ---------- या पाणी वापर संस्थेच्या मतदार यादीतील अनुक्रमांक ---------- वरील श्री./श्रीमती---------- यांचे नांव समाविष्ट करण्यास आक्षेप घेत आहे.

मी, याद्वारे, घोषित करतो की, माझ्या संपूर्ण माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे वर उल्लेखिलेली वस्तुस्थिती खरी आहे.

माझे नांव, पुढीलप्रमाणे या पाणी वापर संस्थेसाठी मतदार यादीत समाविष्ट करण्यात आले आहे.

नांव (संपूर्ण) ----------

वडिलांचे/आईचे/पतीचे नांव ----------

अनुक्रमांक ----------

आक्षेपकाची स्वाक्षरी/अंगठयाचा ठसा

दिनांक : (संपूर्ण डाक पत्ता)

नमुना-पाच

जोडपत्र-दोन

मतदार यादीतील नोंदीबाबतच्या आक्षेपासाठीचा अर्ज

(पहा जोडपत्र-२, परिच्छेद ४ व (४))

प्रति,

निवडणूक अधिकारी,

---------- पाणी वापर संस्था.

मी----------,---------- यांचा मुलगा/मुलगी/पत्नी ----------
-पाणी वापर संस्थेचा, मतदार असून, मतदार यादीतील पुढील नोंदीबाबत आक्षेप घेत आहे.

अ.क्र.	ज्या नोंदीबाबत आक्षेप घेतला आहे ती नोंद	समाविष्ट करावयाची दुरुस्त केलेली नोंद

ठिकाण :-

दिनांक (आक्षेपकाची स्वाक्षरी किंवा अंगठयाचा ठसा)

नमुना सहा

जोडपत्र-२

(नियम ७(८) पहा आणि जोडपत्र-२ (परिच्छेद १४(१) पहा)

अनुसूचित जाती	अनुसूचित जमाती	सर्वसाधारण

नामनिर्देशन पत्र

अनुक्रमांक ----------

प्रति,

निवडणूक अधिकारी,

(पाणी वापर संस्थेचे नांव) (पूर्व मुद्रित)

नामनिर्देशन पत्राच्या नमुन्याचा अनुक्रमांक (निवडणुकीच्या कालावधीत प्राप्त झाल्याप्रमाणे)

मी पुढील पदासाठी निवडणूक लढवू इच्छितो आणि माझी वैयक्तिक माहिती पुढीलप्रमाणे आहे :-

ज्या पदासाठी निवडणूक लढवावयाची, त्या पदाचे नांव : संचालक/अध्यक्ष पदस्थ व्यक्ती (कृपया (√) अशी खूण करावी.)

सिंचन पध्दती : ---------- (सिंचन पध्दतीचे नांव)

पाणी वापर संस्था : (पाणी वापर संस्थेचे नांव)

पाणी वापर संस्थेचा प्रादेशिक भाग (सुरुवातीचा/मधला/शेवटचा)

प्रवर्ग : अनुसूचित जाती अनुसूचित जमाती सर्वसाधारण

शहर/गांव ---------- तहसिल ---------- जिल्हा ----------

१. वैयक्तिक तपशील :

(क) संपूर्ण नांव : श्री/श्रीमती/कुमारी ----------

(ख) वडिलांचे/पतीचे नांव : श्री. ----------

(ग) मतदार यादीतील अनुक्रमांक (निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराचा)

(घ) प्रवर्गाचा आहे किंवा कसे (कृपया ✓ अशी खूण करावी)

(ङ) वय : ---------- वर्षे पुरुष स्त्री

(च) लिंग (कृपया ✓ अशी खूण करावी)

(छ) जमिनीची एकूण व्याप्ती (एक) मालकीची ---------- हेक्टर

(दोन) भाडेपट्टयाची ---------- हेक्टर

(ज) व्यवसाय : ----------

(झ) शैक्षणिक अर्हता ----------

(य) निवडणूक लढविणा-या उमेदवाराचा पत्ता :

घर क्रमांक ---------- रस्ता क्रमांक -------

शहर/गांव ---------- तहसिल ----------

जिल्हा ----------

२. सूचकाचा तपशील :

(क) संपूर्ण नांव : श्री/श्रीमती/कुमारी ----------

(ख) वडिलांचे/पतीचे नांव : श्री. ----------

(ग) मतदार यादीतील अनुक्रमांक ---------- (सूचक)

मी श्री/श्रीमती/कुमारी ---------- यांचे नांव ---------- पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या संचालकाच्या/अध्यक्ष पदाकरिता उमेदवार म्हणून याद्वारे सूचित करीत आहे.

सही किंवा अंगठयाचा ठसा

(सूचक)

३. चिन्हाची निवड करण्याकरिता जाहीरनामा :

मी याद्वारे असे घोषित करतो की, निवडणुकीसाठी मी निवडलेली चिन्हे मी प्राथम्यक्रमानुसार खाली दर्शविली आहेत.

१)----------

२) ----------

३)----------

सही किंवा अंगठयाचा ठसा ----------

४. घोषणापत्र (निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने करावयाचे)

मी गांभीर्यपूर्वक प्रतिज्ञा करतो आणि पुढीलप्रमाणे नमूद करतो की :

१) मी सध्याच्या मतदार यादीतील नोंदणीकृत मतदार असून माझा अनुक्रमांक ---------- आहे आणि माझा सूचक देखील सध्याच्या मतदार यादीतील नोंदणीकृत मतदार असून त्याचा अनुक्रमांक ---------- आहे.

२) या नामनिर्देशनाच्या दिनांकास माझे वय ---------- वर्षे (अक्षरात --------वर्षे) इतके आहे.

३) मी ग्रामसेवक नाही किंवा भारत सरकारचा अथवा कोणत्याही राज्य शासनाच्या वा

स्थानिक प्राधिकरणाच्या सेवेत नाही किंवा शासकीय निधीमधून अर्थ सहाय्य मिळत असलेल्या कोणत्याही संस्थेचा कर्मचारी नाही.

४) त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये नैतिक अध:पतनाचा अंतर्भाव असलेल्या कोणत्याही अपराधाकरिता फौजदारी न्यायालयाने मला दोषी ठरविले नव्हते.

५) मी निकोप मनाचा आहे आणि मी ज्याला नादार म्हणून किंवा अमुक्त नादार म्हणून अभिनिर्णीत करता येईल असा अर्जदार नाही.

६) मी जमीन महसूल किंवा पाणीपट्टी किंवा शासनाला किंवा पाणी वापर संस्थेला देय असलेले कोणतेही आकार देण्यात कसूर केलेली नाही.

७) नगरपरिषद किंवा महानगरपालिका अथवा पंचायत समिती किंवा जिल्हा परिषद अथवा कोणतेही राज्य शासन किंवा केंद्र सरकार अथवा पाणी वापर संस्था यांच्याशी करण्यात आलेल्या विद्यमान कंत्राटात त्यांच्यासाठी करण्यात येणाऱ्या कोणत्याही कामात माझा हितसंबंध नाही.

८) मला यापूर्वी समुचित प्राधिकरणाकडून पाणी वापर संस्थेमधील पदाधिकाऱ्याच्या कोणत्याही पदावरुन काढून टाकण्यात आलेले नव्हते.

